# शब्द रुची

मे २०१४ ● मूल्य १० रुपये

४०

ग्रंथाली



भारतीय लोकशाहीचा बोन्साय बहर!

॥ग्रंथाली॥ द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग, माटुंगा (प.), मुंबई-४०००१६ ● दूरध्वनी : २४३०६६२४/२४२१६०५० ● granthali01@gmail.com

ग्रंथाली

## तसा मी.. असा मी... बाळ खरे



शंकराचार्यांचा नातू असलेल्या बाळासाहेबांच्या पोतडीत असलेले वेगवेगळे आणि अविश्वसनीय अनुभव प्रांजळपणे मांडलेले आत्मकथन...

**मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

## तांबट प्रल्हाद जाधव





सुखाच्या शोधात भटकत राहणं हा माणसाचा स्वभाव आहे. पण बऱ्याचदा ते सुख आपल्या जवळच कुठंतरी असतं, बघण्याची दृष्टी असली म्हणजे झालं.

**मूल्य २५० रु. सवलतीत १६० रु.**

ग्रंथाली


## मंदिर-शिल्पे डॉ. माया पाटील




मराठवाड्यातील उस्मानाबाद, लातूर या भागांत मंदिर-शिल्पांचे प्राचीन वैभव आहे. त्याची चित्रांसह सर्वंकष माहिती देणारा हा ग्रंथ.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

## लेणी महाराष्ट्राची डॉ. दाऊद दळवी




महाराष्ट्रातील लेणीवैभव मोठे आहे. या लेण्यांचा माहिती-चित्रे व नकाशे मांडणारा हा संग्राह्य दस्तावेज आहे.

**मूल्य १२०० रु. सवलतीत ७५० रु.**


## *डॉ. नरेंद्र जाधव अनुवादित आणि संपादित पुस्तके*

ग्रंथाली





**बोल महामानवाचे** (एक ते तीन खंड)
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ५०० मर्मभेदी भाषणे**
१. आत्मनिवेदन आणि मार्गदर्शन; २. सामाजिक, आर्थिक, धार्मिक, कायदा-संविधान; ३. राजकीय

**जनाआवृत्ती संच मूल्य १२०० रु.**
**सवलतीत ८०० रु.**




**प्रज्ञासूर्य डॉ. आंबेडकर**
समग्र वैचारिक चरित्र

**मूल्य ७५० रु.**
**सवलतीत ६०० रु.**




**प्रज्ञा महामानवाची** (भाग १ ते ४)
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समग्र लेखनकार्य
१. राजकीय, २. अर्थशास्त्रीय व समाजशास्त्रीय लेखन, ३. मानववंशशास्त्रीय लेखन, ४. बुद्ध आणि त्याचा धम्म

**जनाआवृत्ती संच मूल्य ८०० रु.**
**सवलतीत ५०० रु.**

**टपाल खर्च प्रत्येकी ५० रु.**

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

**मे २०१४, वर्ष दुसरे**
**अंक पहिला, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ व आतील मांडणी : **सतीश खानविलकर**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**शब्द रुची/पुस्तक वितरण – महेश गोरेगांवकर**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी १०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, बुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.**


## संपादकीय...

१६ मे रोजी लोकसभा निवडणुकांचं 'सूप' वाजेल, तर २१ मे रोजी तेराव्या लोकसभेचं. 'अब की बार...' म्हणणाऱ्यांना भारतीय राजकारणात काँग्रेसचं सूप वाजेल अशी खात्री आहे. संसदेत मिरीची पूड आणि बाहेर तेलकट वडे आणि चिकन सूपचा आविष्कार जनतेनं पाहिला. मत नाही दिलं तर कुणी 'पाणी तोडण्याची' भाषा केली, कुणीतर थेट पाकिस्तानात पाठवण्याची भाषा केली. समाजवादी पक्षाला मत देत नाही तो मुसलमान नाही. त्याची डीएनए टेस्ट करावी असे वेडगळ विधान कुणी केले. जगातली सर्वात मोठी 'लोक'शाही धन्य झाली. उच्च लोकशाही मूल्यांच्या बाता कशा ठरतात हे निवडणूक केंद्र ताब्यात घेण्याच्या, सापडलेल्या पैशांच्या, अश्लाघ्य वक्तव्यांच्या प्रकारांतून दिसलं. निवडणूक आयोग हा 'नोटिस आयोग' व्हावा इतक्या तक्रारी परस्परांविरोधात केल्या गेल्या. उन्मत्तपणाची सूज आलेली माणसं सुदृढ भारताबाबत बोलू लागली, विकास, राष्ट्रीयत्व सांगू लागली आणि लोकशाहीचा बोन्साय बहर प्रकट व्हायला लागला.

अमेरिकेत आजही बॅलट पेपर मतपेटीत टाकला जातो, त्या पार्श्वभूमीवर सर्वत्र इलेक्ट्रॉनिक मशीनचं बटण दाबून मत देण्याची यंत्रं १२५ कोटी लोकसंख्येच्या देशात वापरली जातात, हे मात्र कौतुकास्पद आहे. अर्थात, महाराष्ट्राएवढ्या असलेल्या ब्रिटनमध्ये बॅलेट पेपरवर टिक करायला चक्क पेन्सिल ठेवली जाते तेव्हा ती मतं खोडून टाकता येऊ शकतात असा विचारही कुणाच्या मनाला शिवत नाही, हे लोकशाहीचं प्रगल्भ रूप आपल्याला, बोटावरची शाई कशी पुसता येईल असा विचार करणाऱ्यांना परवडणारं नाही. त्यामुळे दिल्ली ताब्यात घ्यायची तर आधी 'घोडा'मैदान गाठायला हवं हे जाणून, त्यातून आधी आपला आणि मग जमल्यास देशाचा विकास करण्याचे डावपेच १६ तारखेच्या निकालानंतर जोर धरतील.

इतक्या प्रचंड लोकसंख्येच्या देशात ज्या प्रकारे निवडणुका पार पडतात त्या लोकशाही प्रक्रियेबद्दल अभ्यास करण्यासाठी अनेक परदेशी उद्युक्त होतात. आणि 'अतर्क्य ना घडले काही...' म्हणत इथला मतराजा पदरी काही न पडता सोनं झालं म्हणतो! आम आदमी जागा होतोय असं म्हणतात. तो खरंच लोकशाहीवर पोसलेल्या बांडगुळांना आपली जागा दाखवेल तो सुदिन म्हणायचा.

**– अरुण जोशी**



प्रसिद्ध कवी, गीतकार, लेखक आणि दिग्दर्शक गुलजार यांना नुकताच दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला. त्यानिमित्त या संवेदनाशील व्यक्तिमत्त्वाबद्दल त्यांचे दोन सुहृद, संगीतकार कानु घोष आणि दिग्दर्शक के.ए. अब्बास यांनी जागवलेल्या त्यांच्या आठवणी, 'ऋतुरंग'च्या सहकार्याने पुनर्मुद्रित करत आहोत. 'गुलजारांची कविता' हे अनुवादित पुस्तक गेल्या २५ डिसेंबर रोजी 'ग्रंथाली'च्या वाचकदिनी प्रसिद्ध झाले. मूळ कविता आणि अनुवाद अशी त्याची रचना आहे. यानिमित्त 'ग्रंथाली' परिवारात गुलजार यांचे आगमन झाले. आता 'ग्रंथाली' मुलांसाठी त्यांच्या प्रसिद्ध नऊ पुस्तकांचा मराठी अनुवाद येत्या काही महिन्यांत 'ग्रंथाली' प्रसिद्ध करत आहे. गुलजार आणि यांच्यातील वृद्धिंगत होणाऱ्या या ऋणानुबंधाचा आम्हाला अतीव आनंद आहे.

# तबल्याचा ठेका आणि गाण्याची चाल

## कानु रॉय

गुलजारशी माझी मैत्री खूप जुनी आहे. इतकी जुनी की तेव्हा तो बिमलदांचा साहाय्यकसुद्धा नव्हता. मी, गुलजार, एस.एम. अब्बास, सलील चौधरी, रघुनाथ झालानी रोज दिवसा मोहन स्टुडिओत जमायचो. मोहन स्टुडिओत बिमलदांच्या कार्यालयासमोरच एका गुजराती चित्रपट निर्मात्याचं कार्यालय होतं. गुलजार, सलीलदा आणि मी- आम्ही तिघंही नेहमी तिथं कॅरम खेळत बसलेले असायचो. एके दिवशी कॅरम खेळताना मी सहजच बंगाली गाण्याची चाल गुणगुणत होतो. ते ऐकून गुलजार झटक्यात म्हणाला, 'कानू! तुझी हरकत नसेल तर या चालीवर मी एक गाणं लिहू?'

मी म्हणालो, 'अवश्य लिही.'

त्यानं लगेच, तिथं बसल्याबसल्याच या ओळी लिहिल्या-

*जवाँ होने लगी तनहाइयाँ*
*जागीं तेरी परछाइयाँ*
*जा रहा है कहाँ रात का काफिला*
*मुझसे तुम तक सुबह का फासला...*

मग तर मी काहीतरी गुणगुणायचं आणि त्यानं त्या चालीवर गाणं लिहायचं हे समीकरणच बनून गेलं. ही गाणी 'सहज सुचलं म्हणून' या प्रकारची होती. त्यात कुणाची बांधिलकी नव्हती वा व्यवहार नव्हता.

नंतर गुलजारबरोबर संगीतदिग्दर्शक म्हणून काम करण्याचीही वेळ आली आणि आम्ही दोघांनी मिळून 'अनुभव' केला. या चित्रपटाची दोन गाणी गुलजारची होती आणि त्यापैकी 'मेरी जाँ, मुझे जाँ न कहो, मेरी जाँ!' हे गाणं गुलजारनं माझ्या एका बंगाली चालीवरून बेतलं होतं. 'गृहप्रवेश'ची सर्व गाणी त्यानंच लिहिलीत आणि त्यांना मी चाली दिल्यात. गुलजार फारच मजेदार कवी आहे. त्याच्याशी गाण्याची 'सिटिंग' असली की मला एकही वाद्य आणावं लागत नाही. मी चाल गुणगुणतो आणि तो लिहीत जातो.

'गृहप्रवेश'चं हे गाणं त्यानं पाच प्रकारे लिहिलं होतं-

आप अगर आप न होते, तो भला क्या होते?
लोक कहते हैं कि पत्थर के मसीहा होते

त्या चित्रपटाचा संगीतदिग्दर्शक मी असल्यामुळे बासू भट्टाचार्य गुलजारकडून गाणी लिहवून घेण्यासाठी मलाच त्याच्याकडे पाठवीत. याच कामासाठी एके दिवशी सकाळी मी त्याच्या घरी गेलो तेव्हा तो सतारीवर रियाझ करत होता.

मला पाहताच म्हणाला, 'अरे, तू! आज सकाळी सकाळीच कसा काय आलास? चल, तबल्यावर बस. मी सतार वाजवतो.' संगीताबद्दल नवनवं जाणून घेण्यासाठी तो नेहमी आसुसलेला असतो. त्याला सतार शिकवण्यासाठी गुरुजी त्याच्या घरी येत असले तरी तो मला या ना त्या प्रकारे आपल्या रियाझात सामील करून घ्यायचा. 'हा नॉट कसा लावू? ते... कसं करू?' इत्यादी. आणि अगदीच काही बहाणा न सापडला तर तबल्याची ताबेदारी होतीच!

'गृहप्रवेश'च्या वेळी तर त्यानं अटच घातली होती, 'हे बघ कानू, तू माझ्याबरोबर तबल्यावर बसला नाहीस नं, तर मी तुझ्यासाठी गाणी लिहिणारच नाही.' आणि मग मला अख्खा दिवस तबल्यावर त्याची साथ करावी लागायची.

या चित्रपटाच्या गाण्यांच्या ध्वनिमुद्रणप्रसंगी तर एक मजेदार किस्सा घडला, तो सांगायलाच हवा. 'मचल के जब भी...'च्या ध्वनिमुद्रणाची सर्व तयारी पूर्ण झाली तरी गाणंच अजून पूर्ण लिहून झालं नव्हतं. मी सकाळी लवकरच गुलजारच्या घरी जाऊन धडकलो. स्वारी टीव्हीवर भारत-पाक क्रिकेट सामना पाहण्यात गुंग होती. मला पाहताच तो म्हणाला, 'तू बघत बस. मी आंघोळ करून हा आलोच. मग गाणं पूर्ण करीन.'

आंघोळून आला आणि पुन्हा टीव्हीसमोर बसला. मी त्याला गाण्याची आठवण करून दिली तेव्हा म्हणाला, 'करुया रे पूर्ण. तू कशाला घाबरतोस? चल, ऑफिसात बसून लिहू...'

अडला हरी... त्याच्याबरोबर ऑफिसात गेलो तर तिथंही टीव्ही चालू होता, पण भारतीय संघ ढेपाळत चालला होता. त्यामुळे उदासवाण्या स्वरात तो म्हणाला, 'आता तूच सांग, अशा परिस्थितीत मला शब्द सुचतील? भारत पराभवाच्या छायेत असताना माझा सूर कसा बरं लागेल?'

नंतर त्याचा सूर लागला आणि त्यानं गाणं लिहिलं-

*मचल के जब भी आँखों से छलक जाते हैं दो आँसू*
*सुना हे आबशारों को बड़ी तकलीफ होती है*

त्यानंतर काही दिवसांनी 'गृहप्रवेश'च्या चौथ्या गाण्याच्या ध्वनिमुद्रणाची बैठक त्याच्या घरी होती. ठरल्यावेळी मी त्याच्या घरी पोचलो खरा, पण मला पाहताच त्यानं सतार घेतली आणि म्हणाला, 'आधी तबल्यावर बस. मग आपण 'मीरा' बघायला जाऊ.'

इतक्या प्रेमानं त्यानं बोलावल्यावर त्याला धुडकावून लावणं कसं बरं शक्य होतं? मग आम्ही आपापली वाद्यं सरसावली आणि यमन सुरू झाला. त्यात आम्ही इतके रंगून गेलो की मूळ कामाचा

आम्हाला विसरच पडला. इतक्यात बासूदांचा फोन आला, 'झालं गाणं लिहून?' आता आली का पंचाईत! पण माझ्याकडे पाहून मंद मंद हसत तो म्हणाला, 'झालं तर!' आणि इकडे ध्रुपदसुद्धा त्यानं लिहिलेलं नव्हतं.

याच चित्रपटाचं 'जिंदगी फुलोंसी नहीं...' हे गाणं गुलजारनं नंतर लिहिलं. आधी मी चाल बनवली आणि मग तो शब्द पेरत गेला. पण गाण्याच्या 'जब राह कोई मुडती है कहीं...' या ओळीतले 'मुडती है' हे शब्द मी बनवलेल्या चालीच्या मीटरमध्ये जुळत नव्हते. त्यामुळे बासूदा किंचित बेचैन झाले. आम्ही लगेच फोन लावला. पण गुलजार घरी नव्हता. तो चांदिवली स्टुडिओत 'मीरा'च्या चित्रीकरणात गुंतला होता. आम्ही दोघं तडक स्टुडिओत पोचलो. मी त्याला आमची अडचण सांगितली. मग थोडासा विचार करून तो म्हणाला, 'कानू! माझ्या मते या ओळीतील 'मुडती है' हे दोन्ही शब्द अत्यंत समर्पक आहेत. त्यामुळे ते न बदललेले बरे.'

तरीही थोडा वेळ तो डोकं खाजवत राहिला. डोळे मिटून विचार करत बसला. मग मला हाताला धरून आपल्या कारच्या बॉनेटजवळ घेऊन गेला आणि म्हणाला, 'कानू, तुझी ती चाल पुन्हा एकदा गुणगुणशील?'

मी गुणगुणलो. त्यानं ती नीट लक्ष देऊन ऐकली आणि माझी मनधरणी करण्याच्या पवित्र्यात म्हणाला, 'अरे बाबा, तूच बदलून टाक ना तुला वाटतंय तसं. माझे शब्द तरी वाचतील.'

मी तसंच केलं.

एका गाण्याच्या चालीसाठी मी माझ्या इतक्या प्रेमळ मित्राला कसा बरं दुखावू शकलो असतो?

**– अनुवाद : प्रकाश भातम्ब्रेकर**

# अज्ञातातून शिखराकडे

## के.ए. अब्बास

गुलजार! जसं नाव तसंच व्यक्तिमत्त्व! आपली बुद्धिमत्ता आणि आपल्या शब्दसामर्थ्यावर चित्रपटक्षेत्राला उजळून टाकत असलेला 'गुलजार' तारा! त्याला मी आज नव्हे, पंचवीस वर्षांपासून चांगला ओळखतो. तेव्हा तो प्रगतिशील लेखकसंघाच्या बैठकांना येत असे. त्या बैठका माझ्या घरीच होत असत. त्या काळात माझ्या घरात पुरेशा खुर्च्या नसल्यामुळे मी चक्क सतरंजी अंथरत असे. म्हणजे भारतीय बैठकच होत असे ती. तीत अली सरदार जाफरी, राजेंद्रसिंह बेदी, साहिर लुधियानवी, मजरुह सुल्तानपुरी इत्यादी नामवंत पुढल्या रांगेत बसत; तर काही तरुण मागच्या रांगांमध्ये आखडून, दबून बसलेले असत. त्यांतच गुलजारही असे हे सांगणे नकोच. पण आता तो दबलेल्या, आखडलेल्या स्थितीतून खुल्या अंगणात आलाय. यश आणि कीर्ती त्याच्या मागे धावतायत. कालपर्यंत अंधारात दडलेला गुलजार आता झपाट्यानं यशाची शिखरं पादाक्रांत करतोय.

पण पांढरा लेंगा-झब्बा घालण्याची हौस त्याला तेव्हाही होती आणि आताही आहे. फरक इतकाच, की तेव्हा तो सुती-मलमलचे कपडे घालत असेल, तर आता टेरिलीनचे घालतो. पण दुरून पाहिल्यावर आजही तो पूर्वीचा, तसाच 'गुलजार' दिसतो. याला म्हणतात निष्ठा.

मला समजलंय की तो शीख आहे आणि दाढीही ठेवत असे. त्याचा तसा फोटो एका पुस्तकात पाहिल्याचं मला स्मरतं. तो दिल्लीत शिकत असतानाचे ते दिवस होते. आता तो मुंबईत आलाय; पण आपलं खरं नाव तिथंच सोडून. त्याचं आडनाव आता इथं नावारूपाला आलंय. सुरुवातीच्या काळात बिमल रॉयसारख्या अव्वल दर्जाच्या दिग्दर्शकाकडे त्यानं उमेदवारी केली. त्या दरम्यान तो गीतं लिहू लागला आणि संवादलेखनाचा सरावही त्यानं केला आणि पाहता पाहता या क्षेत्रात चांगलाच जम बसवला. थेट हृदयाला भिडणारी भाषा आणि शब्दांच्या अचूक निवडीचं कसब हीच जणू त्याच्या यशाची गुरुकिल्ली होती. मुळात बिमल रॉय स्वत:च देवमाणूस होते आणि करारीपणा त्यांच्या वागण्याबोलण्यातून व्यक्त होत असे. त्यांच्या चित्रपटांचे संवाद लिहिणं 'येऱ्यागबाळ्याचं' काम नव्हतं. पण अंगठीत जडवलेल्या खड्यासारखा तो बिमलदांच्या कसोटीस खरा उतरला.

बिमल रॉयच्या निधनानंतर कुणीतरी एकदा सहज म्हणाला, 'आता त्यांच्या जागी कोण...?

तेव्हा माझ्या तोंडून अवचित उद्गार बाहेर पडला. 'गुलजार!'

आणि ते खरंच ठरलं!

तीच जिद्द, तोच करारीपणा, तीच भावप्रवणता आणि मळवाटेवरून न जाता आपली स्वत:ची नवी पायवाट तयार करण्याची धडपड!

पूर्वी तो कधीतरी वाटेत आणि क्वचित घरीही भेटत असे. तेव्हा साधारणपणे दोनच विषयांवर आमची चर्चा होत असे.



सामाजिक परिवर्तन आणि प्रगतिशील आंदोलनाची दिशा किंवा मीनाकुमारीची रूपेरी कारकीर्द या भोवतीच आमची बातचीत घुटमळत असे. मी मीनाचा उत्कट चाहता होतो. पण मला वाटतं, गुलजार तिच्या चाहत्यापेक्षाही आणखी काहीतरी होता. खरं तर मीना इतकी 'पाक-साफ' होती की तिचा प्रशंसक होणंही इतकं सोपं नव्हतं. 'पारखी' लोकच तिच्यातल्या खऱ्या कलावंताला साद घालू शकत. इतरांच्या लेखी ती फक्त एक नटी होती. पण तिचं काळीज हळवेपणानं भरलेलं होतं, त्यावर कारुण्याची आणि व्यथेची छटा होती, त्यात माणुसकीचा गहिवर होता, निर्मळ प्रेमाचा दरवळ होता आणि ममतेची हाक होती. पण साधारण प्रेक्षकांना तिच्या या गुणांचा पत्ताच नव्हता. म्हणूनच गुलजारच्या तोंडून मीनाबद्दलचे प्रशंसोद्‌गार ऐकून मला खचितच आनंद होत असे आणि एक वेगळाच भारलेपणा रोमरोमात व्यापून राही. गुलजारचा पहिला चित्रपट 'मेरे अपने' पडद्यावर आला. त्यात मीनाकुमारीनं एका वृद्धेची भूमिका केली होती. तिचं रूपडं समोर ठेवूनच त्या पात्राची रचना केली गेल्यासारखं वाटत होतं. आणि

MAjESTIC ON THE NET
majesticonthenet.com

मॅजेस्टिक
आले घरोघरी !

आता मिळवा घरपोच पुस्तके !

मॅजेस्टिक ऑन द नेट.कॉम

आता मिळवा सर्व प्रकाशकांची
मराठी व इंग्रजी पुस्तके घरपोच!

ऑनलाईन खरेदीकरिता भेट द्या -
majesticonthenet.com

फोनवरून ऑर्डर देण्यासाठी संपर्क करा - (022) 65666755

कॅश ऑन डिलिव्हरी उपलब्ध (C.O.D)

Click करा → majesticonthenet.com

तिनंही त्या भूमिकेत जणू प्राण ओतला. अलबत मला माझ्या 'चार दिन चार राहें'ची चावली आठवली. एक गावंढळ, अस्पृश्य पोरगी. ही भूमिकाही मीनानंच केली होती आणि तिनं ती समरसून केली होती. गुलजार आणि माझ्यात हाच एक समान धागा होता, ज्यामुळे आमच्यात जवळीक निर्माण झाली होती. आणि अशातच दिव्याची ज्योत लवलवत विझून गेली. मीना आम्हा सर्वांना सोडून गेली. लोकांनी कमाल अमरोही यांचं भरभरून सांत्वन केलं. पण खरं तर त्याऐवजी गुलजारच्या काळजातल्या भळभळत्या जखमांवर मलमपट्टी करणं आवश्यक होतं. मीनाच्या सर्व डायऱ्यांचा वारसा गुलजारकडेच आला होता.

पण गुलजारनं स्वत:ला सावरलं. आता त्याच्या व्यक्तिमत्त्वाला जणू एक अनोखी झळाळी येऊ लागलीय.

असाच एक उमदा चित्रपट होता 'आँधी'. खरं तर ती एक सोज्वळ प्रेमकहाणी होती. त्यातली मुलगी पित्याच्या सांगण्यावरून आंदोलनात उडी घेते. तिचा प्रियकर एका हॉटेलात मामुलीशी नोकरी करत असतो. पण नियती त्यांना पुन्हा एकत्र आणते. हा सर्व घटनापटच या चित्रपटाचा आत्मा आहे असं म्हणायला हरकत नाही. 'आँधी' सेन्सॉर आणि इमर्जन्सीच्या कात्रीत सापडला. या चित्रपटाच्या विरोधात जणू काहूर उठलं. पण या वादळातून 'आँधी'ला सहीसलामत बाहेर आणू शकला तो गुलजारच! त्याच्या मनस्वीपणाचा, करारीपणाचा आणि झुंजार वृत्तीचा हा हृद्य आविष्कारच होता जणू.

आता एक वैयक्तिक अनुभवही सांगूनच टाकतो! एके दिवशी गुलजारनं मला फोन केला आणि म्हणाला, 'काही वर्षांपूर्वी मी तुमची एक कथा वाचली होती आणि मी भारून गेलो होतो. कथेचं नाव मला आता आठवत नाही; पण कथेच्या नायकाला फासावर लटकवण्यात येतं...' मी लगेच म्हणालो, 'ती कथा होती– दिल ही तो है.'

'कदाचित हे उर्दू शीर्षक असेल. पण मी ती इंग्रजीत वाचली होती' – गुलजार.

मी लगेच इंग्रजी शीर्षकही सांगितलं– 'थर्टींथ व्हिक्टिम.'

'असेल बुवा! पुन्हा एकदा मला ती वाचायचीच. मिळेल?'

'का नाही मिळणार?'

आवर्जून आपल्या फायली चाळून त्या कथेची कात्रणं मी त्याला पाठवून दिली आणि विसरूनही गेलो. साधारण दोनेक आठवडे गेल्यावर एके दिवशी त्याचा फोन आला, 'मी आणि एन.सी. सिप्पी उद्या सकाळी तुम्हाला भेटायला येतोय. चालेल?'

'यायला काहीच हरकत नाही. पण उद्या सकाळच्या विमानानं मी दिल्लीला एका बैठकीसाठी जातोय...'

'तर मग तुम्हाला विमानतळावरच भेटायला येऊ आम्ही.'

दुसऱ्या दिवशी पहाटे साडेपाच वाजता मी विमानतळावर पोचतो न पोचतो तो हे दोघं तिथं हजर! मी विचारलं, 'काय विशेष?'

गुलजार एवढ्या पहाटे आंघोळून आला होता आणि नेहमीप्रमाणेच पांढऱ्या लेंग्या–झब्ब्यात होता.

'तुम्हाला हे देण्यासाठी आम्ही आलो होतो', असं म्हणून सिप्पींनी एक जाडजूड पाकीट माझ्या हातावर ठेवलं.

मी मुकाट्यानं ते खिशात ठेवलं आणि विचारलं, 'हे काय?'

'इसारा! थर्टींथ व्हिक्टिम आता आमची झाली.'

'तुमची आडकाठी नसेल तर मी पटकथा लिहायला सुरू करू?' गुलजारनं विचारलं.


'आनंदानं सुरू कर. तू त्या कथेचं सोनं करशील याची मला खात्री आहे. आगे बढो...' दिल्लीला हॉटेलात गेल्यावर मी ते पुडकं उघडलं; त्यात पाच हजारांच्या नोटा होत्या. ही अनपेक्षित बिदागी पाहून मला वाटलं की एका जुन्या कथेचं एवढं अप्रूप! मला तिच्या मोबदल्याची मुळीच अपेक्षा नव्हती. कारण गुलजारच्या पदरी पडून ती पवित्र होणार यात तिळमात्र शंका नव्हती. आणि खरोखरीच त्यानं चित्रपट बनवला, 'अचानक'. कथेचा शेवट बदलला तरी चित्रपट दमदार झाला होता; अत्यंत साधासुधा; तरीही अर्थपूर्ण!

'किताब' मी गुलजारबरोबर पाहिला. चांगलं पिक्चर असूनसुद्धा चाललं नाही (माझ्या पिक्चरांसारखंच). नंतर तो 'मीरा'ची जुळवाजुळव करत असल्याचं समजलं. निर्माता होते प्रेमजी. सध्याच्या देमार चित्रपटांच्या हाणामारीत 'मीरा'सारखा चित्रपट काढणं म्हणजे धाडसाचंच काम होतं. 'क्लासिकल' चित्रपटांना विचारतोय कोण आजकाल? 'मीरा'साठी तसाच, तितकाच अभिजात संगीत दिग्दर्शक त्यांनी निवडला–रविशंकर.

मीराच्या भूमिकेसाठी गुलजारनं हेमामालिनीला घेतलं हे त्याचं वैगुण्यही म्हणता येईल आणि खास वैशिष्ट्यही. सौम्य, मृदू स्वभाव आणि मधाळ वाणी... या त्याच्या गुणांमुळे प्रत्येक नायिका त्याचं गुणगान करत असल्यास नवल वाटू नये. मीनाकुमारी, राखी (जिच्याशी विवाह केला), हेमामालिनी व रेखा... एकदा त्याच्या संपर्कात आली की त्यानं तिला जिंकलीच म्हणून समजा. मेहनतान्याचा विचार न करता त्याच्या चित्रपटात काम करायला त्या तयार होतात. ही त्याची मोहिनी फक्त नायिकांनाच नव्हे तर नायकांनाही रिझवते. दिलीपकुमारपासून विनोद खन्नापर्यंत प्रत्येकाला गुलजारच्या सांगाव्याचीच प्रतीक्षा असते असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही.

ही चुंबकीय जादू गुलजारच्या शब्दांत आहे!
त्याच्या पेहरावाच्या साधेपणात आहे!
दाढीच्या वाढलेल्या खुंटांत आहे!
नावात आहे, रूपात आहे!
बंगाली भाषेच्या जाणिवेत आहे!
त्याच्या डोळ्यांच्या नेणिवेत आहे!

**– अनुवाद : प्रकाश भातम्ब्रेकर**



# पण तरी नकळत, इथे वा तिथे उरतो...

**रविप्रकाश कुलकर्णी**

ज्यांची नावं सतत ऐकू येत असतात त्यांच्या बाबतीत त्याचं वय लक्षात येत नाही, त्याचं अस्तित्व जाणवत राहतं. मग ते ग.दि. माडगूळकर असोत, शांता शेळके असोत की सुधीर मोघे!

असा दिवस जात नाही की त्या दिवशी सुधीर मोघे याचं गाणं कानावरून जात नाही. मग ते–

'सांज ये गोकुळी
सावळी... सावळी
सावळ्याची जणू साऊली'

हे सांध्यगीत असेल किंवा

'एकाच ह्या जन्मी जणू फिरूनी नवी जन्मेन मी' यासारखं चित्रपट गीत असेल. अशी स्वतःची स्वतंत्र मुद्रा उमटवलेला गीतकार १५ मार्च २०१४ रोजी या जगातून गेला आणि त्याचं वय ७५ होतं, ह्या वृत्तावर विश्वास ठेवणं अवघड झालं.

सुधीर मोघे कवी म्हणून, गीतकार म्हणून तसे चटकन प्रस्थापित झाले. त्यांचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांना इतरांच्या कविता, गाणी, भावगीतं चालीसकट तोंडपाठ होती. त्यामुळेच पुढे भावगीतांचा कोश करण्याची कल्पना पुढे आली तेव्हा त्याची मुख्य सूत्रं मोघे यांच्याकडे येणं अनिवार्य होतं...

असे हा सुधीर मोघे एकेकाळी कमालीचे मुखदुर्बळ होते. त्याचं कारण त्यांचं तोतरेपण! पण स्वतःच्या शब्दानं आणि वाणीनं आत्मबळ लाभताच त्यांचं तोतरेपण कुठच्या कुठे गायब तर झालंच, शिवाय 'कविता पानोपानी'सारखा तीन तासांचा सोलो परफॉरमन्स यशस्वीरीत्या सादर करू शकले, हे आश्चर्यच म्हटलं पाहिजे. हे सर्व कसं घडलं? जणू मोघे यांनी आपल्या गीतातच ह्याचं उत्तर दिलं आहे–

कुणा न दिसता, कोण चालवी अवघा संसार
कळसूत्री बाहुली खेळवी कोण सूत्रधार?
अपुले येणे, अपुले जाणे... सहज बोलणे, मंजुळ गाणे
अपुल्याकरवी तोच करवितो सारे व्यवहार...
कळसूत्री बाहुली खेळवी कोण सूत्रधार?

सुधीर मोघे यांच्या सर्वच लेखनाचा आणखी एक विशेष म्हणजे त्यांना जे सांगायचं असतं ते सारं स्पष्ट, चित्रदर्शी असतं. जेणेकरून कुठेही संदिग्धता राहूच नये. असं त्याचं प्रातिनिधिक गाणं–

फिटे अंधाराचे जाळे, झाले मोकळे आकाश
दरीखोऱ्यातून वाहे एक प्रकाश... प्रकाश...

पुढे मोघे एकेक जणू दाखवत जातात–

रान जागे झाले सारे... पायवाटा जाग्या झाल्या
सूर्य जन्मता डोंगरी संगे जागल्या सावल्या
एक अनोखे लावण्य आले भरास... भरास

ह्या गाण्यानं, त्याच्या चालीनं इंजिनीअर वगैरे असले तरी मुळात कुठेतरी संगीत भिनलं असल्यामुळे त्यांना चक्क एक चित्रपट मिळाला. हा चित्रपट म्हणजे 'लक्ष्मीची पाऊले' आणि संगीत दिग्दर्शक म्हणजे आता सर्वश्रुत असलेले श्रीधर फडके, हे आता वेगळं सांगायला नकोच...

ह्या गाण्याचं आणखी एक वेगळेपण म्हणजे चित्रपटासाठी दोन अंतरे लिहून झाल्यानंतरही गीताकाराला आणखी काही सांगावंसं वाटलं म्हणून त्यानं लिहिलंही–

झाला आजचा प्रकाश... जुना कालचा काळोख
चांदण्याला किरणांचा सोनसळी अभिषेक
सारे रोजचे... तरीही... नवा सुवास... सुवास

हा अंतरा फक्त सुधीर मोघ्यांच्या कवितावाचनाच्या कार्यक्रमात म्हटला जाई. पण त्याचा प्रभाव इतका झाला की पुढे श्रीधर फडके आपल्या कार्यक्रमात विशेष हकिगतीसह हा अंतरा म्हणू लागले... यावर सुधीर मोघेंनी म्हटलंय, ''म्हणजे फक्त कवितांनाच नशीब असतं असं नाही. त्यांच्या अंतऱ्यांना आणि शब्दानांही ते स्वतंत्ररीत्या असू शकतं.'' त्यामुळे 'झाले मोकळे आकाश' ह्या नावाची एक मालिका येऊन गेली. 'फिटे अंधाराचे जाळे' ह्या शब्दांना श्रीधर फडक्यांच्या यशस्वी कार्यक्रमाच्या शीर्षकपदी मिरवण्याचं भाग्य तर मिळालंच, शिवाय शेअरबाजारातील मंदी उठल्यावर 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका आनंदलेखाचं शीर्षकही चक्क हेच होतं, 'फिटे अंधाराचे जाळे!'

सुधीर मोघ्यांच्या बाबतीत आणि अर्थात त्यांच्या कवितागाण्यांबाबत अशी अनेक कोडी आहेत. कधी त्यांनी घातली तर कधी घडली. त्याचं एक उदाहरण ठळकपणे सांगता येईल. किंबहुना ती कविता त्यांची कवी म्हणून ओळख सांगणारी आहे.

गाण्याची जन्मकथा आणि हकीगतही तेवढीच रोचक.

धडपडीच्या काळात सुधीर मोघे पुणे रेडिओवरदेखील येऊन-जाऊन असत. असेच मोघे एकदा तिथे गेले तेव्हा संगीतकार राम फाटक त्यांना म्हणाले, ''कल्पना अशी आहे की भीमसेन जोशींकडून भावगीत गाऊन घ्यायचं आहे...''

पुढे ते म्हणाले, ''हे इतके मोठे कलाकार व्यसनाधीन होतात... पार वाहावतात... का? त्यांना काय कमी असतं?''

यावर सुधीरचा दबकतच जबाब होता, ''रामभाऊ, इतक्या ढोबळपणे पाहून चालणार नाही. माणसाच्या जगण्यामधली अगम्य पोकळी ही कुणालाच टळलेली नाही. कलाकाराच्या बाबतीत तर ही बैचेनी अधिकच मुश्किल असणार...''

तेव्हा रामभाऊ म्हणाले, ''गाण्याचा मूड कळला ना तुला... झालं मग. मुखड्याची चाल पण बांधली आहे मी–''

रामभाऊंनी 'डमी' शब्द घोळवत म्हटलं, ''सखी, मंद...''

सुधीर मोघ्यांनी लगेच शब्द उमटवले –

''सखी मंद झाल्या तारका, आता तरी येशील का?''

गाण्याचा शेवटचा अंतरा आला–

''बोलावल्यावाचूनही मृत्यू जरी आला इथे
थांबेल तोही पळभरी, पण सांग तू येशील का?
सखी मंद झाल्या तारका...''

१९७२च्या मे महिन्यात दर रविवारी होणाऱ्या 'स्वरचित्र' कार्यक्रमात भीमसेन जोशींनी म्हटलेलं गाणं बघता बघता लोकप्रिय झालं. लोकांच्या ओठांवर जाऊन बसलं...

पुढे दूरदर्शनवर 'शब्दांच्या पलिकडले' हा कार्यक्रम संगीत-दिग्दर्शक राम फाटकांवर होता. त्यात 'सखी मंद झाल्या तारका' सुधीर फडके यांनी म्हटलं. अर्थात रामभाऊ आणि सुधीर फडक्यांच्यातल्या रुसव्याफुगव्यासकट. म्हणजे सुधीर फडके यांनी म्हटलं, ''आता तरी येशील का? ह्या शब्दावर हलकासा खटका आहे. तो चांगला वाटत नाही...''

''माझी जागा चांगली नाही?

दोघं इरेला पेटले.

शेवटी राम फाटकांनी हे गाणं सोडून दुसरंच घ्यायचं ठरवलं...

तेव्हा मात्र सुधीर फडके म्हणाले, ''ते मघाचंच गाणं शिकवा. तेच छान आहे.''

मग गाणं शिकवता शिकवता फाटक म्हणाले, ''तुम्हाला ती जागा नको वाटतेय ना... मग बदलून टाका ना...''

पण आणखी घडलं ते नंतरच.

फडके म्हणाले, ''श्रीधरची दोन गाणी गाण्यासाठी एच.एम.व्ही.ला डेट दिली होती. ती गाणी पुढेही करता येतील. त्याऐवजी आपण 'सखी झाल्या... आताच घेऊ या.''

आज सुधीर फडके यांच्या आवाजातलं हे गाणं रेकॉर्डवर उपलब्ध आहे.

मात्र १९९७ साली पुणे आकाशवाणीनं ह्या गाण्याचा रौप्यमहोत्सव साजरा केला तेव्हा आवर्जून भीमसेन यांचंच 'सखी मंद झाल्या तारका' लावलं. तेव्हा अनेकांनी टेप करून घेतलं. हा दुर्मिळ ठेवाच ठरला.

त्यातून वाद – चांगलं कुणी म्हटलंय?

काहीजणांना तर भीमसेननी हे म्हटलंय ह्याचा पत्ताच नसतो. असं भाग्य क्वचितच एखाद्या गाण्याला लाभतं. सुधीर मोघ्यांना त्यांच्या सुरुवातीच्या काळातच हे भाग्य लाभलं हे विशेष.

सुधीर मोघेंच्या अशा अनेक आठवणी पानापानात शब्दाआड नक्कीच आहेत. ते गेल्यानं एक मित्र गेल्याचं दुःख आहे... पण मग त्यांचेच शब्द आठवतात–

''माझ्याही नकळत
कुठे कुठे मी रमतो
ना कुठे थांबतो
तरी मनातून जमतो
या जड देहाची अनंत मरणे मरतो
पण तरी नकळत
इथे वा तिथे उरतो...''

**– रविप्रकाश कुलकर्णी**
३, स्वप्नसाकार,
धं.वां. चौधरी हायस्कूलजवळ,
डोंबिवली (पूर्व) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९२२४८७२८७०

# लोकरंजनातून लोकप्रबोधन करणारी नृत्यांगना!

**सविता अमर**

नैसर्गिक आपत्ती आली की तिकडे धावून जाणं आणि उद्‌ध्वस्त झालेल्या माणसांचं, कुटुंबांचं सेवादलाच्या मदतीनं पुनर्वसन करणं या कामात सुधा वर्दे यांचा कायमच पुढाकार राहिला. लातूर असो वा कच्छ किंवा अगदी बिहार वा केरळ; सुधाताईंनी गरज पडेल तिथे असंच भरीव काम उभं केलं. विशेषत: महिलांमध्ये त्यांच्या हक्कांविषयी जागरूकता निर्माण करत त्यांना त्यांचे अधिकार मिळवून दिले. सुधाताईंच्या जीवनकार्याचा त्यांची कन्या झेलम परांजपे यांच्याशी बोलून घेतलेला हा विशेष वेध...



सुधा वर्दे. समाजवादी विचारसरणीची ज्येष्ठ कार्यकर्ती आणि 'महाराष्ट्रदर्शन', 'भारतदर्शन', 'शिवदर्शन', 'झेलमचे अश्रू' यांसारख्या संगीत नृत्य कार्यक्रमांच्या माध्यमातून 'लोकप्रबोधन' करणारी नृत्यांगना! नृत्याची आवड सुधाताईंमध्ये उपजतच होती. शास्त्रीय नृत्याचं कुठलंही रीतसर शिक्षण घेतलेलं नसलं तरी त्यांचं नृत्यकौशल्य रसिकांना खिळवून ठेवणारं होतं. काही काळ त्यांनी पार्वतीकुमारांकडे भरतनाट्यमचे धडे गिरवले. पण कलापथक आणि घर ही कसरत सांभाळत असताना त्यांना शास्त्रीय नृत्याला हवा तसा वेळ देता आला नाही. नृत्यातील ही निपुणता पुढे त्यांची कन्या झेलम परांजपे यांनी संपादन केली. केलुशरण मोहापात्रा यांच्याकडे ओडिसी नृत्याचं शिक्षण घेऊन झेलमताईंनी 'नर्मदा', 'सावित्री वदते', 'हुंडाबळी', 'मुलगी झाली' यांसारखे सामाजिक, शैक्षणिक विषय सर्वांसमोर सादर केले. 'लीलावती' ही गणिती नृत्यनाटिका साकारली. 'स्मितालय' ही नृत्यसंस्था सुरू केली.

''आईमुळेच माझ्यातील नृत्यकला उफाळून वर आली.'' आपल्या कलेचं श्रेय आईला देत झेलमताई पुढे सांगतात, ''लहानपणापासून राष्ट्र सेवादलाच्या कलापथकात दर दिवाळी आणि उन्हाळी सुट्टीत नृत्याचे कार्यक्रम करत मी आईबरोबर भारतभर फिरले. वसंत बापट यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असणाऱ्या सेवादलाच्या कलापथकात नृत्याचा मुख्य भार होता तो आई, आबाबेन देशपांडे, प्रमिला दंडवते यांच्यावर. बाकीचं सगळं लीलाधर हेगडे बघायचे. नंतर आबाबेन देशपांडे आणि प्रमिला दंडवते दूर झाल्या. पण आईनं जवळपास आपल्या आयुष्यातील ३५ वर्षं या कलापथकासाठी दिली. कालांतरानं कलापथकातील मुलांच्या संघटनाचीही जबाबदारी आईवर आली. महिना-महिना दौऱ्यावर असणाऱ्या चाळीस-पन्नास तरुण मुला-मुलींच्या गटाचा ती मनापासून सांभाळ करायची. अगदी कोणी आजारी नाही ना पडलं, सगळ्यांनी नीट खाल्लं ना, कुणाला घरची आठवण तर येत नाही ना असं सगळं ती मायेनं बघायची. त्या काळात ती या सगळ्या मुलांची 'आई'च झालेली असायची.

''८-९ वर्षांची असल्यापासून मीही आईबरोबर या दौऱ्यांवर जायचे. यानिमित्तानं एवढ्या मोठ्या ग्रुपमध्ये कसं राहायचं, सगळ्यांशी समानतेनं कसं वागायचं अशा अनेक चांगल्या गोष्टींचे संस्कार माझ्यावर होत गेले. सुधा वर्देंची मुलगी म्हणून ग्रुपमध्ये मला कधीच वेगळी वागणूक किंवा स्वतंत्र सवलत दिली गेली नाही. उलट सुरुवातीला मला वाटायचं की, मुलगी आहे म्हणून आई माझ्याकडे अधिकच दुर्लक्ष करतेय. पण हळूहळू यातून माझी सर्वांशी समानतेनं वागण्याची समज आई घडवत होती.''

पदव्युत्तर शिक्षण होईपर्यंत झेलमताई सेवादलाच्या कलापथकात होत्या. लग्नानंतर या कामाला 'ब्रेक' मिळाला. हळूहळू कलापथकाचं कामही काहीसं बंद पडलं. कलापथकाचं काम थांबल्यानंतर आणीबाणीच्या काळात सेवादल आणि समाजवादी पक्षानं सुधा वर्दे यांच्यावर एक नवीन जबाबदारी सोपवली. ती म्हणजे आणीबाणीविरोधी सत्याग्रहींच्या तुकड्या तयार करायच्या आणि अटक झालेल्यांच्या कुटुंबीयांसाठी आर्थिक मदत गोळा करायची व तिचं योग्य रीतीनं वाटपही करायचं.

''खरं तर आणीबाणीमुळे या गोष्टी जाहीरपणे करणं हे अतिशय कठीण काम होतं. पण आईनं ते नेटानं पार पाडलं आणि ते करताकरताच ती तुरुंगातदेखील गेली. बाबा तर तुरुंगातच होते. मीही चर्चगेट स्टेशनच्या बाहेर माझा पहिला सत्याग्रह करून तुरुंगात पोहोचले. सहा आठवडे तुरुंगात काढून बाहेर आल्यावरही कॅम्पसवर पत्रकं वाटणं वगैरे आमचं काम चालूच होतं... '' झेलमताईंच्या बोलण्यातून त्यावेळचं भारावलेपण आपल्यापर्यंत पोहोचतं.

समाजकारणात रमलेल्या सुधाताईंनी राजकारणाला मात्र

कधीच 'आपलं' मानलं नाही. ''आईच्या आयुष्यातील बहुतांश काळ सामाजिक कामांतच गेला. बाबा राजकारणात असले तरी आई त्यापासून दूरच राहिली. एकदा पक्षाच्या आदेशामुळे आणि लोकांच्या आग्रहाखातर ती बांद्रा मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीला उभी राहिली. मात्र जिंकून काही आली नाही. पण बाबा जेव्हा निवडणुकीला उभे राहायचे तेव्हा अगदी जोमानं ती त्यांच्याबरोबर प्रचारकार्यात सहभागी व्हायची. मधु दंडवते यांच्यासाठी तर तिनं सबंध कोकणात प्रवास करून जोरदार प्रचार केला होता. तिचं राजकारण हे असं फक्त आपल्या माणसांच्या प्रचारापुरतंच मर्यादित होतं.''

१९७७ साली सदानंद (अनू) वर्दे शिक्षणमंत्री झाले. तथापी सुधाताईंनी कधीही 'मंत्र्यांची बायको' म्हणून मिरवलं नाही. उलट त्या आपलं कामं आपल्या मार्गानं करत राहिल्या. ''त्या काळात आई राष्ट्रसेवा दलाची अध्यक्ष असल्यानं तिच्याकडे तसा वेळही नव्हता. पण जरी वेळ असता तरी तिनं स्वत:ला कधीच असं मिरवलं नसतं. कारण तिला तिचं स्वतंत्र अस्तित्व होतं. तिचं काम हीच तिची मोठी ओळख होती.''



महिला दक्षता समितीची अध्यक्ष म्हणूनही सुधाताईंनी खूप मनापासून काम केलं. प्रमिला दंडवते यांच्या आग्रहाखातर सुधाताईंनी या कामात लक्ष घातलं आणि जवळपास १२ वर्षं हे काम नेटानं पार पाडलं. ते करत असताना अगदी तळागाळातल्या बायकांशी त्यांचा संपर्क आला. या बायकांच्या समस्या समजावून घेणं, वेळप्रसंगी त्यांच्याबरोबर पोलिस स्टेशनमध्ये जाणं, त्यांच्या प्रकरणांचा निकाल लागेपर्यंत पाठपुरावा करणं, भाजलेल्या बायकांची इस्पितळात जाऊन विचारपूस करणं हे सगळं त्यांनी जीव ओतून केलं. इतकंच नव्हे तर आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीनं महिलांमध्ये त्यांच्या हक्काविषयी जागरूकता निर्माण करत त्यांच्यात एक नवा आत्मविश्वास निर्माण केला.

नैसर्गिक आपत्ती आली की तिकडे धावून जाणं आणि उद्ध्वस्त झालेल्या माणसांचं, कुटुंबांचं सेवादलाच्या मदतीनं पुनर्वसन करणं या कामात सुधाताईंचा कायमच पुढाकार राहिला. आई-बाबांच्या प्रयत्नांतून 'निर्माण' झालेल्या अशा कामांचा झेलमताई आवर्जून उल्लेख करतात. ''लातूरला विध्वंसकारी भूकंप झाल्यानंतर 'मला तिथे जाऊन काहीतरी काम केलंच पाहिजे' या निश्चयानं आई सेवादलातील काही कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन तडक तिथे पोहोचली. त्यावेळी शरद पवारांचं सरकार होतं. सेवादलाचं काम पाहून त्यांनी एक जागा देऊ केली. तिकडे आई-बाबा आणि सेवादलाचे पन्नालाल सुराणा यांनी मिळून लातूरच्या भूकंपात अनाथ झालेल्या मुलांसाठी 'आपलं घर' उभं केलं. त्याच्याबरोबरीनंच तिथे 'धरित्री विद्यालय' सुरू केलं. दहावीपर्यंत असणाऱ्या या शाळेत आता व्यावसायिक शिक्षणाचे धडेदेखील दिले जातात. कच्छमध्ये जेव्हा भूकंप झाला तेव्हाही आई मदतपथकाबरोबर धावत गेली. तेथेही शाळा, वसतिगृह सुरू झालं.''

लातूर असो वा कच्छ किंवा अगदी बिहार वा केरळ, सुधाताईंनी गरज पडेल तिथे असंच भरीव काम उभं केलं. विशेषत: महिलांमध्ये, त्यांच्या हक्कांविषयी जागरूकता निर्माण करत त्यांना त्यांचे अधिकार मिळवून दिले. पण हे झालं त्यांच्या सामाजिक योगदानाबद्दल. त्यांच्या व्यक्तिगत जीवनाविषयी काय सांगाल, असं विचारल्यावर झेलमताई म्हणाल्या,

''आई ही स्वतंत्र विचारांची होती. तिचं वागणं अतिशय शिस्तबद्ध होतं. तिच्या वागण्या-बोलण्यात मोकळीक असायची. पण खोटं बोललेलं तिला अजिबात आवडायचं नाही. तिचा कायम हाच आग्रह असे, की वाकड्या-तिकड्या वाटा काढण्यापेक्षा मनात जे काही आहे ते सगळं खरं सांगावं. ती स्वत: तशीच होती. मला आठवतंय, लहानपणी एकदा घरातला एक रुपया चोरीला गेला. तिनं आम्हाला त्याबाबत विचारलं. मी आणि भावानं 'माहीत नाही' असं उत्तर दिलं. तिचं काही या उत्तरानं समाधान झालं नाही आणि 'खरं कळल्याशिवाय मी तोंडात अन्नाचा एक कणही घेणार नाही,' असं म्हणत तिनं चक्क दिवसभर उपवास केला. खरं तर भावानंच त्या पैशाचं चॉकलेट आणून खाल्लं होतं. पण आई ओरडेल म्हणून तो काहीच बोलला नव्हता. आईनं स्वत:ला दिलेली शिक्षा पाहून शेवटी भावाला आपली चूक कबूल करावीच लागली. आईची पद्धतच होती ही. एखाद्या चुकीसाठी तिनं आम्हाला कधीच शिक्षा केली नाही. पण तिच्या सूचक वागण्यातून आमच्या डोक्यात ती गोष्ट अतिशय ठळकपणे साठवली जायची.

''दुसरं म्हणजे, लहानपणापासूनच हे करू नको, ते करू नको अशी जबरदस्ती आई आणि बाबा दोघांनीही आमच्यावर कधी केली नाही. आम्हाला जे आवडेल ते करायला मोकळीक असायची. असं असूनही त्यात एक 'पण' असायचा. म्हणजे आईच्या पद्धतीनंच घरात काही गोष्टी झाल्या पाहिजे असा एक आग्रह असायचा. तिच्या या वागण्यामुळे आम्ही तिला 'डिक्टेटर' असंच नाव ठेवलं होतं.

''एक माणूस म्हणून सांगायचं तर आई सगळ्या गोष्टींत आनंद मानणारी होती. तिच्याकडे तेवढा वेळ नसायचा, पण तिला पुरणपोळी करायलाही आवडायचं, खिमा-पॅटिस करायलाही आवडायचं. मी लहान असताना ती स्वत: घरी कापड आणून माझ्यासाठी फ्रॉक शिवायची. भरतकाम करायची, स्वेटर विणायची. तिला सगळ्याची हौस होती. प्रत्येक गोष्टीचा ती मनसोक्त आनंद

लुटायची. नदी किंवा समुद्र दिसला की पटकन त्यात उडी मारून पोहायची. पहिला पाऊस पडला की जिथे असेल तिथून पावसात तिनं भिजायलाच पाहिजे. तिला बर्फात लोळायला खूप आवडायचं. बाबा गेल्यावर आई काही काळ भावाकडे अमेरिकेत होती. त्या हिवाळ्यात तिनं बर्फात खेळण्याचा मनसोक्त आनंद लुटला. समोर आलेला प्रत्येक क्षण आनंदात जगायचं हे तिच्यामुळेच आम्ही शिकलो.''

एखाद्या कठीण प्रसंगात घाबरून न जाता, स्वत:चं डोकं शांत ठेवून त्यातून मार्ग काढण्यात सुधाताई तरबेज होत्या. त्याविषयी झेलमताई सांगतात, ''आईच्या कामात लक्ष्मण नावाचा एक मुलगा होता. त्याची बायको गरोदर होती. तिच्या कळा सुरू झाल्या. पण हॉस्पिटलमधून ॲम्ब्युलन्स यायच्या आधीच ती बाळंत झाली. आईनं वेळ न घालवता नर्सला फोन करून ती नाळ कशी कापायची हे विचारलं, ती नाळ नीट कापली आणि ॲम्ब्युलन्स यायच्या आधी ते बाळ आईच्या हातात दिलं! तिच्या या प्रसंगावधानाचं कौतुक करावं तेवढं थोडंच.

''एकदा बाबांबरोबर प्रवास करताना वाटेतच तिची चप्पल तुटली. आपल्या बॅगेतून सुई-दाभण काढून तिनं चप्पल शिवून टाकली. 'लोक काय म्हणतील?' याची भीती तिनं कधीच बाळगली नाही. तिच्या स्वभावातील हा बिनधास्तपणा तिला आजोबांकडून मिळाला होता असं मला वाटतं. तिचे वडील तसेच होते. बिनधास्त, मनमोकळे. म्हणजे समोर येईल त्याला भिडायचं, घाबरून मागे वळायचं नाही.''

बाबा राजकारणात आणि आई समाजकारणात रुळली असल्यानं त्यांचं काम तसंच सततचे दौरे घडत असले तरी मुलांमध्ये आणि त्यांच्यात कधी दुरावा निर्माण झाला नाही. कारण मुलांनी आई-बाबांच्या या भूमिका लहानपणापासून स्वीकारल्या होत्या, अगदी मनापासून!



सुधाताई आणि झेलम परांजपे

''आई-बाबा अमेरिकन काँग्रेसचा अभ्यास करण्यासाठी वर्षभर अमेरिकेत होते. त्यावेळी मी ९ वर्षांची आणि भाऊ ३ वर्षांचा असेल. पण या काळात आईची आम्हाला अजिबात कमतरता भासली नाही. किंवा त्यांची आठवण काढून आम्ही रडत बसलोय असंही मला काही स्मरत नाही. त्यावेळी पत्रांतून संवाद व्हायचा आणि आजी-आजोबा आई-बाबांच्या भूमिकेत चपखल बसल्यानं त्यांची कायम 'सोबत' असायची.'' झेलमताई नमूद करतात.

बायको म्हणून नवऱ्याचा कायम मान राखणाऱ्या सुधाताईंनी वेळप्रसंगी त्यांच्या चुकांवरही बोट ठेवताना मागेपुढे पाहिलं नाही. ''बाबांचा स्वभाव रागीट. त्यामुळे ते पटकन चिडायचे. एकदा घरी असंच विचित्र वेळेला एक माणूस एक विचित्रच काम घेऊन आला. बाबा खूप संतापले आणि मोठ्यानं त्याच्यावर ओरडू लागले. खरं तर अतिराग हा तब्येतीसाठी वाईटच. आई स्वयंपाकघरातून धावत बाहेर आली आणि बाबांवर त्यांच्यापेक्षा मोठा आवाज चढवत 'तू गप्प बस' म्हणाली आणि त्या माणसालाही 'चालते व्हा' असं दरडावत घराबाहेर काढलं. थोड्याच वेळात गरम झालेलं घरातलं वातावरण शांत झालं.'' झेलमताईंनी सांगितलेली ही आठवण सुधाताईंच्या गरज पडेल तिथे कठोर बनणाऱ्या स्वभावाचं दर्शन घडवणारीच म्हणावी लागेल.


जन्मभर नृत्यातून समाजबदलाचा प्रयत्न करणाऱ्या सुधाताईंचं जीवन हे जितकं स्थिर तितकंच प्रवाही होतं. आपल्याबरोबरच्या माणसांमध्ये कायम चैतन्य फुलवणाऱ्या सुधाताई आपल्या शेवटच्या दिवसांत तितक्याच आनंदी होत्या. झेलमताई सांगतात, ''आईचं केवळ वय वाढलं म्हणून ती हे जग सोडून गेली नाही. तिला 'मायस्थिनिया ग्रॅवीस' नावाचा एक आजार झाला होता. ज्यामुळे तिचे स्नायू हळूहळू कमकुवत होत होते. तिचं चालणं-बोलणं मंदावलं होतं आणि तिला हे माहीत होतं की यामुळेच आपण मरणार आहोत. डॉक्टरांनीही तिच्या फुप्फुसाचे स्नायू एकदम एकेदिवशी बंद पडतील, तिचा श्वास बंद पडेल याची पूर्वकल्पना दिली होती. तिचे औषधोपचार सुरू होते. पण त्याचा कितपत उपयोग होईल हे डॉक्टरांनाही माहीत नव्हतं आणि आम्हालाही. खरं तर आमच्यासाठी ही मानसिक तयारी करणं अवघड जात असलं तरी आईनं त्याचं ओझं मनावर कधीच बाळगलं नाही. किंबहुना मृत्यूची कल्पना असूनही ती कधी निराश झाली नाही. 'हे माझ्याच बाबतीत का?' असं दूषणही तिनं कधी आपल्या नशिबाला लावलं नाही. या काळातही तिनं स्वत:ला स्थिर ठेवलं होतं. शेवटपर्यंत तिचा मूड चांगला होता. हे कठीण असतं खूप. जायच्या १५ दिवस आधी ती हॉस्पिटलमध्ये होती आणि ३ दिवस घरी होती. आम्हाला कुणालाच वाटलं नाही की ती इतक्या लवकर आम्हाला सोडून निघून जाईल. पण तिनं जणू ठरवलंच होतं की बिछान्याला खिळून राहायचं नाही. आणि.... ती गेली.... आम्हाला सोडून दूर निघून गेली. तिच्या जाण्यानं निर्माण झालेली पोकळी ही खरं तर कधीही भरून येणार नाही. पण एक खरं, की तिला जे आयुष्य मिळालं ते ती छान जगली. लवकर गेली. पण योग्यवेळी गेली... ''

**– सविता अमर**
भ्रमणध्वनी ९९६९३८७६१४
savita.amar@gmail.com

ग्रंथपरिचय

# ॲन अनसर्टन ग्लोरी - इंडिया अँड इट्स कॉन्ट्रॅडिक्शन्स

डॉ. अनंत पां. लाभसेटवार




जीन ड्रेझ व अमर्त्य सेन या लेखकद्वयीनं भारताच्या आर्थिक परिस्थितीवर व देशाच्या अनास्थेवर लिहिलेला हा संशोधन ग्रंथ अतिशय मोलाचा आहे. भारतानं नेत्रदीपक प्रगती जरी केली तरी ती अपुरी का ठरली यावर त्यांनी या ४३४ पृष्ठांच्या ग्रंथात प्रकाश टाकला आहे. मी गेल्या जुलैमध्ये भारतात आलो तेव्हा डॉ. सेन या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ देशात आले होते. नोबेलप्राप्त व भारतरत्नमंडित सेन बहुतेक देशवासियांना ठाऊक आहेत. या असामान्य अर्थतज्ज्ञानं आपल्या दौऱ्यात अनाहुतपणे नरेंद्र मोदींवर टीकास्त्र सोडलं आणि राजकीय मोहोळ डिवचल्यासारखं झालं. प्रसारमाध्यमांनी या ग्रंथाऐवजी त्यांच्या राजकीय मतांवरच शाई आणि वाणी खर्च केली.

या बोलबाल्यामुळे मी अमेरिकेत परतताच महाजालावर जाऊन हा ग्रंथ विकत घेतला. तो आला त्या दिवशी मी विमानतळावर जात होतो. त्यामुळे मी तो विमानात बसून वाचायला घेतला. यावरून माझ्या वाचनप्रक्रियेला 'उंची' लाभली हे सांगणं नकोच. मला लगेच कळून चुकलं की हा ग्रंथ कॉलेजच्या प्राध्यापकांसाठी किंवा विद्यार्थ्यांसाठी नसून आपल्यासारख्या सामान्य वाचकांसाठी आहे. तो लिहिताना त्यांनी अर्थशास्त्राच्या क्लिष्ट संज्ञा हेतुपूर्वक टाळल्या, त्यामुळे ग्रंथ वाचनीय तर झालाच, शिवाय वाचकांचं उद्बोधनही होतं हे विशेष.

स्वातंत्र्य मिळाल्यावर भाषिक, धार्मिक व जातीय भेदांमुळे देशाची शकलं होतील असं भाकीत खुद्द चर्चिलनी नव्हे तर अनेक तज्ज्ञांनी केलं होतं. आपण स्वातंत्र्याचा ६७ वा वर्धापनदिन साजरा करून या सर्वांना खोटं पाडलं हे फार महत्त्वाचं आहे. एवढंच नव्हे, तर देशात अभिव्यक्ती व विचारस्वातंत्र्य, स्वायत्त प्रसारमाध्यमं व न्यायव्यवस्था टिकली ही फार भूषणावह गोष्ट आहे हे लेखक नमूद करतात. जगातल्या अनेक देशांना हे जमलं नाही. म्हणून याचा रास्त अभिमान बाळगणं ही आत्मगौरवात्मक गोष्ट नाही, तर ते एक सत्य आहे.

या स्वातंत्र्याचा आपण जनकल्याणासाठी कसा व किती उपयोग केला ही गोष्ट वादग्रस्त आहे. सर्वसामान्य मनुष्य आर्थिक वाढ व विकास या गोष्टी एकच समजून गोंधळात पडतो. या दोन गोष्टी अतिशय वेगळ्या आहेत. हे लेखकांनी पुस्तकाच्या पहिल्या भागात अधोरेखित केलं आहे. अडचणीच्या परिस्थितीतही देशानं जगात दुसऱ्या नंबरचा वाढदर गाठला हे काही येऱ्यागबाळ्याचं काम नव्हे. पारतंत्र्यात आपली वाढ दरवर्षी १% पेक्षा कमी दरानं झाली. मग स्वातंत्र्योत्तर काळात १९८०च्या दशकात ती ३.३% होती. पण मुक्तिकरण व खाजगीकरण झाल्यावर ती ७.६% वर गेली. त्यामुळे देशात प्रचंड अर्थनिर्मिती झाली व तिजोरी फुगली. देशाचं राष्ट्रीय ढोबळ उत्पन्न (GDP) वर गेलं. वाढत्या लोकसंख्येमुळे दरडोई राष्ट्रीय उत्पन्नात कमी प्रमाणात वाढ झाली एवढंच.

आता विकासाकडे (development) लक्ष द्या. हा प्राणी अर्थवाढीपेक्षा अगदी वेगळा. विकास म्हणजे पायाभूत सुविधांची बांधणी, मुबलक वीज व पाणीपुरवठा, शैक्षणिक व आरोग्यसेवेची उपलब्धी. त्या सर्वांमुळे राहणीमान उंचावतं व माणसाला माणूस म्हणून राहता येतं. दारिद्र्य कमी होऊन मध्यमवर्ग वाढतो. हे सर्व अर्थातच सत्ताकर्त्यांनी आयोजित केलेल्या कल्याणकारी योजनांवर व धोरणांवर अवलंबून असतं. खेदाची गोष्ट म्हणजे या बाबतीत आपले धोरणकर्ते अपयशी ठरले. चीननं खाजगीकरण व उदारीकरणामुळे निर्माण झालेला पैसा वंचितांच्या विकासासाठी यशस्वीपणे वापरून देशाचं राहणीमान वाढवलं तर आपण तो पैसा उधळला. मतपेटीवर लक्ष ठेवून प्रासंगिक व पैसेखाऊ योजना आखल्या व सवलतीचं प्रमाण (subsidies) वाढवलं. परिणामी,

जागतिकीकरणाची फळं त्या देशात तळागाळापर्यंत पोचली तर आपल्या देशात या सुविधा खालपर्यंत झिरपल्या नाहीत. हे आपल्या देशातील आर्थिक विषमतेचं व जनप्रक्षोभाचं प्रमुख कारण आहे.

देशाच्या प्रगतीचं मोजमाप मानवी विकास निर्देशांकावरून (Human Deveelopment Index) करण्यात येतं. या निर्देशांकाचे घटक परिमाण लक्षात घेऊन लेखकांनी आपण जगाच्या किती मागे आहोत हे अधिकृत आकडेवारी परिश्रमपूर्वक गोळा करून वाचकांच्या निदर्शनास आणलं. वीज व पाणी टंचाई ही मानवी विकासाची काही ठळक परिमाणं. मात्र जवळजवळ ३३% भरतीय लोकांना अजूनही वीज मिळत नाही. चीनमध्ये तेच प्रमाण १% पेक्षा कमी आहे. त्या देशात भारनियमनही नाही. आपल्याकडे दरवर्षी येणारं पाण्याचं दुर्भिक्ष तर सर्वांच्या परिचयाचं आहे. या सर्वच बाबतीत चीन एवढ्या पुढे आहे की तो देश पहिल्या वर्गात मोडतो तर आपला देश अनेक बाबतींत चौथ्या वर्गात ढकलला जात आहे.

यावरून महत्त्वाचा प्रश्न उद्‌भवतो, की आपण लोकशाहीचा त्याग करून चीनच्या साम्यवाद–भांडवलशाहीचं मॉडेल स्वीकारावं का? शेवटी जागतिक दारिद्र्यरेषेखाली म्हणजे दिवसाकाठी १.२५ डॉलर किंवा ७५ अवमूल्यित रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या आपल्या ८०% प्रजेला नुसतं विचार किंवा अभिव्यक्तीस्वातंत्र्य दिल्यानं त्यांचं पोट कुठे भरतं? नेहरूंनी सुरुवातीला संमिश्र अर्थव्यवस्था देशात उभारण्याचं कारण ते तत्कालीन महासत्ताक राष्ट्राची झूल पांघरलेल्या सोव्हिएत युनियनच्या प्रगतीनं झपाटून गेले होते, हे नव्हतं का? म्हणून आता चीनचं अनुकरण करण्याचा मोह होणं साहजिक आहे. पण असं करणं महाचूक होईल असा निःसंदिग्ध निर्वाळा लेखकांनी दिला. लोकशाहीच्या चौकटीतूनच आपण प्रगती करू शकतो असं ठाम मत त्यांनी व्यक्त केलं आहे.

काही काही मानवी विकास निकषांत आपण चीन तर सोडाच पण आपल्या कुशीत बसलेल्या बालकासमान बांगलादेशाच्या मागे आहोत हे अनेकांना ठाऊक नाही. दरडोई राष्ट्रीय ढोबळ उत्पन्न त्या देशापेक्षा आपल्या देशात चौपट असलं तरी महिला साक्षरतेचं, लसीकरणाचं व आधुनिक संततिनियमनाच्या साधनांच्या वापराचं प्रमाण भारतापेक्षा त्या मुस्लीम देशात जास्त आहे. आज प्रजोत्पादन दर आपल्या देशात २.६% तर बांगलादेशात २.२% आहे, संततिनियमनाची योजना जगात सर्वांत अगोदर आपल्या देशात स्थापन करूनही. स्वच्छतेच्या बाबतीत तर तुलनाच करता येत नाही. भारतातली आजही ५०% प्रजा उघड्यावर जाऊन पोट रिकामं करते. तर तेच प्रमाण आपल्या शेजाऱ्यात ८.४% आहे, याला काय म्हणावं?

शिक्षणाची दुरावस्था तर सर्वांनाच ठाऊक आहे. २०च्या आकड्याला पाचानं भागलं तर काय उत्तर मिळतं हे शून्याचा शोध लावणाऱ्या देशातील ४५% चौथी व पाचवीतले विद्यार्थी सांगू शकत नाहीत. कागद चुरगाळला तर त्याचं वजन वाढतं का, या प्रश्नाला ५०% विद्यार्थी बरोबर उत्तर देऊ शकत नाहीत. आपल्या देशातील शिक्षकांचे पगार चीनपेक्षा जास्त असूनही ५०% शाळांत मास्तर हजेरी लावत नाहीत.

आपण सामाजिक विषमतेविषयी नेहमी टाहो फोडतो. पण समतेचा रस्ता शिक्षणातून जातो व ज्ञानाचं गांडीव वापरल्याशिवाय संपत्तीचा अश्वमेध होत नाही हे माहीत असूनही शिक्षणाची अशी हेळसांड का? शिक्षणापासून वंचित राहिलेला माणूस क्वचितच श्रीमंत व श्रीमान होतो.

जे शिक्षणाचं तेच आरोग्यसेवेचं. लेखकांनी पुस्तकाचा तिसरा भाग देशातील आरोग्यसेवेला वाहिलेला आहे. त्यांनी रेखाटलेलं चित्र फार चिंताजनक आहे. कुपोषणाचं व बालमृत्यूचं प्रमाण भारतात सर्वाधिक आहे. आपलं सरासरी आयुर्मानही बांगलादेशापेक्षा कमी आहे. मग चीनशी तुलना करण्यात काय अर्थ? याचं कारण आपल्या देशात अर्थनिर्मिती होऊन सरकारचं कररूपी उत्पन्न अनेक पटींनी वाढलं तरी आपण राष्ट्रीय ढोबळ उत्पन्नाचा फक्त १.२% भाग तर चीन २.७% आरोग्यावर खर्च करतो. समान क्रयशक्तीच्या चलनाच्या (Purchasing Power Parity, PPP) व्याख्येत


## सुधारीत आवृत्त्या




**हुमान**

**संगीता उत्तम धायगुडे**

**नियतीनं घातलेली हुमानं सोडवत स्वतःला सिद्ध करणाऱ्या स्त्रीचे आत्मकथन**

**मूळ किंमत ३५० रु.**
**सवलतीत २०० रु.**




**मे आय कम इन...?**

**कु. तन्वी दिनेश डोके**

**अपंगत्वावर मात करणाऱ्या एका मुलीचे अनुभवकथन**

**मूळ किंमत १२५ रु.**
**सवलतीत ७५ रु.**

आपण दरवर्षी दरडोई फक्त ३९ डॉलर आरोग्यसेवेवर खर्च करतो तर चीन २०३ आणि ब्राझील ४८३ डॉलर आपल्या देशात गोरगरिबांसाठी प्राथमिक आरोग्य केंद्र (Primary Health Centre) खेड्यापाड्यातून स्थापन केली. पण तिथे वीज किंवा दूरध्वनी तर सोडाच, डॉक्टरही सापडत नाही. ते सरकारी पगार वसूल करून खासगी प्रॅक्टिस सुरू करतात. साधनं नसतील तर सिद्धी कशी होईल?

या दयनीय स्थितीला कोण कारणीभूत आहे याचीही लेखकांनी सविस्तर चर्चा या पुस्तकात केली आहे. या अधोगतीच्या मुळाशी पैशांचा किंवा कौशल्याचा अभाव नसून उत्तरदायित्वाची वानवा आहे असं ते म्हणतात. देशात पैशांची कमतरता व बौद्धिक दुर्भिक्ष नाही हे सर्वांना ठाऊक आहे. चुका सर्वच करतात. देव देखील. पण त्याला काय व कोण कारणीभूत हे माहीत नसल्यामुळे सुधारणा करणं अशक्यच. अशा स्थितीत अपयशास कुणाला वेठीला धरणार?

हे मुंबईतल्या खड्ड्यांवरून सिद्ध होतं. दरवर्षी पावसाळा आला की हे अरिष्ट मुंबईवर कोसळतं. पण महापालिकेत नेमका कुठला अधिकारी खड्डे बुजवण्यास जबाबदार आहे हे शोधून काढण्यात कुणाला अजून यश आलं नाही. अमेरिकेत त्यास महापौर जबाबदार असतात. पण अशी निःसंदिग्धता भारतात सापडत नाही. जुलै ३०-३१, २०१२ रोजी देशातले ६० कोटी लोक एकदम अंधारात बुडाले. पण या महादुर्घटनेस कोण जबाबदार त्याचा शोध अजून लागला नाही. त्यामुळे कुठल्या नोकरशहाला उत्तरदायी ठरवावं याविषयी जनता अनभिज्ञ आहे. किंबहुना हे लपवून ठेवण्यात आपली नोकरशाही व राजकारणी निपुण आहेत.

या उत्तरदायित्वाच्या अभावामुळेच भ्रष्टाचाराला चेतावणी मिळते. परतावा जास्त व धोका कमी असलेल्या या व्यवसायाला वेसण घालणं उत्तरदायित्वाशिवाय शक्य नाही. त्यासाठी लेखक आधुनिक तंत्रज्ञानाचा व प्रसारमाध्यमांचा वापर, सत्तेचं विकेंद्रीकरण आणि माहिती उपलब्धी कायदा (Right to Information) या मार्गांचा उपयोग करावा म्हणजे कारभारात पारदर्शकता येईल असं म्हणतात.

आर्थिक वाढ जगात दुसऱ्या नंबरची बघून काही विख्यात तज्ज्ञांनी आपला देश आर्थिक महासत्ताक राष्ट्र म्हणून लवकरच ओळखला जाईल अशी आत्मगौरवपर विधानं केली. हे निव्वळ कल्पनेचे तारे असून एक थोतांड आहे, असं लेखक म्हणतात. ही अर्थनिर्मिती जनकल्याणार्थ न वापरता हल्ली आपण लष्करी शस्त्रास्त्रांसाठी खर्च करत आहोत. याची चर्चा होणं आवश्यक आहे. देशाला किती संरक्षण लागतं व त्यावर एवढा पैसा उधळणं उचित आहे का याची मीमांसा या पुस्तकात नसली तरी त्याच्या मुख्य विचारधारेशी निगडित आहे. सध्या भारत जगात सर्वात जास्त लष्करी सामग्री आयात करणारा देश म्हणून प्रसिद्ध आहे. आपली ६५% लष्करी भूक आयातीतून भागवली जाते. अन्न, शिक्षण व आरोग्य पुरवण्याऐवजी बंदुकीवर पैसा खर्च होणं किती उचित आहे? आपण निःशस्त्र व्हावं असं कुणी म्हणत नाही. परंतु एखाद्या महासत्ताक राष्ट्राला शोभण्याएवढी सुरक्षायंत्रणा आयात करणं व मानवी विकासाकडे दुर्लक्ष करणं योग्य आहे का, या प्रश्नाला उत्तर शोधणंही महत्त्वाचं आहे.

या ग्रंथानं आपल्याला प्रगती करण्यास किती वाव आहे हे दाखवून मोठं काम केलं यात शंका नाही.

(An Uncertain Glory : India and Its Contradictions
Princeton University Press, 2013)

**– डॉ. अनंत पां. लाभसेटवार**
2 Second Street, Unit # 2001,
Jersey City, N.J. 07302
lalalabh@aol.com

नुकतेच प्रसिद्ध झाले...

ग्रंथाली




**माझ्या काळजाची गोष्ट**

**निसर्गोपचाराची किमया – एक सत्यघटना**

ही कहाणी आहे आधुनिक काळातील, 'ऱ्हुमॅटिक हार्ट डिसिज' या काही हजारांत एखाद्याला होणाऱ्या दुर्धर रोगावर चालू असलेले ॲलोपॅथी उपचार सोडून, फक्त निसर्गोपचार करून जीवदान मिळवणाऱ्या एका वीस वर्षांच्या मुलीची! ह्या मुलीसाठी आईने जीवाची पर्वा न करता केलेल्या परिश्रमांची आणि निसर्गोपचारमहर्षी डॉ. जयनारायण जायस्वाल यांच्या शंभर टक्के खात्रीशीर निसर्गोपचाराची!

**– डॉ. कुमुद बेदरकर**
निसर्गोपचारतज्ज्ञ

**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत ९० रुपये**


विज्ञानविलोल

# मुले, मूल्ये आणि पिल्ले

**सुधीर थत्ते**

कोणत्याही सजीवाचे उत्क्रांतीतले 'मूल्य' हे तो नष्ट होण्यापूर्वी आपली किती पिल्ले मागे शिल्लक ठेवून जातो, यावर ठरते. कारण ज्या सजीवाचा वंश जगण्याच्या स्पर्धेत शिल्लक राहतो तोच सजीव उत्क्रांतीच्या व्याख्येनुसार सरस (फिटेस्ट) ठरतो.

उत्क्रांतीच्या युद्धात आपण इतरांपेक्षा सरस ठरावे यासाठी वेगवेगळे सजीव वेगवेगळ्या प्रकारची नीती (स्ट्रॅटेजी) वापरतात. उदाहरणार्थ, डास, फळमाशी, बेडूक यांच्यासारखे प्राणी हे संख्यात्मक नीती वापरतात. ते प्रचंड संख्येने अंडी घालतात. त्यामुळे वेगवेगळे परभक्षक (प्रेडेटर), आजार, योग्य त्या पोषणाचा अभाव अशा विविध संकटांमधून या अंड्यांपैकी बरीचशी अंडी आणि त्यांतून बाहेर पडणारी पिल्ले नष्ट झाली, तरीही थोडीशी पिल्ले पुढच्या पिढीसाठी प्रजनन करण्यास शिल्लक राहून त्या प्राण्यांचा अनुवंश पुढे चालू राहतो. याउलट, हत्ती, देवमासा, माकडे यांच्यासारखे प्राणी हे संगोपनात्मक नीती वापरतात. त्यांच्यात जन्मणाऱ्या पिल्लांची संख्या मर्यादित असते, पण त्या पिल्लांचे संगोपन शक्य तेवढ्या उत्तम प्रकारे केले जाते. त्यामुळे त्यातली जास्तीत जास्त पिल्ले पुढच्या पिढीसाठी प्रजनन करण्यास शिल्लक राहून अनुवंश पुढे चालू राहतो. उत्क्रांतीत (मानवाच्या दृष्टिकोनातून) अधिक प्रगल्भ असणारे प्राणी हे संख्यात्मक नीतीऐवजी संगोपनात्मक नीती वापताना दिसतात.



मानवप्राण्याच्या आजवरच्या इतिहासात बहुतांश काळ मानवाचे प्रजनन हे प्राणी पातळीवरच होते. पूर्वी अनेक जोडप्यांना वीस-पंचवीस मुले होत आणि त्यातली जेमतेम दोन मुले अनुवंश चालू ठेवण्यासाठी शिल्लक राहत. वीस-पंचवीस ही मुलांची संख्या आज आपल्याला कितीतरी जास्त वाटत असली तरी जीवशास्त्राच्या दृष्टीने, वर्षातून एखादे मूल जन्माला घालणारा मानवप्राणी हा आपल्या उत्क्रांतीतल्या पूर्वजांप्रमाणे संगोपनात्मक नीती वापरूनच आपला अनुवंश पुढे चालू ठेवत होता.

गेल्या शतकात विविध वैज्ञानिक शोधांनी या परिस्थितीत क्रांतिकारक बदल झाला. वेगवेगळ्या रोगांवरच्या लशी आणि प्रतिजैविके (अँटिबायोटिक्स) यांच्या शोधांनी साथींमुळे होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण प्रचंड खाली आले. जास्त उत्पादन देणाऱ्या पिकांच्या आणि वाहतुकीच्या साधनांच्या शोधांमुळे दुष्काळ आणि उपासमारीने होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण घटले. त्याच वेळी संततीप्रतिबंधाची विविध प्रभावी साधने उपलब्ध झाल्यामुळे अपत्याला जन्म द्यायचा की नाही, हे ठरवणे शक्य झाले. त्यामुळे अनिर्बंधपणे 'पिल्ले' होण्यापासून नियोजनाने 'मुले' आणण्यापर्यंत मानवाची प्रगती झाली. मानवाचा अनुवंश हा केवळ निसर्गतः होणारे प्रजोत्पादन, येणारी अटळ संकटे आणि त्यातून शिल्लक राहणारी पिल्ले यांचे गणित न राहता, त्यात मानवाच्या इच्छेला, स्वयंनिर्णयाला आणि नियोजनाला महत्त्वाचे

स्थान प्राप्त झाले.

अन्य सर्व प्राण्यांप्रमाणेच मानवप्राण्यालाही उत्क्रांतीचे नियम लागू असले तरी प्रत्येक मानवप्राण्याची वैयक्तिक मूल्ये ही उत्क्रांतीतल्या सरसतेच्या मूल्यापेक्षा वेगळी असतात. त्यामुळेच आपली किती 'पिल्ले' आपला अनुवंश चालू राहण्यासाठी जन्माला घालायची, या प्रश्नाचे मानवप्राण्यांच्या वेगवेगळ्या समूहांचे उत्तर वेगवेगळे असते. हे उत्तर 'शून्या'पासून 'होतील तेवढी' इथपर्यंत कोणतेही असू शकते. या उत्तरांच्या भिन्नतेतूनच अनेक प्रकारच्या विकृतींचा वर्णपट (डिस्टॉर्शन स्पेक्ट्रम) मानवजातीला भेडसावू लागला आहे. यात एका टोकाला काही मानवसमूह हे उत्क्रांतीच्या संघर्षातून 'स्वेच्छानिवृत्ती' घेत आहेत, तर दुसऱ्या टोकाला अनिर्बंध प्रजननाच्या हव्यासातून काही मानवसमूह हे कायमचे दारिद्र्यचक्रात अडकून राहण्याचा धोका निर्माण झाला आहे!

स्वेच्छानिवृत्ती घेणाऱ्यांमध्ये सर्वात पुढे आहेत, विकसित देशातले आर्थिक दृष्ट्या समृद्ध वर्गातले लोक. अलिकडेच प्रसिद्ध झालेल्या 'रोगनियंत्रण आणि प्रतिबंध केंद्रा'च्या अहवालात अमेरिकेतल्या पंधरा ते एकोणतीस वयोगटातल्या स्त्रियांमध्ये मूल जन्माला घालण्याच्या प्रमाणात नऊ टक्क्यांनी घट झाल्याची नोंद आहे. तर याच वयोगटातल्या स्त्रियांमध्ये छोटी कुत्री पाळण्याच्या प्रमाणात साधारण तेवढीच वाढ झाली आहे, असे पाळीव कुत्र्यांसाठी विविध उत्पादने बनवणाऱ्यांच्या अमेरिकन संघटनेच्या अहवालात म्हटले आहे. किंबहुना, या वयोगटातल्या अनेक स्त्रिया 'आपण मूल जन्माला घालण्यापेक्षा कुत्रा पाळणे अधिक पसंत करतो', असे उघडपणे सांगतात. 'कुत्रं मला मुलापेक्षा जास्त आवडतं', यापासून तर 'कुत्रं पाळणं मूल वाढवण्यापेक्षा सोपं आहे. मजा असेल तोपर्यंत पाळलं, नाही तर केलं परत!' इथपर्यंत विविध कारणे यासाठी या स्त्रिया देतात. यातल्या बऱ्याच जणींचा मूल कधीच जन्माला घालण्याचा विचार नाही. ही सर्व मंडळी प्रजननातून तात्काळ स्वेच्छानिवृत्ती घेत आहेत. त्यांचा अनुवंश त्यांच्याबरोबरच थांबला तरी त्यांना त्याची फिकीर नाही.



स्वतःच्या ध्येयाच्या दिशेने प्रगती करण्याच्या आड येऊ नये म्हणून मूल जन्माला न घालण्याचा निर्णय अनेक व्यक्ती घेतात. हे ध्येय जर वैयक्तिक भोगवादी कामनांपुरतेच मर्यादित असेल तर ही मंडळीही तात्काळ स्वेच्छानिवृत्ती घेणाऱ्यांमध्येच जमा होतात. पण हे ध्येय जर सामाजिक कल्याणासाठी काहीतरी वेगळे करण्याचे असेल तर मात्र ही मंडळी उत्क्रांतीच्या दृष्टीने महत्त्वाचे कार्य करत असतात. ते आपल्या समाजाची उत्क्रांतीतली दीर्घकालीन सरसता (लाँगटर्म फिटनेस) वाढवण्यास मदत करतात. उदाहरणार्थ, आयझॅक न्यूटन, फ्लोरेन्स नाइटिंगेल, मदर टेरेसा किंवा अब्दुल कलामांसारख्या व्यक्ती अविवाहित राहिल्याने पुनरुत्पादनात प्रत्यक्ष सामील झाल्या नाहीत तरी त्यांच्या कार्यामुळे समकालीन आणि भविष्यकालीन समाजातल्या व्यक्तींच्या जीवित राहण्याच्या क्षमतेत कितीतरी भरच पडली.

पण हे दोन्ही वर्ग टप्प्या-टप्प्याने उत्क्रांतीच्या स्पर्धेतून स्वेच्छानिवृत्ती घेणाऱ्यांच्या तुलनेत छोटे आहेत. सध्या जगातल्या विकसित देशांपाठोपाठ विकसनशील देशांमध्येही एकच अपत्य जन्माला घालणाऱ्या स्त्रियांची संख्या झपाट्याने वाढते आहे. अशा व्यक्तींचा अनुवंश पुढच्या पिढीत चालू राहिला तरी पुढच्या पिढीत त्यांच्या वंशातल्या व्यक्तींची संख्या निम्मी होते. हे असेच चालू राहिले तर दहा पिढ्यांनंतर अशा एक अब्ज व्यक्तींच्या वंशात अवघे दहा लाख लोक शिल्लक राहतील, तर हजार वर्षांनी बहुधा एकच व्यक्ती! हा काळ आजच्या आपल्या आयुष्यमानाच्या तुलनेत मोठा असला तरी मानववंशाच्या इतिहासाच्या दृष्टीने अगदी छोटा आहे. किंबहुना, अगदी याच शतकाच्या अखेरीला पश्चिम युरोपातल्या लोकांची संख्या ४६ कोटींवरून घटून ३५ कोटींवर येईल असा अंदाज आहे.

दुसऱ्या टोकाला, धार्मिक श्रद्धा, प्रतिकूल परिस्थिती किंवा अज्ञान यांमुळे जगातल्या अनेक मानव-समूहांमध्ये प्रजनन हे अनिर्बंधपणे चालू आहे. कमी जन्मदर असणाऱ्या जर्मनी, जपान, सिंगापूर, हाँगकाँग यांच्या तुलनेत नायजर, अफगाणिस्तान, युगांडा, झांबिया या देशांचा जन्मदर हा सहा-सातपट जास्त आहे. खुद्द एकाच देशातल्या वेगवेगळ्या जनसमूहांच्या जन्मदरामध्येही असाच मोठा फरक आहे. जास्त जन्मदरामुळे या जनसमूहांमध्ये जन्माला आलेल्या मुलांना दारिद्र्यात आणि प्रतिकूल परिस्थितीत जगावे लागते.

अलिकडेच पेन स्टेट विद्यापीठाचे डॅनिएल नॉटरमन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दारिद्र्य आणि प्रतिकूल परिस्थिती यांचे मुलांवर काय परिणाम होतात, याचा जनुकशास्त्रीय अभ्यास केला. यासाठी त्यांनी अनुकूल आणि प्रतिकूल परिस्थितीत जगणाऱ्या नऊ वर्षे वयाच्या मुलांच्या पेशींमधल्या गुणसूत्रांचे परीक्षण केले. तेव्हा त्यांना प्रतिकूल परिस्थितीत जगणाऱ्या मुलांच्या गुणसूत्रांमधल्या जनुकांचे रक्षण करणाऱ्या टेलोमिअरांची झीज प्रचंड प्रमाणात झालेली दिसली. नऊ वर्षांच्या या मुलांच्या शरीरातल्या पेशी जनुकीय पातळीवर वीस ते तीस वर्षांनी जास्त म्हाताऱ्या झालेल्या होत्या. याचा दुष्परिणाम त्या मुलांच्या सर्व शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक क्षमतांवर होतो. त्यामुळे ती सर्वच बाबतीत इतरांच्या मागे पडतात. त्यांना योग्य ते शिक्षण आणि चांगल्या संधी यांच्यापासून वंचित राहावे लागते. ती मुले मोठी झाल्यावर दारिद्र्यात आणि गुन्हेगारीत अडकण्याची शक्यता वाढते. त्यांचे आणि परिणामी त्यांच्या बायको-

मुलांचे कौटुंबिक जीवन अडचणींचे आणि दुःखद बनते. यातून त्यांची पुढची पिढीही पुन्हा दारिद्र्यचक्रातच अडकलेली राहते. या चक्रातून बाहेर पडण्यासाठी त्यांना आर्थिक मदत करूनही फारसा फायदा होत नाही.

अशा रीतीने परस्परविरुद्ध विचार करणारे जनसमूह ही मानवजातीसमोर निर्माण होणारी नवी समस्या आहे. या समस्येचे उत्तर निसर्गतः आपोआप सापडणार नाही का? नक्कीच सापडेल. पण निसर्गतः सापडलेले उत्तर मानवाला सुखद आणि स्वीकारार्ह असेलच, असे नाही. कारण निसर्गाच्या दृष्टीने मानव हा इतर अनेक प्राण्यांप्रमाणेच उत्क्रांतीच्या प्रवासात निर्माण झालेला केवळ एक प्राणी आहे. मानवजात पृथ्वीवर शिल्लक राहिली की नाही, यालादेखील निसर्गाच्या दृष्टीने काही किंमत नाही! आजवर अशा अब्जावधी जीवजाती या पृथ्वीतलावर निर्माण झाल्या आणि संपल्याही!

पण मानवाच्या दृष्टीने मानवी जीवन सर्वात महत्त्वाचे आहे. त्यामुळे ही समस्या सोडवण्याची दिशा ठरवण्यासाठी सजीवांना लागू पडणाऱ्या निसर्गाच्या नियमांकडेच वळणे मानवाला भाग आहे.

जीवशास्त्राच्या नियमांप्रमाणे कोणत्याही सजीवाचे प्रजनन हे त्याच्या जीवनेतिहासावर अवलंबून असते. प्राणी प्रजननक्षम होण्याचे वय, तो प्रजननक्षम असण्याचा कालखंड आणि वयानुसार त्याची घटणारी क्षमता, एका वेळी तो किती पिल्लांना जन्म देतो, जन्मल्या-जन्मल्या त्याची पिल्ले किती समर्थ असतात या गोष्टींचा जीवनेतिहासात समावेश होतो. जीवशास्त्रज्ञांनी गमतीने 'डार्विनीय कल्पितभूत' (डार्विनियन डेमॉन) या नावाचा सजीव कल्पिला आहे. उत्क्रांतीच्या दृष्टीने या सजीवाचा जीवनेतिहास 'आदर्श' असतो. म्हणजे, जन्मल्यावर लगेचच तो प्रजनन करू लागतो, तो कायम प्रजननक्षम राहतो, त्याला म्हातारपण किंवा नैसर्गिक मृत्यू नसल्याने त्याची प्रजननक्षमता सर्वकाळ कायम राहते, तो एका वेळी वाटेल तेवढ्या पिल्लांना जन्म देऊ शकतो, जन्मताच त्याची पिल्ले पूर्णपणे समर्थ असल्यामुळे त्यांच्या संगोपनात त्याला एक क्षणही वाया घालवावा लागत नाही. डार्विनीय कल्पितभूताचे गुण बऱ्याच प्रमाणात विषाणूंमध्ये आहेत. पण त्यांना जगण्यासाठी पेशींचा आधार लागतो, त्यामुळे विषाणूंची संख्या प्रचंड असली तरी अन्य सजीवांना नष्ट करण्यापर्यंत त्यांची मजल गेलेली नाही.

मानव एक सजीव असल्यामुळे त्याचे प्रजननही त्याच्या जीवनेतिहासावर अवलंबून असते. शारीरिक पातळीवर मानवाचा जीवनेतिहास हा खरे तर अनादर्श ठरतो. पण मानवी मेंदूच्या बौद्धिक क्षमतांमुळे मानवाने आपल्या प्रजनन-वैगुण्यांवर मात केली आहे. पण याच मेंदूच्या क्षमतांमुळे मानवाच्या वैचारिक आणि भावनिक पातळीवर घडणाऱ्या गोष्टींनाही जीवनेतिहासात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

मानवावर विशेषतः लहानपणी होणाऱ्या संस्कारांमधून त्याची वैचारिक आणि भावनिक घडण होते. आई-वडिलांमधील भावनिक दुरावा, भांडणे आणि घटस्फोट यांमधून मुलांच्या मनात लग्न आणि त्यातून मिळणाऱ्या सहचराविषयी नकारात्मक भावना रुजतात. होणारी मुले ही आनंदाचा ठेवा वाटण्याऐवजी अनावश्यक लोढणे वाटते. एके काळी साथीच्या रोगांमध्ये आई-वडिलांपैकी कोणीतरी मेल्यामुळे मुलांना सावत्र वडील किंवा आईबरोबर राहावे लागे. आज आई-वडिलांमध्ये एकमेकांशी जुळवून घेण्याचे शहाणपण नसल्यामुळे अमेरिकेत पंधरा ते वीस टक्के मुलांना सावत्र आई किंवा वडिलांबरोबर राहावे लागते. या सगळ्याचा परिणाम मुलांना लग्न आणि कुटुंब या संस्थांविषयी अनास्था आणि अनादर वाटण्यात होतो. त्याचबरोबर, लग्न न करता एकत्र राहण्यामुळे वैयक्तिक कामवासनापूर्तीची गरज भागली तरी मुलांना जन्म देण्याइतका विश्वास वाटत नसल्याने मुले जन्माला न घालण्याचाच निर्णय होतो.

आपल्याकडे आज परिस्थिती इतकी वाईट नसली तरी वेळीच सावध होऊन योग्य ती मूल्ये समाजात रुजवण्याची गरज आहे. लहानपणापासून कुटुंबसंस्थेचे फायदे मुलांना मिळतील आणि त्याचा त्यांच्यावर चांगला संस्कार होईल याची खबरदारी पालकांनी घ्यायला हवी. एकांगी वृत्तीने केवळ पैसे किंवा करियरच्या मागे धावण्याऐवजी जीवनात समतोल राहील, यासाठी प्रयत्न करायला हवेत. आपला अनुवंश चालू राहण्यासाठी दोन तरी अपत्यांना जन्म देऊन त्यांचे उत्तम रीतीने संगोपन करणे हे आपले कर्तव्य आहे, याची जाणीव निर्माण करायला हवी.

याउलट, दारिद्र्यचक्रात सापडलेल्यांना त्यांच्या धार्मिक श्रद्धा आणि अज्ञानाच्या बंधातूनही बाहेर पडायला मदत करायला हवी. यासाठी त्यांच्यावर निधर्मीपणाचे आणि समतेचे संस्कार करायला हवेत. त्यांना विज्ञानदृष्टी द्यायला हवी. त्यांच्यातल्या स्त्रियांना आधुनिक शिक्षण मिळेल याची सोय करायला हवी. स्त्री शिकली आणि कमावती झाली की ती मुलांची संख्या मर्यादेत ठेवते. त्यांना मिळणाऱ्या अनुदानाचा किंवा सवलतींचा उपयोग मुलांची संख्या बेसुमार वाढवण्याकडे होऊन त्यांना पुन्हा दारिद्र्यचक्रात अडकावे लागू नये, यासाठी या मदतीबरोबर मुलांची संख्या दोनवर थांबवण्याचे बंधनही घालायला हवे. कारण मुलांची संख्या मर्यादेत ठेवली तर आणि तरच त्यांच्या पुढच्या पिढीची दारिद्र्याच्या दुष्टचक्रातून सुटका होऊ शकेल. मग नव्या पिढीतली अपत्ये ही प्राणीपातळीवरची पिल्ले न राहता वैज्ञानिक मूल्ये शिकून आधुनिक जगातली समर्थ मुले होतील.


यासाठी विविध भेद बाजूला ठेवून सर्वांसाठी व्यापक धोरण आखण्याची आणि कसोशीने अमलात आणण्याची गरज आहे. अन्यथा, एकीकडे मुलांऐवजी पाळीव कुत्री काही मानवांच्या समृद्ध घरांमध्ये मजेत जगतील आणि दुसरीकडे काही मानवी मुलांवर भुरट्या कुत्र्यापेक्षाही हलाखीचे जिणे जगण्याची वेळ येईल!

**– सुधीर थत्ते**

फ्लॅट नं. ११३, टॉवर ए ६, गोदरेज गार्डन एन्क्लेव्ह,
पिरोजशानगर, विक्रोळी (पूर्व), मुंबई ४००० ०७९
भ्रमणध्वनी ९९८७५८८५८३
sudhirthattey@yahoo.com

# व्यंगचित्रकार श्रीनिवास प्रभुदेसाई

**प्रभाकर वाईरकर, व्यंगचित्रकार**



असं म्हटलं जातं, की कोणत्याही मुलावर त्याच्या वयाच्या १४-१५ वर्षांपर्यंत जे संस्कार होत असतात त्यांचाच परिणाम त्याच्या उर्वरित आयुष्यावर होत असतो. मुलं घडवण्यात त्याच्या आईवडिलांचा, नातेवाईक आणि शिक्षक यांचा वाटा ७०-८० टक्के असला तरीही २०-३० टक्के वाटा हा समाजाचा असतो.

लहान मूल हे एखाद्या रोपट्याप्रमाणे वाढत असतं. त्याच्यासाठी समाजमन हे पाण्यासारखं, सामाजिक भावना आणि घडत असलेल्या घडामोडी, चांगल्या-वाईट, हे त्या रोपट्याला खतपाणी देण्याचं काम करत असतात. अर्थातच ते रोपटं त्याच्या उपजत आवडी-निवडी वा गुणधर्मानुसार त्यातील पाहिजे ते सत्त्व शोषून घेत असतं. जसं चिमणी वाळूतील आपल्याला पाहिजे तेच दाणे टिपत असते. या 'टिपण्या'वरच पुढे माणूस घडवला जातो. जरी घरामध्ये शिस्तबद्ध वातावरण असलं आणि बाहेर जर त्या विरुद्ध वातावरण असेल तर त्याचा परिणाम त्या बालमनावर होत असतोच असतो. ब्राझील हे फूटबॉलसाठी 'नंदनवन' म्हटलं जातं. त्या ठिकाणी जे मूल जन्माला येतं ते हातात फूटबॉल घेऊनच. कारण त्या ठिकाणी 'फूटबॉल' हाच 'धर्म' व 'श्वास' असतो. त्याचप्रमाणे आपल्याकडेही सर्वसाधारण मुलं क्रिकेटप्रेमीच असतात. कारण त्यांच्यावर आजूबाजूला जे क्रिकेटमय वातावरण असतं त्याचा परिणाम होत असतो. बाल्यावस्थेत असताना सतत कीर्तनाचे शब्द वा संगीत कानावर पडत असेल तर ते मूल त्याच मार्गाने जाणार, कदाचित एखाद्याला त्यातील अभंग गायला आवडेल वा कोणाला त्यातील निरूपणाचा ध्यास लागेल. अर्थात हे सर्व त्या-त्या मुलाच्या उपजत स्वभावगुणधर्मावर अवलंबून आहे.

अशीच परिस्थिती एका व्यंगचित्रकाराच्या बाल्यावस्थेत वाट्याला आली. जन्म मुंबईस्थित गिरगाव येथे. अगदी मराठमोळ्या वातावरणात. आजूबाजूला साहित्य व चित्रनिर्मितीची कमळं फुललेले 'तलाव'! ते वास्तव्य करीत असलेल्याच चाळीमध्ये 'हंस-मोहिनी'चं कार्यालय, पलीकडे 'मौज प्रकाशन', दोन नंबरच्या चाळीमध्ये 'परचुरे प्रकाशन', त्यापुढे दिवाळी अंकांचे वितरक बी.डी. बागवे यांचं पुस्तकांचं दुकान व थोडंसं पुढे आल्यावर 'मॅजेस्टिक प्रकाशन', पुढे दोन पावलांवर आडव्या रस्त्यावर 'बॉम्बे बुक डेपो'. अशा अक्षरांच्या तलावात डुंबण्याचा व त्यातील कमळरूपी चित्रांचा आस्वाद घेण्याचा मोह त्या बालमनावर झाला नाही तर नवलच! त्याचंच रूपांतर एका सुप्रसिद्ध व्यंगचित्रकारामध्ये झालं... व्यंगचित्रकार श्रीनिवास प्रभुदेसाई.

'मायाळू' चाळीतील सर्व रहिवाशांच्या खोल्यांची दारं सताड उघडी. त्यामुळे बाल श्रीनिवासनं घराच्या फरशीवर दगडी पेन्सिलनं चितारलेली चित्रं पाहण्यासाठी शेजाऱ्यांचा गोतावळा जमायचा. ''मुलगा हुबेहूब चित्र काढतो, पुढे मोठ्ठा चित्रकार होणार.'' असे सहज आई-वडिलांच्या समोर ते उद्‌गारत. पण वडील तेवढे समाधानी नसत. सर्वसाधारण वडिलांच्या मनोवृत्तीप्रमाणे आपलाही मुलगा ग्रॅज्युएट होऊन बँकेत 'सुरक्षित' नोकरी करील असा भाबडा आशावाद ठेवून... श्रीनिवास एस.एस.सी. झाल्यावर त्यांनी त्याला कॉमर्स कॉलेजमध्ये प्रवेश मिळवून दिला. परंतु नियतीच्या मनात वेगळंच होतं. त्याला अभ्यासामध्ये रुची वाटेना. कॉलेजच्या दुसऱ्या वर्षी त्यानं कॉमर्सच्या अभ्यासाला रामराम केला आणि मोठ्या भावाच्या मदतीनं त्यानं जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये 'पार्ट-टाइम' अभ्यासाच्या शाखेमध्ये प्रवेश घेतला. त्यावेळी सकाळी व संध्याकाळी असे पार्ट-टाइम वर्ग भरायचे डिप्लोमासाठी व सकाळी १० ते ५ या वेळेत नोकरी करण्यासाठी वेळ मिळे.

श्रीनिवास म्हणतात, ''आम्ही आठ भावंडं- चार मुली व चार मुलगे. त्यामुळे एवढ्यांच्या उपजीविकेचा खर्च भागवताना वडिलांच्या नाकीनऊ यायचे आणि म्हणूनच मी १० ते ५ या वेळात धारगळकर ब्लॉक मेकर्सच्या स्टुडिओत ब्लॉकमेकिंग शिकायला जाऊ लागलो.'' 'कमवा आणि शिका.' प्रकारात त्यांचं आर्ट स्कूलचं शिक्षण सुरू झालं. ते म्हणतात, ''शालेय शिक्षणात चित्रकलेला तेवढं प्रोत्साहन मिळालं नाही. तरीही चित्रकलेमध्ये ५० पैकी ४० मार्क हमखास नेहमी मिळायचे. नववीत असताना चित्रकला शिक्षकांच्या सूचनेनुसार मला मागच्या वर्गातील

विद्यार्थिनीसाठी चित्रं काढून देण्यास सांगितलं व त्यासाठी २० रुपये मिळाले. ही माझी पहिली कमाई व त्या पैशांतून जर्मन 'गिटार' नावाची रंगपेटी व ब्रश घेतले.'' हे सांगताना त्यांचे डोळे खूप काही बोलून जातात चित्रकलेसंदर्भात.

धारगळकर ब्लॉक मेकर्समध्ये बाळासाहेब ठाकरेंची 'मार्मिक'साठी चितारलेली ओरिजिनल व्यंगचित्रं ब्लॉकमेकिंगसाठी यायची व ती न्याहाळण्याची-अभ्यासण्याची संधी त्यांना मिळाली. त्यातूनच व्यंगचित्र चितारण्याची प्रेरणा व प्रबळ इच्छा निर्माण झाली.

घरातून, मित्रांकडून प्रोत्साहन मिळत होतं. उपजत विनोदी वृत्ती, कोणत्याही गोष्टीकडे तिरकस पाहण्याची खोड आणि आरपार निरीक्षण या गुणांमुळे त्यांची व्यंगचित्रकला पुढे-पुढे जात होती. त्यांचं पहिलं व्यंगचित्र १९६८ साली 'वसंत' मासिकात प्रसिद्ध झालं. यथावकाश मारियो मिरांडांची 'स्टाईल' खूप आवडायला लागली व त्याचाही त्यांच्या व्यंगचित्रकलेवर परिणाम झाला. कमर्शियल आर्टचे शिक्षण घेत असताना स्वत:च्या कल्पनांवरून रेखाटन करण्याच्या सवयीचं प्रतिबिंब त्यांच्या व्यंगचित्रांतून दिसून येतं. त्यांची व्यंगचित्रं किर्लोस्कर, मनोहर, प्रपंच, रूपा, मानिनी, ललना अशा प्रसिद्ध अंकांतून प्रसिद्ध होऊ लागली. ते म्हणतात, ''घडी चित्रांची कल्पना मला सुचली. 'आवाज'च्या संपादकांनी दीनानाथ दलाल यांच्याकडून त्या कल्पनेप्रमाणे 'आवाज'चं मुखपृष्ठ करून घेतलं.''

श्रीनिवास यांनी सामाजिक आणि राजकीय विषयांवर व्यंगचित्रं चितारली. त्यांची अशी व्यंगचित्र चितारण्याची खास स्टाईल आहे. वर्तुळाकार डोळे, चित्रामध्ये कमीत कमी बारकावे, सहज रेषा, मुख्य विषय उठून दिसण्याएवढाच रंगाचा वापर. हाताचा अंगठा सोडून बाकीची चार बोटं पेनच्या एकाच फटकाऱ्यात, विषयानुरूप चेहऱ्यावरचे भाव, व्यक्तिचित्रांमध्ये अती 'डिस्टॉर्शन' नाही. थोडसंच.




१) गुरू का महागुरू - या व्यंगचित्रामध्ये भारताचे पंतप्रधान व शहजादे राहुल गांधी (काँग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष) यांचे नातेसंबंध अतिशय मार्मिकतेनं चित्रित केले. मार्मिकता व सहज भाष्य हे त्यांच्या व्यंगचित्रांचं वैशिष्ट्य सांगता येईल.

२) समाजाची अधोगती व देशप्रेमाबद्दल ढळलेली निष्ठा हे दाखवण्यासाठी एखादी प्रसिद्ध अभिनेत्री झेंडावंदनापेक्षा किती महत्त्वाची असते यावर व्यंगात्मक आसूड 'राखी सावंतच्या हस्ते झेंडावंदन' या व्यंगचित्रातून ओढला आहे.

३) काही 'फसलेले' साहित्यिक या चित्रमालिकेतून साहित्यिकांच्या दुर्दैवी कहाण्या चित्रित केल्या आहेत. मराठी कथा-काव्याला एक नवीन दिशा, नवं वळण द्यायचं होतं पण नशिबी






ट्राफिक हवालदाराच्या भूमिकेतून गाड्यांना दिशा दाखवण्याची पाळी आली. तसंच साहित्य-संस्कृतीरक्षक बनून, बिनधास्त लैंगिक कथा-कादंबऱ्यांची घाण उपसण्याऐवजी रस्ता झाडायची पाळी आली. हे त्या फसलेल्या साहित्यिकाची जीवनगाथा दर्शवण्यासाठी उत्तम उदाहरण आहे. अशी चार उदाहरणं उत्तमरीत्या त्या त्या साहित्यिकाच्या उपजत गुणधर्मांना भेदणारी दाखवली आहेत.

अनेक व्यक्तिंची ‘कॅरिकेचर्स’ त्यांनी चित्तारली आहेत. त्यासाठी त्यांनी मोजकेच रंग, काळ्या शाईचं ‘कट-निब’ पेन किंवा साधं स्केच पेन वापरून चित्रामध्ये जी परिपूर्णता दाखवली. पण तिचा अभाव तेच चित्र रंगीत करताना थोडासा जाणवतो. स्केच पेन तेच पण पेपर शाई शोषून घेणारा. ज्या ज्या ठिकाणी पेन क्षणभर थांबले तर चटकन गोलाकार बिंदू त्या रेषेच्या टोकाला येतो व असे अनेक बिंदू रेषा रेखाटताना (breathing space) पेनचा ‘फ्लो’ थांबल्यामुळे सहज निर्माण होतात. त्यामुळे एका वेगळ्या बिंदूमय स्टाईलची निर्मिती ते करतात. त्यामध्ये त्यांची सहजता दिसून येते.

त्यांचं कमर्शियल आर्टचे धडे गिरवणं चालूच होतं. फॅमिली प्लॅनिंग या विषयावर स्टेट आर्ट प्रदर्शनामध्ये दुसरं बक्षीस मिळालं. डिप्लोमा पूर्ण झाल्यावर मुंबईस्थित एच.टी.ए. या अग्रगण्य जाहिरात एजन्सीमध्ये नोकरी मिळाली. व्यंगचित्रकला व जाहिराती तयार करणं ही दोन्हीही कामं एकाच वेळी चालू झाली. काही काळात जाहिरातीसाठी ‘कॉपी’ लिहिणंही चालू झालं.

व्यंगचित्रं काढण्याची हौस न राहता तो त्यांचा व्यवसाय झाला. अनेक हिंदी, मराठी, इंग्रजी मासिकांमध्ये व्यंगचित्रं प्रसिद्ध होऊ लागली. ‘नवभारत टाइम्स’मध्ये ‘पोपटजी’ नावाची मालिका दररोज प्रसिद्ध होऊ लागली. ‘धर्मयुग’, ‘पराग’, ‘फेमिना’, ‘माधुरी सिने साप्ताहिक’, ‘जी’(इंग्रजी) अशा अनेक नियतकालिकांमध्ये व्यंगचित्रं प्रकाशित होऊ लागली.

मासिकांपुरतंच आपलं कार्यक्षेत्र न ठेवता ‘दूरदर्शन’च्या चौकोनी स्क्रीनवरही आपली मुद्रा अनेक कार्यक्रमांच्या माध्यमांतून प्रभुदेसाई उमटवू लागले. त्या काळी दूरदर्शनवर जाहिराती दाखवल्या जात नव्हत्या. फक्त एकच चॅनल होतं. १९७५ साली ‘आणीबाणी व्यंगचित्रकारांच्या कुंचल्यातून’ या विषयावर मुलाखत झाली. ‘किलबिल’ या कार्यक्रमातून पायानं चित्र काढणं, ‘सुंदर माझं घर’मध्ये घडी चित्रांचा वापर, ‘गजरा’मध्ये विडंबनात्मक जाहिराती, ‘खेल खिलौना’मध्ये अंकचित्रात्मक व्यंगचित्रं, तर ‘किलबिल’मध्ये मुलांसाठी ‘आनंद मेळा’ म्हणून कार्यक्रम केला. त्यामध्ये मुलांची ‘ऑन दी स्पॉट’ कॅरिकेचर काढण्याचा नवीन प्रकार श्रीनिवास व श्याम जोशी यांनी केला. सांज लोकसत्ता, फ्री प्रेस, नवशक्ती, केसरी यांच्यासाठी पॉकेट कार्टून्स, तर गेली पाच वर्षं ‘सामना’मध्ये ‘हसोबा प्रसन्न’ व ‘चिंगी ढमाले’ ही चित्रमालिका सादर करताहेत. अनेक बँकांच्या हाऊस जर्नलसाठी ते व्यंगचित्रं चितारीत आहेत.

‘ऑन स्पॉट कॅरिकेचर्स’ हा नाविन्यपूर्ण कार्यक्रम अनेक मॉल्समध्ये मिनी शॉपी टाकून ते करत आहेत. मुलांसाठी चित्रकथा, गोष्टी लिहिल्या. त्या बिरबल, किशोर मासिकात प्रसिद्ध झाल्या व त्यांच्या कॅसेटही निघाल्या. कार्टूनिस्ट कंबाईन, महाराष्ट्र या व्यंगचित्रकारांच्या संघटनेचं अध्यक्षपद त्यांनी भूषवलं आहे.

जर्मनीतील ‘ईपीडी’ या मासिकातून त्यांची व्यंगचित्रं प्रसिद्ध झाली आहेत. मुलांसाठी व्यंगचित्रकलेवर ६०च्यावर वर्कशॉप घेतली आहेत. त्यामध्ये त्यांच्या सुविद्य पत्नीचा (उत्तम मार्केटिंग, व्यवस्थापन यामध्ये स्वतः ठसा उमटवणारी) सहभाग असतो. मुलांबरोबर संवाद साधण्याच्या अनोख्या किमयेमुळे त्यांचा अनेक संस्थानी सन्मान केला आहे. कन्या अर्चनाचं एम.कॉम.पर्यंत शिक्षण. ‘गाणारा गळा’ असल्यानं स्वतःचा व्यवसाय म्हणून तिनं ‘गाणं’ निवडलं आहे. अनेक मानसन्मान तिलाही मिळालेत.

त्यांना सात भावंडं असून प्रत्येक जण आपापल्या तेजानं तळपत आहे आणि सर्वजण मिळून श्रीनिवास यांना प्रोत्साहित करत आहेत. व्यंगचित्रांमधून समाजाचं ‘भान’ ठिकाणावर आणण्यासाठी...!

**– प्रभाकर वाईरकर**
कावेरी, बी-४०५, वाकोला ब्रीज,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५
भ्रमणध्वनी : ९८२०५४३०८९
prabhakarwairkar@rediffmail.com



# सिक्वेल
## लेखन स्पर्धा

कुतूहल, उत्सुकता या भावना माणसाचं जीवन रोचक करतात. पुढे काय? – या प्रश्नातून या कुतूहलाची सुरुवात होते आणि आपण सगळेच या स्वप्नरंजनात रंगून जातो. एका अर्थाने 'आज' हा 'काल'चा सिक्वेल असतो आणि 'उद्या' नावाच्या 'आज'च्या सिक्वेलविषयी आपल्याला जबरदस्त कुतूहल असते.

**तर यंदाच्या 'साहित्य सूची'च्या दिवाळी अंकाचा विषयच आहे – सिक्वेल !**

साहित्य, चित्रपट, व्यंगचित्रे अशा अनेक माध्यमांतल्या सिक्वेल्सचा वेध घेणाऱ्या या अंकाचे खास आकर्षण आहे विख्यात लेखक भालचंद्र नेमाडे यांच्याशी 'हिंदूचा सिक्वेल' या विषयावर संजय भास्कर जोशी यांची मनमोकळी बातचीत. शिवाय या अंकाचे काही खास मानकरी आहेत – अविनाश सप्रे, गणेश मतकरी, आनंद जोशी, राजन खान, मोनिका गजेंद्रगडकर, सुबोध जावडेकर, नीरजा, प्रज्ञा पवार, श्रीरंग गोडबोले, रविमुकुल, शुभा गोखले, मधुकर धर्मापुरीकर... आणि असे अनेक मान्यवर!... आणि या स्पेशल अंकाचे अतिथी संपादक आहेत – संजय भास्कर जोशी.

**पण अशा मान्यवरांखेरीज इतरांना देखील या अंकात मानाचे स्थान असणार आहे. होय, तुम्ही देखील या भन्नाट कल्पनेत सामील होऊ शकता. त्यासाठी तीनच अटी : तुम्ही वाचनवेडे असायला हवे, लिहायची हौस हवी आणि भन्नाट कल्पनाशक्ती हवी. तर वाचकहो, तुमच्यासाठी एक अफलातून सिक्वेल लेखन स्पर्धा जाहीर करत आहोत...**

## 'साहित्य सूची' आयोजित 'राजहंस प्रकाशन' प्रायोजित सिक्वेल लेखन स्पर्धा

### - खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सिक्वेल लिहा -

**१. भालचंद्र नेमाडे यांच्या 'कोसला'चा सिक्वेल, ज्याचे पहिले वाक्य असेल - 'मी पांडुरंग सांगवीकर. आज उदाहरणार्थ पंचाहत्तर वर्षांचा आहे...'**

**२. 'शाळा' या मिलिंद बोकील यांच्या कादंबरीचा सिक्वेल लिहा.**

**३. जी. ए. कुलकर्णी यांना 'तुती' आणि 'कैरी' या मालिकेतल्या कथांच्यानंतर त्याच मालिकेतली 'केळं' ही सिक्वेल कथा लिहायची होती, तर ती सिक्वेल कथा लिहा.**

- **हा सिक्वेल ३००० ते ३५०० शब्दात असावा.**
- **पहिल्या तीन क्रमांकाच्या सिक्वेल्सना राजहंस प्रकाशन तर्फे अनुक्रमे रु.१०,०००, रु.५,००० आणि रु.३,००० अशी बक्षिसे आणि दोन उत्तेजनार्थ सिक्वेल्सना प्रत्येकी रु.१०००चे पारितोषिक दिले जाईल आणि अर्थातच बक्षिसपात्र सिक्वेल्स दिवाळी अंकात छापले जातील.**
- **आपले सिक्वेल्स दि.१५ जुलै २०१४ पर्यंत खालील पत्त्यावर पाठवावेत किंवा magazine@erasik.com या ई-मेल आयडीवर पीडीएफ फॉरमॅटमध्ये पाठवावेत.**

संपर्क : 'साहित्य सूची' द्वारा

रसिक साहित्य प्रा.लि. अप्पा बळवंत चौक, पुणे २. ☎ : ०२०२४४५११२९

राजहंस प्रकाशन यांच्या सहयोगाने

# ऐसी मराठी अक्षरे अंतराळात

**स्मिता भागवत**



सुहास पै

तंत्रविज्ञानाच्या प्रगतीचा वेग 'थक्क' शब्दातील थ्रील नष्ट करू लागला आहे. शतकभरात झाली नसेल इतकी प्रगती आता वर्षा-दोन वर्षांत होते आहे. काहीही इतिहासजमा होण्यासाठी पूर्वी निदान पन्नास-साठ वर्षांचा कालावधी आवश्यक ठरवत. 'पूर्वी' हा शब्द खूप जुन्या काळासाठी तर 'हल्ली' शब्द वीस-पंचवीस वर्षांच्या काळासाठी वापरत. म्हणजे त्याचा भूतकाळात नव्हे तर वर्तमानकाळात समावेश होई. पण तंत्रविज्ञानाच्या गरूडभरारीने आकांक्षाना गगन ठेंगणे करून सोडले आणि घटना कालबाह्य ठरून इतिहासात जमा होण्याच्या प्रक्रियेनेही वेग घेतला. नव्याची नवलाई ओसरण्यापूर्वी अधिक नवे आधीच्या नव्यास जुन्यात ढकलू लागले. लेटेस्ट मॉडेलची चकाकी ओसरण्यापूर्वी येणारे नवे मॉडेल, लेटेस्ट हे विशेषण हिरावून घेते झाले. हे फक्त गॅजेट्सच्याच संदर्भात नव्हे तर सर्वत्र दिसू लागले.

साहित्यक्षेत्रातही तंत्रज्ञानाने चंचुप्रवेश केला. माझ्या पत्रिकेत मंगळ, शनी वा राहू-केतू आहेत की नाहीत, ते ठाऊक नाही, पण नावीन्याची ओढ आणि कुतूहल नावाचा ग्रह जबरदस्त जोरकस असणार. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांत जमा होण्याचे वेध लागले तेव्हा मी शिंगे मोडून वासरांत शिरले. लिहिण्यास हात नकार देऊ लागताच मी संगणकाकडे वळले. त्यावेळी विसाव्या शतकाची शेवटच्या दशकाची वाटचाल चालू होती. माझा मुलगा पुण्यास सी-डॅकच्या संशोधनक्षेत्रात (रिसर्च अँड डेव्हलपमेंट) ट्रेनी इंजिनीयर म्हणून काम करू लागला होता. त्यामुळे भारतीय भाषांसाठी तयार होणारे जीस्ट (पुढे आय-लिप) ताजेपणी माझ्या हाती आले. मग लिहू न शकणारा माझा हात, संगणकावर मराठी, गुजराती, हिंदी... भाषांत चौफेर भ्रमण करू लागला. शिंगे मोडून वासरांत शिरायची सवय होतीच. सारी 'वासरे' मला भीक घालत, असे नव्हे, पण काही 'वासरांना' ज्येष्ठांचा अनुभव आणि नवे तंत्रज्ञान यांचे फ्युजन' आकर्षक वाटले आणि माझी चंगळ झाली. शोध आणि बोधाच्या मोहात सतत भिरभरणाऱ्या माझ्या नजरेने माझ्यासारखे अनेक लोक टिपले.

तरुण वयात मला पत्रमैत्रीचा छंद जडला होता. महाजालाच्या (इंटरनेट) तंत्रज्ञानाने मला संधीचे असीम आभाळ मोकळे करून दिले. तिळा उघड, असे म्हणताच अलिबाबाचा खजिना हाती यावा तद्वत इ-पत्रांनी मला समानशिले व्यसनेषु सख्यम् या उक्तीस अनुसरून विविध वयोगटांतील मंडळींचे विशाल मित्रवर्तुळ दिले. नव्या कल्पना वास्तवात उतरवण्यासाठी धडपडणाऱ्या तरुणाईची मैत्री माझेही मन ताजे आणि दक्ष ठेवती झाली.

दुसरे सहस्रक कूसपालट करण्याच्या मार्गावर होते. जगाच्या डोक्यावर वाय टू के नावाच्या संकटाची तलवार लटकत होती. ती कोसळू नये यासाठी समग्र तंत्रविज्ञान जागरूक झाले होते. वास्तविक ही घटना जुनी नाही. एकविसाव्या शतकाचे पहिले दशक संपून अजून तीनच वर्षे लोटली आहेत. तरी वाय.टू.के.ची समस्या आता काळाच्या उदरात गडप झालेली - इतिहासात जमा झालेली वाटते.

एकविसावे शतक सुरू झाले तेव्हा संगणक नवा उरला नव्हता. तरी त्या क्षेत्रात असीम प्रगती झाली नव्हती. सी-डॅक आणि इतर विविध संस्थांच्या प्रयत्नांनी भारतीय भाषा संगणकावर

आल्या होत्या. भारतात आणि परदेशात भारतीय मंडळी संगणकाच्या मदतीने आपापल्या भाषेत छापील नियतकालिके प्रकाशित करू लागली होती. पण प्रत्येक संस्थेची पद्धत निराळी! म्हणजे फाँट्स वेगळे! त्यामुळे विशिष्ट संस्थेचे फाँट्स वापरणारा गटच एकमेकांशी प्रादेशिक भाषेत महाजालावर संवाद साधू शके. वेगळे फाँट्स वापरणाऱ्या गटाशी संवाद साधायचा तर PDF फाईल करावी लागे. छापील साहित्यास मर्यादा होत्या. लेख आणि कथांसाठी शब्दमर्यादा ठेवावी लागे. भारतीय स्थलांतरितांचा लोंढा वेगाने परदेशी पोहोचत होता. मग परदेशात शक्य होणारी कमी पानांची मोजकी प्रकाशने किती लोकांना संधी देऊ शकणार?


हे सारे विचार न्यू जर्सी येथे वास्तव्य असलेल्या सुहास पै यांच्या मनात चक्रीवादळ उठवत होते. परिणामी ते अस्वस्थ होत होते. ते तंत्रज्ञानाचे अभ्यासक! भारताचा निरोप घेऊन ते सातव्या दशकात अमेरिकेस आले होते. एकविसावे शतक सुरू होईतो त्यांचा अमेरिकेत व्यवस्थित जम बसला होता. म्हणून त्यांना छंद खुणावू लागले. विशेषतः विनोदी लेख आणि कवितालेखनाचा छंद! स्वाभाविकच वैचारिक प्रवासाने ती दिशा घेतली आणि आयटी क्षेत्रात काम करणाऱ्या सुहास यांना ऑनलाइन मराठी नियतकालिक काढण्याची स्फूर्ती आली. तसे केल्यास मराठी मंडळांना नि इतर संस्थांना इच्छित माहिती इंटरनेट नियतकालिकातून सत्वर पुरवता येईल, असेही त्यांना वाटले. इंटरनेट नियतकालिकाचा विचार जोर धरू लागताच त्यांची हेतुपूर्ण नजर मित्रवर्तुळात भिरभरली. लेखन-वाचनाची आवड असलेले काही मित्र त्यांच्या नजरेत भरले. तंत्रज्ञानाचे क्षेत्र अत्यंत विशाल! एका व्यक्तीस त्यातील यच्चयावत खुबी आणि खोडी ठाऊक असणे केवळ अशक्य असल्याची त्यांना जाणीव होती. कार्यकर्त्यांच्या गटाकडूनच काम तडीस नेता येणार, हे त्यांनी नेमके ओळखले. स्वतःस कॅप्टनच्या स्थानी ठेवले तरी टीम वर्कची नितांत गरज आहे, हे त्यांना पटले. मग त्या दृष्टीने शोध सुरू झाला आणि त्यांनी ह्युस्टनच्या दादा कारखानीस नावाने परिचित असलेल्या वयस्कर दिवाकर कारखानीस यांच्याशी संपर्क साधला. दादांच्या गाठी ह्युस्टनला 'स्नेह' नावाचे नियतकालिक प्रकाशित करण्याचा अनुभव होता. त्यांना इ-मासिकाची संकल्पना खूप आवडली आणि त्यांनी वेळोवेळी सल्ला-सूचना देण्याचे कबूल केले.

नव्या टीममध्ये कुणाला सामील करून घेता येईल, याचा विचार चालूच होता. त्यात त्यांना नीता नाबर हे नाव आठवले. १९८६ साली न्यू जर्सीत आलेल्या संतोष नाबर यांची ती पत्नी! ती १९९१ साली लग्न होऊन ती न्यू जर्सीत आली होती. तिने भारतात इन्स्ट्रुमेंटेशन विषयात इंजिनीयरिंगची पदवी घेतली होती. दोन वर्षे भारतात काम केले होते. सुहास यांची पत्नी अलका आणि नीता मावस चुलत बहिणी! नीता नेमकी न्यू जर्सीत आल्यामुळे, त्यांच्या वारंवार भेटी होऊ लागल्या. त्यामुळे सुहास नीताची क्षमता आणि वाचनाची रुची जाणून होते. अमेरिकेत आल्यावर नीताने आयटी क्षेत्रात मास्टर्स करून आयटी प्रोग्रामिंग क्षेत्रात नोकरी घेतली होती. मुलीच्या जन्मानंतर पूर्ण वेळाची नोकरी सोडली. पण अर्धवेळ नोकरी पत्करून तिने मन आणि मस्तिष्क दोन्हींचे समाधान जोपासले. पुढे दुसरा मुलगा झाल्यावर तिला ही तारेवरची कसरत नको वाटली. मुलांच्या हितास प्राधान्य देऊन २००३ साली तिने नोकरी सोडली.



नीता नाबर

आधुनिक यंत्रसामुग्रीची मदत असताना घरकाम पूर्ण दिवसाचे काम नसते. करियर केलेल्या व्यक्तीस बुद्धिप्रधान कामाची ओढ असते. नोकरी सोडली तरी नीता घरबसल्या html शिकून web programming क्षेत्रात प्रयोग करत होती. ती शिकत असण्याचा काळ खूप जुना नव्हे, पण तेव्हा इंजिनीयरिंगच्या अभ्यासक्रमात या साऱ्याचा समावेश नव्हता. हे तंत्र नव्हते शिक्षणात अजमावले की व्यवसायात! नव्या क्षेत्राशी ताल जुळवत ती मराठीत शुभेच्छापत्र तयार करू लागली. २००३ साल हा ऐतिहासिक काळ नसला तरी तेव्हा संगणकावर विविध भारतीय भाषांत होणाऱ्या टायपिंगचे अप्रूप होते. युनिकोडची संकल्पना भविष्याच्या गर्भात होती. विविध संस्था विविध प्रकारच्या फाँट्सच्या बनात अडखळत वाटचाल करत होत्या. नीताच्या मनात मराठी वेबसाईट निर्माण करण्याची इच्छा आकार घेत होती. तिने तसा प्रयत्न चालू केला. पण अमेरिका वा भारतीय व्यावसायिक वा हौशी साहित्यिकांशी तिचा प्रत्यक्ष परिचय नव्हता. म्हणून मराठी वेबसाईट निर्माण केली तरी पुढे काय, हा प्रश्न होता. हे काम एकट्या व्यक्तीचे नसून टीम वर्क आहे, हे तिलाही जाणवत होते. पै कुटुंबाशी वरचेवर गाठीभेटी आणि संवाद होतच होता. परिणामी, २००४ साली आपण साहित्यप्रेमी मित्रवर्तुळाच्या मदतीने ऑन लाईन मराठी मल्टिमीडिया मासिकाची निर्मिती करू इच्छित असल्याचे सुहास यांनी नीतास सांगितले. या गटात सामील होऊन नीताने वेबसाईट तयार करावी, असेही ते म्हणाले. नीता मोहरली. आता महाजालावर अनेक इ-नियतकालिके असली तरी २००४ साली याचे अप्रूप होते. शालेय जीवनापासून वाचनाची आवड असलेल्या नीतास हे खूप भावले. तिने अर्थातच सुहास यांचा




विचार उचलून धरला.

वैचारिक निर्णय झाल्यावर या मंडळींच्या औपचारिक आणि अनौपचारिक भेटी झडू लागल्या. शोध आणि बोध हातात हात घालून पुढे सरकू लागले. सुरुवातीस नीताने बेसिक वेबसाईट निर्माण केली. संतोषच्या मित्राने तिला e 107 या मोफत पॅकेजची माहिती दिली. त्याचा उपयोग वेबसाईटला व्यावसायिक रूप देण्यासाठी होणार होता. म्हणून नीता आणि संतोष यांनी बेसिक वेबसाईट त्या पॅकेजमध्ये बसवली. मग वार्षिक फी भरून या टीमने ipower कंपनीकडून वेबवर ती host करून घेतली आणि साईटसाठी योग्य नाव शोधण्याचा प्रपंच सुरू झाला. तोवर महाजालावर प्रादेशिक भाषेत हेतुपूर्ण नावे प्रचलित झाली नव्हती; म्हणून त्यांना शास्त्रीय ठरावे असे नाव हवे होते. सर्वांच्या संमतीने ‘अंतराळ’ हे नाव पसंत करण्यात आले. योजनेची पूर्ण आखणी झाली आणि २००५ सालच्या जानेवारी महिन्यात ‘अंतराळ’चा मुहूर्ताचा अंक महाजालावर अवतरला.

सुरुवातीच्या काळात साहित्य आणण्याचे काम अलका आणि सुहास करीत. तांत्रिक बाजूची जबाबदारी नीता आणि संतोषच्या शिरावर असे. दिवाळी अंकाचे आकर्षक मुखपृष्ठ आणि इतर कलाविभागाचे काम रूपा नाडकर्णी यांच्या माध्यमातून KR Creations, Inc. या कंपनीच्या सहकाऱ्यांची जबाबदारी असे. दादा दामले या अभ्यासकाने ‘अंतराळ’ अंकासाठी फलज्योतिषाचे दालन उपलब्ध करून दिले.

नवीन लेखकांना ऑनलाईन व्यासपीठ देणे आणि स्थापित लेखकांचे अभिजात साहित्य ऑनलाईन उपलब्ध करून देणे हे ‘अंतराळ’चे मुख्य उद्दिष्ट होते आणि आहे. सुरुवातीस बऱ्याच लोकांना या मासिकाच्या संदर्भात इ-पत्राने माहिती देण्यात आली. त्यांनी ती माहिती आपल्या वर्तुळात वाहती करणे अपेक्षित होते. तशी अंतराळच्या निर्मितीची बातमी खूप लोकांना कळली. कर्णोपकर्णी ती अधिक लोकांपर्यंत पोहोचत राहिली. सुरुवातीस अंकासाठी साहित्य आणावे लागे, पण जसजसे अधिक लोकांना ‘अंतराळ’विषयी कळत गेले तसतसे लोक स्वतः पुढे येऊ लागले. हौशी लेखक आवर्जून साहित्य पाठवू लागले. भारतात तसेच जगभर विखुरलेल्या स्थापित साहित्यिकांच्या अभिजात कृतींचे पुनर्मुद्रण करण्याची परवानगी सुरुवातीस मागावी लागली. मात्र कोणताही अभिनिवेष न बाळगता या मंडळींनी परवानगी दिलीच; शिवाय तेही आपले प्रकाशित साहित्य ‘अंतराळ’ला पाठवू लागले. जगभरातून साहित्याचा ओघ सुरू झाला. या निमित्ताने अनेक नव्या-जुन्या लेखकांशी परिचय घडला, असे नीता अभिमानाने सांगते. फॅक्टरीत मूळ प्रॉडक्ट इतकाच छान बायप्रॉडक्ट मिळाला तर आनंद शतगुणित होतो. ‘अंतराळ’च्या निर्मितीत मिळालेल्या सृजनाच्या आनंदास महानुभावांच्या परिचयाची जोड लाभल्याने नीताला तसा सुखद आनंद लाभला.

सुहास-अलका तसेच नीता-संतोष यांच्या बरोबरीने त्यांना थोडीफार मदत करणाऱ्या संपूर्ण मित्रवर्तुळास ‘अंतराळ’ची निर्मिती खूप आनंदप्रद वाटते. सुरुवातीच्या काळात बैठक भरवून चर्चा-विचार करून निर्णय घेतले जात. आता फोनवर जुजबी वैचारिक देवाण-घेवाण पुरेशी ठरते. ‘अंतराळ’ या इ-मासिकाची गाडी आता सुसाट वेगाने पळत सुटली आहे. अंतराळच्या निर्मितीचा विचार अमलात येण्याआधीच पै दांपत्याने श्रीधर फडके आणि इतर काहींना पुनर्मुद्रणासाठी परवानगी देण्याची विनंती केली होती. त्यामुळे बाबुजी आणि ललिता फडके यांचे साहित्य अंतराळच्या वाचकांसाठी उपलब्ध झाले. राम गबाले यांनीही काही लेख दिले. डॉ. जयंत नारळीकरांनी विज्ञानकथा दिल्या. भीष्मराज, डॉ. मंगला नारळीकर आणि अशोक जैन यांनी आपले लेख दिले. श्रीनिवास प्रभुदेसाई यांच्या व्यंगचित्रांचे रसपान करण्याची संधी ‘अंतराळ’च्या वाचकांना मिळाली. इतकेच काय, पण माणेक प्रेमचंद या इंग्रजीत अभिव्यक्त होणाऱ्या लेखकाने आपले लेख अंतराळला दिले. अन्नपूर्णा रांगणेकर त्या लेखांचा अनुवाद करत आहेत.

उत्तर अमेरिकेतून डॉ. उषादेवी कोल्हटकर, स्मिता भागवत, सुधीर आंबेकर, शशिकांत पानट, डॉ. कुंदा जोशी, डॉ. मीना नेरुरकर, विजय पाठारे, शरद आणि साधना साठे, डॉ. प्रकाश लोथे, अशोक सबनीस, डॉ. यशवंत कारखानीस, जयंत कुलकर्णी, पं. सुजन राणे, विद्या हर्डीकर-सप्रे, नीलिमा वीरकर, डॉ. जयश्री माने, विनय देसाई, डॉ गंगाधर मद्दिवार, प्रमोद तेंडुलकर; तसेच काळाच्या पडद्याआड गेलेल्या दिवाकर कारखानीस, पद्माकर चित्रे, बंडू फडके.... नामनिर्देश राहिलेल्या अशा अनेकांचे साहित्य ‘अंतराळ’च्या वाचकांसाठी उपलब्ध होत असते. काही साहित्यिक अंतराळच्या प्रकाशनापूर्वी हौशी लेखक होते. ते आता विविध नियतकालिकांत चौफेर लेखन करू लागले आहेत. शिवाय,

डॉ. उज्ज्वला दळवी, नरेंद्र प्रभू, रिझवाना कश्यप, हेमा जोशी, प्रकाश क्षीरसागर, विजय जोशी, अनघा निगवेकर, अरुंधती देशपांडे, प्रीती बाणावलीकर, सचिन कुलकर्णी, प्रीती देशपांडे इत्यादी अनेक नामवंत जगाच्या कोनाकोपऱ्यातून अंतराळसाठी साहित्य उपलब्ध करून देतात.

सुहास यांना सुरुवातीच्या काळात सल्ला-सूचना देणाऱ्या आणि शिंगे मोडून वासरात शिरणे आवडत असलेल्या दादा कारखानीस यांनीही काही काळ महाजालावर 'सावली' नावाच्या इ-मासिकाची निर्मिती केली. पुढे प्रकृती साथ देईनाशी झाल्याने प्रकाशनात नियमितता राखणे अवघड झाले म्हणून त्यांना हे प्रकाशन थांबवावे लागले. तरी कर्मव्यस्त दादांनी मायबोलीचा विश्वसेतू हा मोठा प्रकल्प प्रमोद तेंडुलकर आणि मोनाली फाटक यांच्या मदतीने तडीस नेला. त्यात चाळीस अनिवासी भारतीय लेखकांच्या कार्याचा धांडोळा शब्दबद्ध झाला. दादांच्या पश्चात प्रमोद तेंडुलकर यांच्या सौजन्याने 'अंतराळ'च्या अंकात यातील काही भाग क्रमशः प्रसिद्ध होत असतो.

'अंतराळ' हे नॉन प्रॉफिट फ्री इ-मासिक आहे. त्याने आता दहाव्या वर्षात पदार्पण केले आहे. या काळात त्यात विविध विषय हाताळण्यात आले. क्लब ५५ सारख्या गटाच्या माध्यमातून सेकंड इनिंग सुरू करणाऱ्या ज्येष्ठांसाठी उपयुक्त ठरणारी खूप माहिती उपलब्ध करून देण्यात आली. त्याचवेळी बाळगोपाळांनाही चित्रे, कथा, बालसाहित्य आणि श्लोकपठणाच्या संधीचे विशाल आकाश दिले. हे सारे रसिकांना खूप भावले. उत्तर अमेरिकेत एका वर्षाआड होणाऱ्या बृहन्महाराष्ट्र मराठी मंडळाच्या २००७ सालच्या सियाट्ल येथे भरलेल्या अधिवेशनात या महत्कार्यासाठी 'अंतराळ'ला ॲवॉर्ड देण्यात आले.

जग खूप वेगाने बदलते आहे. आता खूप इ-नियतकालिके महाजालावर दिसू लागली आहेत. तरी सुरुवातीच्या काळात 'अंतराळ'ने अडचणींच्या निबिड बनातून मार्ग काढून सातत्याने दहा वर्षे जी वाटचाल केली, त्यास तोड नाही. नव्या आणि येऊ घातलेल्या नियतकालिकांना या सर्वांचा सक्रिय सहकार लाभतो. त्याच वेळी 'अंतराळ'वर सर्वांनी लोभ धरावा आणि दिवसेंदिवस तो वृद्धिंगत व्हावा, असेही त्यांना वाटते. आजवर हा अंक तुमच्या बघण्यात आला नसला तर www.antaraal.com वर अवश्य बघा, वाचा आणि आपला सहभाग हवासा वाटला तर अप्रकाशित वा पूर्वप्रकाशित साहित्य पाठवा. 'अंतराळ'ची टीम महाजालावर आपले स्वागत करायला उत्सुक आहे.

**– स्मिता भागवत**

smitacapgmail.com
1-289 752 8885

ग्रंथाली

संकल्पनाकोशला मिळालेले पुरस्कार

- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
  ना.गो. कालेलकर पुरस्कार २०११
  *संकल्पनाकोश खंड १*
- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
  नरहर कुरुंदकर पुरस्कार २०१३
  *संकल्पनाकोश खंड २ ते ५*
- मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई
  केशव भिकाजी ढवळे २०१३
  *संकल्पनाकोश खंड १ ते ५*
- सार्वजनिक वाचनालय, नाशिक
  डॉ. वि.म. गोगटे पुरस्कार २०१३-१४
  *संकल्पनाकोश खंड २ ते ५*

**इंग्रजी थिसॉरसच्या धर्तीवर प्रथमच...**






**सुरेश वाघे**
लिखित
**संकल्पनाकोश**
**खंड १ ते ५**








मूळ किंमत ३२०० रुपये सवलतीत २४०० रु.
टपालखर्च २०० रु.

# पंडित विजयकुमार संझगिरी
## एक डोळस कलाकार

**जयंत विठ्ठल कुळकर्णी**

मी मुंबईला गेलो होतो तेव्हा शिवाजी पार्कला प्रभातफेरी मारताना समर्थ व्यायाम मंदिर शाळेच्या बाजूला संगीतकार वसंत देसाई स्मारकाजवळ खूप गर्दी दिसली म्हणून थांबलो. तेथे वसंतराव देसाई यांची ३८ वी भावपूर्ण जयंती साजरी केली जात होती. अनेक नामवंत व्यक्ती तेथे उपस्थित होत्या. एक अंध गृहस्थ वसंतरावांच्या आठवणी सांगत होते. खूप आत्मीयतेने वसंतरावांबद्दल बोलत होते. ह्या अंध गृहस्थांना पूर्वी पाहिल्याचे मला स्मरत होते. पुढे दोन दिवसांनी शिवाजी पार्कला प्रभातफेरी मारताना, योगायोगाने ते अंध गृहस्थ व प्रसिद्ध आदर्श क्लासेस चालवणारा माझा मित्र, मधू आठल्ये भेटले. साथीदारासह मधुला व्हीलचेअरवर पाहून मला वाईट वाटले. मधूला विस्मरणाचा खूप त्रास होतोय हे मला माहीत होते. एकमेकांच्या सोबतीने म्हणा, हे अंध गृहस्थ एकत्रपणे फेरी मारत होते. त्यांना पाहताच मी थांबलो व मधूची चौकशी करून त्या अंध गृहस्थांना नमस्कार करून माझी ओळख करून दिली व त्यांना विचारले, की आपण कोण? मी विजयकुमार संझगिरी असे त्यांनी सांगितले. आपला संगीताशी संबंध कसा असे मी त्यांना सहजच विचारले. मी वसंतरावांचा साहाय्यक होतो असे ते म्हणाले. त्यांच्याबरोबर मी अनेक चित्रपटांना व इतर गीतांना चाली दिलेल्या आहेत. बस्स, एवढी ओळख मला पुरेशी होती. मी तुमचा जास्त वेळ घेत नाही पण मला तुम्हाला भेटायला निश्चित आवडेल असे त्वरित म्हणालो. हो, जरूर या, हा माझा पत्ता असे म्हणून त्यांनी मला त्यांचे कार्ड दिले व म्हणाले, येण्यापूर्वी फोन करायला विसरू नका. आपण अधिक नंतर बोलूया. त्यांना विचारून मी त्यांचे फोटो काढले व मधूचा निरोप घेतला. मधूच्या चेहऱ्यावर काहीच हावभाव नव्हते...



पंडित विजयकुमार संझगिरी

मला आठवतेय, सुमारे पंचेचाळीस वर्षांपूर्वी मी ह्या विजयकुमारांना सुंदर पोशाखात, हातात व्हायोलिन व अंधांची काठी घेऊन दररोज सकाळी न चुकता नियमितपणे एकट्याने जाताना पाहत होतो. सर्व क्षेत्रांतील नामवंत कलाकारांचा असा शिवाजी पार्कचा तो परिसर. तेव्हा, ते कुणी संगीत-शिक्षक अथवा प्रसिद्ध कलाकार असतील असे वाटले होते. हे विजयकुमार मला जसे चाळीस वर्षांपूर्वी दिसले होते अगदी तसेच आजही दिसले होते. आश्चर्य म्हणजे, त्यांच्यात मला काहीच फरक दिसला नव्हता. त्यांना भेटण्याची मला उत्सुकता होतीच. चार दिवसांनी मी अमेरिकेला परतणार होतो. त्यांना फोन करून त्यांनी दिलेल्या वेळी मी भेटायला गेलो होतो. स्वप्नात येणार नाही असा तो माझ्या जीवनातील शुभ-दिन ठरला होता. त्यांच्या घरात शिरताच विजयकुमारांच्या बहिणीने, ज्योत्स्नाने दार उघडले व मी बालमोहन शाळेतला आहे हे पाहताक्षणी ओळखले. ही आमच्या दादा रेगे यांचीच कृपा म्हणायची. जग खूप छोटे आहे हेच खरे. त्यांच्या घरात अतिशय शिस्तबद्ध लावलेली पंडित विजयकुमारांची असंख्य प्राविण्ये-पारितोषिके पाहून मी आश्चर्यचकित झालो. बातचीत करण्यापूर्वीच ज्योत्स्नाने, हातात बिस्किटांसह चहाचा कप ठेवला. हे विजयकुमार नुसतेच उत्कृष्ट व्हायोलिनवादक नव्हते तर ते, उत्तम गायकही होते. शिवाय, इतर अनेक वाद्येही वाजवण्यात त्यांचा हातखंड होता. अशा अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे ते आहेत ह्याचा मला मनस्वी आनंद झाला होता व 'सूर के बिना जीवन सुना...' ह्याचा मला लवकरच बोध झाला...


गुजरातमधील पाटण या गावी, विजयादशमीच्या शभुदिनी जन्म झाला म्हणून त्यांचे नाव विजय ठेवले होते. अपघातामुळे वयाच्या तिसऱ्या वर्षीच त्यांना अंधत्व आले. दैवगतीने जरी दृष्टी हिरावून घेतली होती तरीही नावाप्रमाणे, जिद्दीने अंधत्वावर मात करून प्रभुकृपेने, दुर्मिळ असे स्वरचक्षू, गोड गळा आणि व्हायोलिनचा सुरेल हात त्यांना नजर केला होता. तो 'प्रसाद' मानूनच घरात संगीताची आवड-वातावरण असणाऱ्या आई-वडिलांच्या प्रेरणेमुळे बालवयापासून बासरी, संवादिनी, व्हायोलिनवादन व नंतर कंठसंगीत असा विजयकुमारांचा स्वरप्रवास, अक्षयपणे तहहयात सुरू झाला, ही अत्यंत उल्लेखनीय बाब होय.

कोल्हापूरला गेले असता, योगायोगाने गोविंदराव टेंबे यांनी विजयकुमारांचे गायन व व्हायोलिनवादन ऐकले, तेव्हा गोविंदरावांनी त्यांना गायनावर अधिक लक्ष द्यावे असा प्रामाणिक सल्ला दिला. त्याचप्रमाणे, बालगंधर्वांनी दिलेली शाबासकीची थाप व बाबुराव कर्णिकांनी दिलेले संगीताचे धडे त्यांना महत्त्वाचे होते. हे सर्व त्यांनी शिरोधार्य मानून, मुंबईला आल्यावर पंडितभूषण राम मराठे यांना गुरू मानून त्यांच्याकडून गायनाचे रीतसर धडे घेतले. पुढे नामवंत व्हायोलिनवादक श्रीधर पार्सेकर व मनोहर बर्वे यांच्याकडून व्हायोलिनचे धडे घेतले. त्यांचे मित्र उस्ताद हलीम जाफर खान व श्रेष्ठ संगीतकार नौशाद यांनी पंडितजींचे केलेले कौतुक ते विसरू शकत नाहीत. लहानपणापासून मिळालेले संगीतश्रेष्ठ श्रीनिवास खळे यांचे आशीर्वाद, योग्य वेळी मिळालेली सुप्रसिद्ध गायक सुरेश हळदणकर, वसंतराव कुळकर्णी, श्रेष्ठ तबलावादक सुरेशभाई गायतोंडे यांची साथ व मार्गदर्शन हे पंडितजींच्या जीवनातील यशाचे गमक होते. विजयकुमारांचा संगीतामधील पाया व तपश्चर्या इतकी भक्कम होती, की पुढे त्या सर्वांवर प्रभुत्व मिळवणे त्यांना अधिक सोपे गेले. त्या जोरावर त्यांनी, 'संगीत विशारद' ही पदवीही मिळवली.



**पंडितजी, जयंत कुलकर्णी व मधु आठल्ये**

१९६५ ते १९९२ या काळात विजयकुमार, दादरच्या महानगरपालिकेच्या शाळेतून सेवानिवृत्त होईपर्यंत संगीतशिक्षक होते. विद्यार्थ्यांमध्ये संगीताची, विशेषत: शास्त्रीय संगीताची आवड निर्माण व्हावी यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. मराठीच्या पाठ्यपुस्तकातील कवितांना सुंदर चाली लावण्याचा उपक्रम सुरू त्यांनी केला. यातूनच 'स्वरवेल' नावाची, शास्त्रीय संगीतावरील विविध रागांच्या चीजांची सोप्या भाषेतील एक पुस्तिका प्रकाशित करण्यात पंडित विजयकुमारांचा अतिशय मोठा वाटा आहे. रागांची सोप्या पद्धतीने ओळख करून त्यावरच्या सीडीही त्यांनी स्वखर्चाने प्रकाशित केल्या आहेत. त्यांना १९८६ मध्ये संगीतक्षेत्रातील उत्तम कामगिरीबद्दल महानगरपालिकेने प्रमाणपत्रासह सन्मानित करून पुरस्कारही प्रदान केला होता. स्वत:च्या अपंगावर मात करून समाजाशी असलेली आपली नाळ त्यांनी जोडून ठेवली. शाळेतील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना आपल्या संवेदनशील दृष्टीने ओळखून त्यांना ते वेळोवेळी मदत करत. अंध शिक्षकांना पालिकेतर्फे राहण्यासाठी जागा त्यांनी मिळवून दिल्यात. त्यांचे हाल होऊ नयेत म्हणून 'स्वरनिनाद समिति फॉर दी हँडिकॅप्स' ही संस्था स्थापून गोरेगावमध्ये अपंगांसाठी 'मेघमल्हार' सोसायटीची निर्मिती केली. आज सर्व वयोगटांतील विद्यार्थ्यांना ते सुगम-संगीत, ख्याल याबरोबर बासरी, हर्मोनियम व व्हायोलिन यांसारखी वाद्ये शिकवतात. यात अत्यंत गरीब व सर्व क्षेत्रांतील अती श्रीमंतांचाही समावेश आहे. त्यांचे अत्यंत टापटीप, शिस्तबद्ध असे आदबशीर व्यक्तिमत्त्व व व्यक्तित्व वाखाणण्यासारखे आहे. शिवाय, त्यांचा नम्र, संयमी, मिश्किल स्वभाव, नेमकेच व मुद्देसूद बोलणे सर्वांनाच मोहित करून जाणारे आहे.



**संगीतकार नौशाद व पंडित विजयकुमार संझगिरी**

आपल्या शिष्यांना आपली कला पेश करण्यासाठी एक स्थायी व्यासपीठ हवे म्हणून पंडितजींनी १९९० साली, 'सूरनिनाद' ही संस्था स्थापन केली. गाजलेल्या 'श्वास' ह्या अंधत्वावरच्या मराठी सिनेमाचे कथानक ऐकल्यावर विजयकुमार यांनी स्वत:च्या खिशातून त्याच्या निर्मात्याला घरी जाऊन देणगी दिली होती. ज्यांनी तो सिनेमा पाहिला त्यांनी त्या सिनेमाला आपल्या परीने पावतीही दिली होती. परंतु तो सिनेमा न पाहता पंडितजींनी गरजेपोटी निर्मात्याला उदार हस्ते दिलेली देणगी, त्यावर खूप प्रकाश टाकणारी ठरते. एवढेच काय, माहीम, मुंबई येथे मानसिक अपंगत्व आलेल्या सात वर्षांच्या मुलाला त्याची सुरतालातील आवड लक्षात घेऊन पंडितजींनी जिद्दीने संगीत शिकवायला सुरुवात केली होती. आज तोच मुलगा उत्तम पेटी वाजवतो. थोडक्यात, कोणतेही अपंगत्व माणसाच्या विकासाच्या आड येऊ नये हीच पंडित विजयकुमार संझगिरी यांची प्रामाणिक तळमळ दिसून येते. त्यांची बहीण ज्योत्स्ना हिचा त्यांना सदैव आधार व पाठिंबा आहे हेही तितकेच खरे. अर्ध्या तासासाठी त्यांनी मला वेळ दिला होता. सांगायचे म्हणजे, माझे तेथे तब्बल दोन तास कसे निघून गेले हे समजलेच नाही. उशिरा का होईना, मला एक चांगले मित्र व स्नेही भेटल्याचा आनंद झाला होता. सप्तसुरांशी आमचे नाते व सूरही जुळले होते. मी पुण्य घेऊनच त्यांच्या घराबाहेर पडलो होतो. पंडित विजयकुमार संझगिरी हे आज ऐंशीच्या घरात आहेत. अगदी तारुण्यात असावेत असे ते आजही दिसतात. शिवाय, मानसिक दृष्टीनेसुद्धा ते तरुणच आहेत. संगीत हाच मोकळा श्वास, हीच त्यांची भावना व वृत्ती होय. पंडितजींना उत्तम आरोग्यासह दीर्घायुष्य लाभो ही प्रभुचरणी मी मनापासून प्रार्थना करतो.

**– जयंत विठ्ठल कुळकर्णी**
न्यू यॉर्क
दूरध्वनी : ७१८-५६५-५७२०
jvkny1@gmail.com

## ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

''जेव्हा कुणी आपलं काही वाईट करेल तेव्हा ते वाळूत लिहावं; कारण क्षमाशीलतेचा वारा सुटला की ती अक्षरं पुसून जातात. पण कुणी आपल्यासाठी काही चांगलं केलं तर ते मात्र नेहमी कोरावं. कारण मग कोणताही वारा ती अक्षरं पुसून टाकू शकत नाही.''

''भरजरी कपडे आणि दागिने हे एक तर राजघराण्यातील माणसं शोभेसाठी घालतात किंवा मूर्ख माणसं मूर्खपणा झाकण्यासाठी परिधान करतात. मात्र साधेपणा हीच सज्जनाची शोभा असते; हे कधीही विसरू नका, बाईसाहेब!''

''स्वतःच्या मनाचा सल्ला न घेता आणि स्वतःवर विश्वास न ठेवता आपण इतरांचंच ऐकत बसलो तर आपल्या हाती शब्दांचे बुडबुडेच लागतात.''

''आधी तुम्ही स्वतःचा शोध घ्या. आपण कोण आहोत याचा तपास लावा. तुम्हाला तुमचा स्वतःचा पत्ता लागला, की मग तुम्ही देवाचा पत्ता शोधायला सुरुवात करायला काहीच हरकत नाही.''

ही वाक्ये आहेत 'बोधकथा – भाग एक आणि भाग दोन' या पुस्तकांमधील. नमुना म्हणून दिली आहेत, शितावरून भाताची परीक्षा या न्यायाने तशी ती प्रत्येक कथेत आहेत. मात्र प्रत्येकीने स्वतःचे वेगळे आशयपण राखले आहे. आणि ते राखण्याचे भान लेखकाने जपले आहे. त्यामुळे कथांचे वेगळेपण जसे जाणवते तसे लेखकाचे कसलेलेपणही जाणवत राहते. लेखक स्वतः मुरलेले गझलकार म्हणून उभ्या महाराष्ट्राला परिचित आहेत. कथा, विनोद, लेख या इतर लेखनातही त्यांची कलमदानी निरामयवृत्तीने विहार करीत असल्याची नोंद रसिक वाचकांच्या वाचनकप्प्यात यापूर्वीच झालेली आहे. या बोधकथा त्यांच्या लेखनप्रवासाचा वेगळा टप्पा. काहीसा परिचित; काहीसा अपरिचित. पण छान जमलाय. खरं तर असा सलगपणे प्रयोग करणे, तीही पुनरावृत्ती वा कंटाळवाणेपणाच्या सावलीला टाळून, अवघड प्रवास आहे. पण लेखकाने तो प्रवास सुखरूप पार पाडला आहे याचा प्रत्यय या कथा वाचताना येतो. बरे, कथा काही एक–दोन नाहीत, तर प्रत्येकी सव्वाशे म्हणजे अडीचशे कथा. म्हणजे एकूण अडीचशे मैलांचा प्रवास केल्यासारखे. तरीही वाचताना ना दमछाक होते ना रंजकता हरवते. उलट, सुखावल्याचीच भावना मनात तरळत राहते.




'बोधकथा' या शीर्षकावरूनच त्यांच्या आशयाची कल्पना वाचकाला येणे स्वाभाविक आहे. त्यामुळे इसापनीती आणि पंचतंत्र यांची आठवण येणे अपरिहार्य आहे. सदरच्या कथांचा बाज तसाच असणेही अपरिहार्य आहे. त्यांचा आवाका मर्यादित ठेवून आशयाला प्राधान्य देणे, आपल्याला जे सांगायचे आहे ते कमीत कमी शब्दांत चपखलपणे व्यक्त करणे महत्त्वाचे असते. त्यातील रंजकता आणि चतूरपणाही सांभाळावा लागतो. त्या निकषांचा साज या कथांनी सहजपणे स्वीकारलेला आहे. परंतु कथांमधील भाबडेपणा आणि काहीतरी सांगायचा सोस म्हणून पाने, फुले, झाडे, वारा, पाणी, डोंगर या निसर्गातील घटकांचे मानवीकरण करण्यावर अधिक भर देण्याऐवजी आपल्यातील माणसे निवडण्यावर लेखकाने अधिक भर दिला आहे. बुद्ध, विवेकानंद, रामशास्त्री, राजाभोज, शिकंदर, अब्राहम लिंकन, गांधीजी, शास्त्रीजी अशा अनेक थोर व्यक्ती या कथांमधून वाचकाच्या भेटीला येतात. झेनकथा, बुद्धकथा यांचा बोध येतो. गुरू–शिष्य यांचे संवाद येतात. पौराणिक–ऐतिहासिक दाखले येतात. ते सारे दैनंदिन जीवनाचे सार, आचरण, संकेत, दया–औदार्य, मोठेपणा, डोळसपणाचे अंजन हळुवारपणे पापणीच्या कडेवर रेखतात. वाचकाच्या अनुभवाला समृद्ध करतात. प्रत्येकीत बोधतत्त्वाचा पारा कमीअधिक प्रमाणात भरलेला आहे. त्यामुळे या कथा वयाच्या सिग्नलपाशी न थांबता आबालवृद्धांना आनंद देणाऱ्या आहेत. कुठलेही पान उघडा आणि वाचायला सुरुवात करा, आपोआप सुरुवातीपासून वाचण्याचा मोह होईल अशा या कथा. कुठेही केव्हाही संदर्भ किंवा दाखला म्हणून सांगता येतील अशा सहजसोप्या भाषेतील आटोपशीर कथा. रंजकतेच्या दोरीवरून चालताना नकळत तोल सांभाळताना तत्त्वाची काठी हाती दिलेल्या कथा. लहान लहान एकपानी कथा, सुटसुटीत व स्वतंत्र कथा.

या धावपळीच्या काळोखात सापडलेल्या जीवनाला प्रकाश देणारा दिवा आणि अवकाशाचा वेध घेणाऱ्या अँटिना बसविलेली हेल्मेट घातलेला, विस्मयीत नजरेने पाहणारा मुलगा भाग एकच्या मुखपृष्ठावरून भेटीला येतो. तर भाग दोन पुस्तकावरील पाने, फुले, मयूरपक्षी यांनी बहरलेला बोधवृक्ष आपले लक्ष वेधून घेतो. त्याखाली बसलेला ध्यानमग्न तपस्वी. बाजूला आज्ञातुल्य शिष्यंद्वय आश्रमाची कल्पना साकारतात. दोन्ही मुखपृष्ठे आकर्षक झाली आहेत.

- **भाग १ – मूल्य १२० रु. सवलतीत ७० रु.**
- **भाग २ – मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

# ग्रंथपान

## शापित भूमी




''१९८४, मार्च महिन्याच्या सुमारास दर आठवड्यात १६००० लोक मृत्युमुखी पडत होते! उपासमारीने हैराण झालेल्या कृश लोकांचे लोंढे अन्नाच्या शोधात मैलोन्‌मैल चालत जाऊ लागले होते.''

''१९९४, जून. रूवान्डातून वाहत आलेल्या कागेरा नदीच्या पाण्याला खूप जोर होता. मार्क त्यातून वाहत व तरंगत येणारे मृतदेह मोजत होते. प्रत्येक मिनिटाला दोन ते तीन मृतदेह दिसायचे. बरेचसे नग्न किंवा तोकड्या कपड्यातील. काहींचे हात-पाय बांधलेलं, तर काहींचे तोडलेले!

''ही जी परकीय मदत येऊ घातलीय, ती आपण कशी खर्च करतो यावर कोणी लक्ष ठेवणार नाही. मला वाटते मुक्तिआघाडीला चिरडून टाकायची ही आयती संधी चालून आली आहे.''

ही आहेत विदारक सत्य सांगणारी काही वाक्ये, आफ्रिकेतील परिस्थितीची तोंडओळख देणारी. प्रत्यक्ष संपूर्ण पुस्तक वाचल्यानंतर ही परिस्थिती किती भयावह आहे याचे चित्र समोर दिसू लागते. मन अस्वस्थ होते. आणि आपणच आपल्याला विचारू लागतो, जगाच्या नकाशावर एखादा प्रदेश असाही असू शकतो? पण आहे, हे वास्तव विसरता येत नाही. हे वास्तव जगासमोर येऊ नये म्हणून जागरूक असलेली हुकूमशाही सत्तापिपासू राजवट पाहिली तर, माणुसकीला कंलक लावणारी ही क्रूर यंत्रणा राबवणारी शक्ती माणसांची आहे यावर विश्वास कसा ठेवायचा हाच प्रश्न पडतो. उपासमारी, दारिद्र्य, दुष्काळ, अत्याचार, क्रूरता, जुलूम, लैंगिकशोषण, कत्तल आणि हुकूमशहांची मनमानी हे सारे माणुसकीला काळिमा फासणारे वास्तव या पुस्तकात उघड करून दाखवलेले आहे.

या पुस्तकात एकूण १६ कथा आहेत. या कथा कथेच्या आकृतिबंधाने नटलेल्या आहेत इतकेच. मुळात तो आहे तप्त लाव्हारसात न्हालेला इतिहास. मनाला पिळवटून टाकणारे एक वास्तव. यात इदी अमीन, मोबुटू, एफडब्लूडी क्लार्क, अब्दी रशीद, निमेरी यांसारखे अनेक क्रूर हुकूमशाही राजवटीचे राक्षस नरभक्षकासारखे वागताना दिसतात. अत्याचाराला कुणी सामोरे जावे याला कुठलाच विधिनिषेध नाही. ना वयाचा ना स्त्री-पुरुष भेदाचा. अंगुझा कार्ल, ए बाँड, फना, एमा मॅक्क्युन, डॉ. सलिमा, मुचेरी यांसारख्या अनेक व्यक्ती भोग, अत्याचार, जुलूम आणि गरिबीचे प्रतिनिधित्व करतात. तर जीवाचा धोका पत्करून या परिस्थितीला वाचा फोडू पाहणारे मार्क टेम्पलटन, फिलीप व्हॅन होवर, मोहंमद, फ्रेड व टायटस यांसारखे अनेक साहसी पत्रकार भेटतात. नेल्सन मंडेला यांचीही भेट होते. हिरे, खनिजसंपत्तीची संपन्नता आणि उपासमारी व रोगराई यांची लढाई हेसुद्धा पात्रांप्रमाणेच कथेचा कॅनव्हास आपल्या ताब्यात घेत वाचकाना खिळवून ठेवतात. ही सगळी पात्रे वेगवेगळी परिस्थिती आणि माणसांचे हरवलेले, भरडलेले, आणि भरकटलेले जीवनचक्र समोर ठेवून वाचताना थक्क करतात.

लेखकाला आंतरराष्ट्रीय रेडक्रॉससाठी काम करण्याच्या निमित्ताने आफ्रिकेत जाण्याची संधी मिळाली. माणसे, जनजीवन, चालीरीती, राजकारण आणि भौगोलिक-सामाजिक वातावरण यांच्याविषयी असलेल्या कुतूहलापोटी त्यांनी सजगतेने अभ्यास केला. गुलामगिरीच्या रक्तरंजित खुणा इतिहासाच्या पानांतून चाळून काढल्या. पत्रकाराच्या रूपाने मुलाखती घेतल्या. काही अनुभव स्वतः घेतले. त्यातून मनाला अस्वस्थ करणारे वास्तव वाचकांसमोर मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न या कथारूपात केला. पात्रांच्या माध्यमातून अनेक विषयांना आकार देताना तटस्थता राखली. तरीही त्यात अस्वस्थता, तळमळ, संवेदनशीलता आणि संयमितपणाचा प्रत्यय येत राहतो. लेखकाचा 'शापित भूमी' हा वाचकाच्या मनाचा दीर्घकाळ ताबा घेणारा कथासंग्रह त्यांच्या आधीच्या पुस्तकांप्रमाणेच वेगळेपण घेऊन आला आहे आणि एका लेखकाचा वारसा तितकाच समर्थपणे पुढे प्रवाहित झाला आहे, याचा विश्वास हा कथासंग्रह वाचकाला देतो हे आणखी विशेष! दहशतवादी आणि काळावर उमटलेली हाताची मुद्रा दाखवणारे मुखपृष्ठ शीर्षकास साजेसे झाले आहे.

- **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान




मला वाटतं त्यावेळी जर
कागदावर लिहिलेली एक कविता
कुठूनतरी उडत उडत सूर्यावर पडली,
तर तो पुन्हा पेटेल, पुन्हा पेटेल

कवितेच्या उर्जेविषयी वाटणारा हा विश्वास हा फक्त कवीच दाखवू शकतो. ही कविता त्याला शब्द देते, विझत्या नसांमध्ये जेव्हा वेदनेचे डोळे मिटू लागतील तेव्हा त्यांच्यासमोर त्याची सखी असेल. आत्म्याला श्वास फुटण्याचा भरवसा कविता देते. कवी निवारा शोधण्यासाठी कवितेच्या अंगणात उभा राहतो. मात्र तिच्या निर्मितीविषयी बोलताना हळवा होतो.

क्षणावर बसलेल्या कवितांना
फुलपाखरांसारखे जाळीत पकडायचे
मग काट-कूट करून आकार द्यायचा
अन् त्या टाचून ठेवायच्या अल्बममध्ये, हा
जुलूम नाही तर काय?

कवी आत्म्याला सुंदर शरीर देण्याच्या विचार करतो, ज्यावर सुरकुती नसेल, डाग नसेल, त्याला जखम होणार नाही की दाह-दुःख शिवणार नाही. आणि त्याला सापडतं असं शरीर, कोऱ्या कुंवाऱ्या सकाळचं शरीर. त्याला ऐकू येतं दाणे भरलेल्या कणसांच्या शेतात गप्पगार पडलेल्या पायवाटेचं स्वगत. ती म्हणते, माझी कूस अशी तुडवली नसती वाटसरूंनी जर, तर माझीही मुलं नसती का आतावर तरुण झाली? त्याच्या नजरेला दिसतो पावसासाठी झुरणारा खैरू, जो आपल्या शेतातली सुकी माती सुरकुतलेल्या हातात धरून वर पाहतो भिजलेल्या डोळ्यांनी. लॉनमध्ये पिवळी गळून पडलेली पानं पाहून त्याला वाटतं खंगलेला पिवळा चंद्रही कदाचित असाच सुकलेल्या पानांसारखा लॉनमध्ये उतरेल, तरंगत तरंगत. सरदार सरोवरामुळे होणारे विस्थापित, शहरात फिरणाऱ्या रणगाड्यांनी भयकंपित झालेली सून, दंगलीच्या आगीत भस्मसात होणारे प्रार्थनास्थळातले भाविक, संगणकाच्या दहशतीमुळे काचेच्या बंद कपाटात उसासे टाकणारी पुस्तके, कचरा करणारा पिंपळ आणि त्यावरील कावळे-चिमण्या. अशी विविध शब्दचित्रं, भावभावना, कल्पना, संवेदनशील मनाने टिपलेली आहेत, यात सुख-दुःख,वेदना,आशा-अपेक्षा,नात्यातलं हळुवारपण, प्रेम, जवळीक, उदासपण अशा अनेक छटा इंद्रधनुष्यातल्या रंगासारख्या भेटीला येतात. नेमकेपणात साठवलेलं असूनही त्यांचं व्यापकपण जाणवत राहतं.

गुलजारसाहेब हे आपणास परिचित आहेत ते रुपेरी झगमगाटामुळे. चित्रपट आणि गाणी यांच्या तरल, संवेदनशील अनुभवामुळे ते लक्षातही राहिले. ते कवी आहेत हे ठाऊक आहे परंतु ते उर्दूमधील. उर्दूची तऱ्हा ही शेर-शायरीच्या पठडीतली. दोन ओळींत सारा सारांश सामावलेला. समजली तरी व्वा व्वा! नाही समजली तरी व्वा वा! त्यामुळे त्यांच्या कवितांशी तसा संबंध थेट नाही. तो जोडण्याचं श्रेय या अनुवादी पुलाकडे जातं. एक सुप्रसिद्ध कवी थेट आपला वाटू लागतो. तसं हे काम अवघड आहे, परंतु ते अनुवादकांनी समर्थपणे पेललं आहे. अर्थात त्यासाठी दोन्ही भाषांवर प्रभुत्व आणि प्रेम असावं लागतं. ती आत्मियता अनुवादकांकडे नक्कीच आहे. त्यांनी एका उत्तम कवीची कविता सोपेपणानं तरीही मूळ कवितेच्या लयीत वाचकांच्या समोर ठेवली, शेरोशायरीच्या मोहात न पडता मुक्तछंदातील विविधतेनं नटलेली कविता चोखंदळपणे निवडली, त्यासाठी त्यांचं अभिनंदन! या संग्रहात एक चांगलं केलं, मूळ कविता अनुवादासोबत दिलेली आहे. त्यामुळे दोन्ही भाषांतील कवितांचा आनंद घेता येतो. मूळ भाषेचा लहेजा आणि नजाकत अनुभवण्याचा आनंद वेगळाच! यासाठी प्रकाशकाना धन्यवाद द्यायला हवेत. अंबरीश मिश्र यांनी ब्लर्बवर केलेलं कौतुक किती सार्थ आहे याचा प्रत्यय कविता वाचून झाल्यानंतर येतो. मुखपृष्ठावर गुलजारसाहेबांचा फोटो दिला आहे. त्याबाबत त्यांच्याच शब्दात म्हणता येईल,

तुझं नावच पुरेसं आहे,
याहून चांगली कविता तरी काय असणार?

**• मूल्य १२५ रु. सवलतीत ७५ रु.**

# ग्रंथपान

मृगातला हलका निळा पाऊस भिजवतो
काळ्यातांबड्या मातीचे अस्तर
गुराढोरांना, पाखरांना, बायामाणसांना फुटू
लागतात हिरवे पोपटी कोंभ

या ओळी वाचल्यानंतर लक्षात येते, ही कविता म्हणजे शेत आणि शेतकरी यांच्या नात्याचा रुजलेला कुंदा. असा कुंदा जो दुष्काळात कधी आपली नाळ सुकू देत नाही. पावसाळ्यात कधी पिकापेक्षा मान वर करून पाहत नाही. मातीशी नांदत राहणे हा त्याचा स्वभाव. आणि एकूण कविता वाचल्यानंतर हा अंदाज खरा ठरतो. कवितेला मृद्‌गंध आहे तसा कवीही या गंधाने भारलेला आहे. मातीचे चंद्र, वाढदिवस, भूमी, भूमी सावरण्याची गोष्ट, तहान, पाऊस यांसारख्या कविता पाहा. सर्वत्र हाच गंध दरवळताना जाणवत राहतो. औताने जमिनीचा पोत अलगदपणे उघडा करत जावे तशी ही कविता ग्रामीण जीवनाची एकेक कुपी आपल्यासमोर उघडत जाते. गावापासून शिवारापर्यंत पाथ धरावी तशी या जीवनाच्या अनेक पैलूंचे गवत निंदत राहते. आणि त्याचवेळी होत असलेल्या ऱ्हासाचे भानही ठेवते.

दिसतात मला बाजारातलं सामान बांधून आणल्या रद्दी पेपरातून
देशभरात बॉम्ब पेरल्याच्या खुणा गावशिवारापर्यंत वाहात आलेल्या

गढी, बापजाद्यांनी लावलेली झाडं, उजळमाथ्यानं भूमिपुत्र, पूर्णाकाठ यांसारख्या कविता भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांना एकत्रित ठेवून चितारलेल्या चित्रांचा अनुभव देतात. आणि सहज मनात येते, गड्या आपला भूतकाळच सोन्याचा होता. वर्तमानाने त्याला गंजलेल्या मनाचे शिळे रंग फासण्यातच धन्यता राखलेली आहे. त्याविषयी कवी व्यक्त होतो,

माणसाच्या सडक्या मांसाची दारू काढण्याचे हे दिवस...
काळी माती सडवून दारू काढता आली असती तर किती बरं झालं असतं!

कवी श्रीकांत देखमुख यांचा हा तिसरा काव्यसंग्रह, 'बोलावें ते आम्ही...' भरभरून बोलणारा संग्रह. मन मोकळे करणारा संग्रह.

**बोलावें ते आम्ही**

**श्रीकांत देशमुख**




अनेक विषयांना कवेत घेणारा संग्रह. स्वतःला तपासून पाहायला लावणारा संग्रह. मुक्तछंदात असलेल्या कवितांचा, मातीपासून मातीपर्यंतचा प्रवास म्हणजे हा संग्रह, बोलावें ते आम्ही...

कोसळणारा पाऊस आणि रुसलेला पाऊस, दुथडी भरून वाहणारी पूर्णा नदी आणि कोरडे ठाक झालेल्या पात्रावर उभा राहिलेला पूल, रांगत जाणारी रेल्वेगाडी आणि लाल रंगाची एसटी, नक्षत्र, डोंगर, वारा, जनावरे, ही गावाकडची प्रतिके मातीच्या कवितांना जोडून येतात. शहरातले बकालपण आणि हरवलेले माणूसपण, तरीही चिकटून राहणारी ग्रँटरोडवरची संस्कृती, बंद पडलेल्या गिरण्या, लाललाल दिव्याच्या सुदृढ गाड्या आणि आऊटडेटेड माझा बुद्धा आपलेपणाच्या जाणिवांना सोलून काढतो. मेधा पाटकरांच्या डोळ्यातलं पाणी, सखूच्या डोळ्यात खोलवर उतरलेला चंद्र, मालवत्या दिवसाला कवटाळून झोपलेली आई, मातीपासून परका होऊ नये दुसऱ्या पिढीचा देह, भुईची निरी आलटूनपालटून उकलणारी निंदणी, यासारख्या ओळी वाचताना आपल्याला ओळीशीच रुतून ठेवतात. 'उत्कट शांततेनं मेलेल्या डुकराचं प्रेत अजूनतरी कोणाच्या पाहण्यात आलेलं नाही, आणि आठवतात मला ठेचले जाणारे तरणेबांड बैल' यासारखी खोलवर आघात करणारी वास्तववादी निरीक्षणे अंतर्मुख करायला लावणारी आहेत.

श्रीकांत देखमुख यांचा हा कवितासंग्रह तरल आणि तितक्याच उत्कट संवेदना व्यक्त करणारा संग्रह आहे. कवितांचा आवाका हा प्रदीर्घ आणि बहुआयामी आहे. विषयांचे वैविध्य आणि प्रतिभेचे हळवे धुमारे यामुळे वाचून झाल्यानंतरही कविता मनात रेंगाळत राहते. वाचकाच्या मनात घर करणारे साहित्य कोणते? या प्रश्नाचे उत्तर म्हणजे हा संग्रह, बोलावें ते आम्ही... त्याच्याच शब्दात म्हणायचे तर,

मातीपासून परका होऊ नये दुसऱ्या पिढीचा देह म्हणून.

**• मूल्य १८० रु. सवलतीत ११० रु.**

# रांगोळी घातली सजले अंगण

विमल कुलकर्णी

विविध लेखांचा रंगोत्सव अंगोपांग अनुभवला. अनुराधा गांगल यांचं 'रांगोळी' हे शतशः रंगपंचमीचा अनुभव घेणारं देणारं पुस्तक वाचलं. लेखिकेचं पारदर्शी लिखाण, परदेशातल्या निसर्गाची, माणसांची रूपं दाखवताना भारतीयत्व जपणारं तिचं मन एकदम भावलं. कॉलेजमध्ये शिकलेली एक कविता मूर्तिमंत डोळ्यांसमोर उभी राहिली,

अंगणात सुंदरही कोण बालिका
रंगुनिया काढतसे रंगवल्लिका
भवतिच्या जगताचे भान हिज नुरे
हिज भवती, गुंगत माधुर्य संचरे

लेखिकेनं रांगोळीच्या संबोधनातून प्रत्येक माणसाच्या मनाची उभारी, घालमेल, नव्याची उत्सुकता अन् जुन्या आठवणींचा सारीपाट इतका सुरेख मांडलाय की आपणही बालपणीचा काळ सुखाचा म्हणतो, कधी तारुण्याच्या उभारीत मस्त होतो, तर कधी कल और आज या फरकानं खिन्न होतो. परदेशी असताना तिथल्या सृष्टीसौंदर्याचा आनंद आपणही लुटतो. कधी लेखिकेबरोबर भातुकली खेळतो. 'बिल्ड अ बेअर'शी खेळणारी नातवंड पाहून काळाच्या गतीचं लेखिकेनं भरघोस कौतुकही केलंय.

रांगोळी काढताना एकही ठिपका चुकता कामा नये ही दक्षता घ्यावी लागते. एका ठिपक्याला दुसऱ्याला नाजूकपणे जोडण्यातच सौंदर्य अन् कलात्मकता जोपासावी लागते, तसं अनुराधाताईंनी जुन्या आठवणींच्या गुंत्यांत अडकून न पडता 'रंगूनि रंगात साऱ्या रंग माझा वेगळा' हे प्रत्येक लेखात दाखवलंय.

लेखिकेनं तिला जे वाटलं, पटलं ते मनमोकळेपणानं सांगितलं. 'तिरुपती बालाजी मंदिरातील, दिवसचे दिवस ताटकळत उभं राहून ताटकळून देवाचं दर्शन कसं होतं, याच साद्यंत वर्णन फार नेमकं केलंय. हजारो रुपयांचं तिकिट काढून, बाबूंनी मर्यादित केलेल्या रांगेत, देवाच्या मूर्तीपुढे, तेही १५-२० फूट दूर असणाऱ्या मूर्तीला डोळ्यात साठवू न देता 'चलो चलो' म्हणून पुजारी दूर ढकलतात, ही भक्ताची की देवाची विटंबना, असं वाटतं वाचताना.

लेखिकेनं आजच्या समाजाचं जे बारकाईने निरीक्षण केलंय ते वाचून 'आपल्या मनात अगदी असंच आलं होतं.' अशी दाद मी तर देऊन गेले.

टी.व्ही.वरील मालिकेमध्ये 'गंगाधर टिपरे' या मालिकेचं कौतुक करताना बाकी मालिका, विवाहबाह्य संबंध, नवरोजीचं नवरेपण, कॉन्ट्रॅक्ट मॅरेज किंवा अतिरटाळ सासू-सून, कुंकू आणि टी.आर.पी. मिळवण्यासाठी प्रेक्षकांचा अंत पाहणाऱ्या मालिकांवर चढवताना साहित्य, नाटक, समाजाचं प्रबोधन करणारं हवं हे प्रांजळ मत अनुराधाताईंनी बिनधास्त मांडलंय.

'मम्मी मंचाओ, हक्का नुडल्स, बर्गर, पिझ्झा म्हणून आईपुढे हट्ट करणाऱ्या मुलांकडे अनिमिष नेत्रांनी आनंदून पाहणाऱ्या आईला मधल्या वेळच्या पौष्टिक खाण्याची चव देणारी लेखिका, कल और आजचा साक्षात्कार घडवताना, कल, आज और कल (उद्या) भाकीत करतेय असं वाटून गेलं अन् उद्याच्या 'कल'बद्दल अस्वस्थ वाटून गेलं.

लेखिकेनं 'केल्याने देशाटन' हा मंत्रही छान जपलाय. अमेरिकेला एकटीनं जायचं आणि तेही मुलीच्या बाळंतपणासाठी! जातानाची तिची त्रेधातिरपीट, घाबरगुंडी, तोडकंमोडकं इंग्रजी, आपण इच्छित स्थळी जातोय ना, याची सहप्रवाशाबरोबर पुन्हा पुन्हा खात्री करून घेणं. अगदी हुबेहूब चित्र वाचताना डोळ्यांसमोर उभं राहीलं.

'रांगोळी' या संग्रहात ठिपक्यांची रांगोळी, फ्री हँड केरळी रांगोळी, तशी संस्कार भारतीची रांगोळी, साऱ्याच कलात्मकरीत्या दिसल्या.

मला अत्यंत प्रभावित करणारी संस्कार भारतीची रंगवल्लिका.

भारतीय विधी, संस्कार, आनंद यांना जोडणारं परदेशी आनंदोत्सवाचं आर्टिकल 'बेबी शॉवर' खूपच आवडलं. माणूस जेव्हा बोलू शकत नव्हता, भाषाज्ञान नव्हतं तेव्हाही नाचून, टाळ्या वाजवून, हाकारे होकारे देऊन, गिरक्या मारून तो आपला आनंद व्यक्त करायचा. आनंद इथूनतिथून सगळ्यांचा सारखंच, फक्त व्यक्त करण्याच्या रीती, तऱ्हा वेगळ्या असतात. लेखिकेनं अमेरिकन डोहाळजेवण अन् भारतीय डोहाळजेवण यांची तुलना करता करता, दोन्हीकडे कसा भरभरून आनंद असतो, त्या सृजनाच्या उत्सवाचं भरभरून वर्णन केलंय. देशाच्या भौगोलिक सीमा माणसाच्या

आनंदाला बांध घालू शकत नाहीत हेच खरं.

अमेरिकेमध्ये डोहाळजेवणाच्या वेळी 'बेबी शॉवर' कार्यक्रम करून बाईला होणाऱ्या बाळाला लागणाऱ्या वस्तू आहेर करतात तर आपण तिच्या नवसुजनाचं कौतुक, आनंद व्यक्त करून तिला आहेर करतो, हे मोठ्या खुबीनं कथन केलंय.

सगळ्यात लेखिकेनं अमेरिकेतलं 'रामायण' फारच छान रंगवलंय. ३०० छोट्या मुलांनी श्रीरामविवाहापर्यंत केलेली नाटिका अन् तिच्या रामाच्या रूपात वावरणाऱ्या नातवाचं कौतुक वाचताना आपल्यालाही अमेरिकेत घेऊन जातं.

कथा आशयपूर्ण अन् बोधपर असेल तर भाषा, देश, रीत कशाचीही आडकाठी अडवत नाही हेच खरं.

'भारती सृष्टीचे' आणि 'संस्कार', 'बाळाची चाहूल' या सर्व पुस्तकांतून अनुराधाताईंनी माणूस घडवण्याचे आणि माणसाला माणसाजवळ प्रेमानं गुंफण्याचे यशस्वी प्रयोग आपल्या लेखनातून केलेत.

'बाळाची चाहूल' या पुस्तकात अनुराधाताईंनी 'पहिल्यांदा आई होणाऱ्या प्रत्येक लेकीला अर्पण' हे वाचून कुणाही पहिलटकरीणीच्या अंगोपांगी मोरपिस फिरल्यागत झालं असेल.

'सतत दुसऱ्यांचा विचार करणाऱ्या दिनकर गांगल यांना' ही 'रांगोळी' पुस्तकाची अर्पणपत्रिका वाचून, लेखिकेच्या व्यक्तिमत्त्वाची संपूर्ण साक्ष पटली. आमच्या कर्नाटकात बसवेश्वर वचन म्हणजे अमृतानुभव. बसवेश्वर आपल्या वचनात म्हणतात ''नन् गिंता किरीयरू यारू इल्ला'' म्हणजे माझ्यापेक्षा लहान या जगात कोणीही नाही. हे लहानपणच त्यांना श्रेष्ठत्व देऊन गेलं. तसंच लेखिकेची समर्पणाची भावनाच तिच्याबद्दल सारं सारं सांगून गेली. लेखिका दिनकर गांगल हे सौभाग्यबिरुद मोठ्या अभिमानानं मिरवत आहे. नाव लावते सौ. अनुराधा दिनकर गांगल.

**– विमल कुलकर्णी**
द्वारा – डॉ. भारती तडवळकर
नेचर पॅराडइज फ्लॅट नंबर ७०२,
सातवा मजला, डी.आय.सी. ऑफिसमागे,
होटगी रोड, सोलापूर – ४१२००३

**रांगोळी**
**मूल्य १८० रु.**




**संस्कार, संगोपन, संस्कृती आणि संवाद साधणारी**

**अनुराधा गांगल यांची चार पुस्तके**





**संस्कार**
**मूल्य ६० रु.**

**४२० रुपयांचा संच घरपोच २५० रुपयांत!**




**बाळाची चाहूल**
**मूल्य ६० रु.**




**भारती सृष्टीचे...**
**मूल्य १२० रु.**

ग्रंथाली

द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग,
माटुंगा (प.), मुंबई-४०००१६ दूरध्वनी : २४३०६६२४/२४२१६०५०
● granthali01@gmail.com, granthali02@gmail.com ● वेळ : सकाळी ११ ते ६

## दोन ग्रंथसंच योजना सूची

**सोबतच्या यादीतील सुटी पुस्तके हवी असल्यास ४०% सवलतीत मिळतील.**
**चेक/डी.डी./म.ऑ. 'ग्रंथाली' नावे पाठवावा.**

**१९७ पुसतके संच क्रमांक १ मूळ किंमत २८१५५ सवलतीत संचाची किंमत १३००० रु.**

१. **खेळ साडेतीन टक्क्यांचा**
लक्ष्मण माने ● १६० रु.
२. **राजकीय पक्षनिष्ठा मानसिक-बौद्धिक गुलामी**
दि. म. संत ● ८० रु.
३. **अंधश्रद्धा निर्मूलन-प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम**
संदीप जावळे ● १२० रु.
४. **प्रर्वतन**
संदीप जावळे ● १२० रु.
५. **विचारवेध**
डॉ. विजय/जयश्री जोशी ● १८० रु.
६. **विचारवेध : भाग ३**
डॉ. विजय/जयश्री जोशी ● २५० रु.
७. **अर्वाचीन पाश्चात्त्य तत्त्वज्ञान-अनुभववाद**
दि.य. देशपांडे ● २०० रु.
८. **अर्वाचीन पाश्चात्त्य तत्त्वज्ञान प्रज्ञावाद**
दि.य. देशपांडे ● १८० रु.
९. **अर्वाचीन पाश्चात्त्य तत्त्वज्ञान-कांट**
दि.य. देशपांडे ● १२० रु.
१०. **विवेकवाद**
दि.य. देशपांडे ● १०० रु.
११. **रिल्केची दहा पत्रे**
अनिल कुसुरकर ● १०० रु.
१२. **मी हिंदू झालो!**
डॉ. रविन थत्ते ● १०० रु.
१३. **विज्ञानाचे तत्त्वज्ञान**
संपादक : शरद देशपांडे, प्रदीप गोखले, सदानंद मोरे ● ३०० रु.
१४. **नेगल - (भाग १)**
विलास मनोहर ● १२० रु.
१५. **नेगल -(भाग २) हेलकशाचे सांगाती**
विलास मनोहर ● १२० रु.
१६. **एक पूर्ण-अपूर्ण**
नीला सत्यनारायण ● १२५ रु.
१७. **सत्तरीचे बोल...**
डॉ. पी. एस. रामाणी ● १०० रु.
१८. **पथदर्शी**
भारत गजेंद्रगडकर ● १०० रु.
१९. **जे देखिले...**
भारत गजेंद्रगडकर ● १०० रु.
२०. **एक दिवस (जी)वनातला**
नीला सत्यनाराण ● २०० रु.
२१. **ध्यास आणि प्रवास**
सुलभा वर्दे ● २०० रु.
२२. **माझ्या वकिलीची पन्नासी**
एस.आर. चिटणीस ● १६० रु.
२३. **आमचा बान आन् आम्ही - स्वरूप आणि समीक्षा**
संपा. शैलेश त्रिभुवन ● ४०० रु.
२४. **झपाटलेली झाडे**
सरोज जोशी ● २५० रु.
२५. **चिं.त्र्यं. खानोलकर**
(ललित चरित्र)
दीपक घारे ● १८० रु.
२६. **व्हिन्सेंट व्हॅन गॉच्या आठवणी**
अनिल कुसुरकर ● १२५ रु.
२७. **गुन्हेगारांच्या मागावर**
यशवंत व्हटकर ● १५० रु.
२८. **सद्रक्षणाय खलनिग्रहणाय**
यशवंत व्हटकर ● २५० रु.
२९. **नृत्यसौदामिनी दमयंती जोशी**
प्रा. सुहासिनी पटवर्धन ● १०० रु.
३०. **पालावरचं जग**
लक्ष्मण माने ● १४० रु.
३१. **बंद दरवाजा**
लक्ष्मण माने ● १८० रु.
३२. **उद्ध्वस्त**
लक्ष्मण माने ● १०० रु.
३३. **भटक्याचं भारूड**
लक्ष्मण माने ● १५० रु.
३४. **नियतीशी करार**
संदीप जावळे ● ३०० रु.
३५. **घटना नारायणपूरची**
शशी देशपांडे, अनु. मोहिनी दातार ● १०० रु.
३६. **हॅरिसबाई**
कृ.ना. कुडाळकर ● १२० रु.
३७. **स्वदेश**
भूषण केळकर ● १६० रु.
३८. **टकिला टकाटक**
भूषण केळकर ● ३०० रु.
३९. **संघर्ष नागरी निवाऱ्याचा**
संपा. जयंत धर्माधिकारी, अमरेंद्र धनेशर ● १२५ रु.
४०. **विकासाची रूपरेषा-परिसंवादांच्या अनुभवातून**
सु.गो.तपस्वी ● ३०० रु.
४१. **क्षितिजावरील शलाका**
शारदा साठे ● २०० रु.
४२. **मुलगी झाली हो...**
ज्योति म्हापसेकर ● ६० रु.
४३. **ही आपलीच माणसं**
मंगला खाडिलकर, गजानन सबनीस ● २५० रु.
४४. **कोहम् धाबा**
अनुवाद
संजीव दहिवदकर ● १०० रु.
४५. **पैलूंविना हिरकणी**
सुधा सोनाळकर ● ८० रु.
४६. **जग जनुकांचे**
डॉ. हेमा पुरंदरे ● १०० रु.

४७. **वृद्धत्वाची शान**
पद्माकर नागपूरकर ● १२५ रु.
४८. **मनातलं काहीसं**
सुधा सोमण ● १२० रु.
४९. **पानीकम**
संजय पवार ● १०० रु.
५०. **वारस होऊ अभिमन्यूचे**
अनुराधा गोरे ● ३०० रु.
५१. **न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा**
(यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सहकार्याने) ● ४०० रु.
५२. **सोन्याच्या धुराचे ठसके**
डॉ. उज्ज्वला दळवी ● २७५ रु.
५३. **सौदीच्या अंतरंगात**
पद्मा कऱ्हाडे ● २०० रु.
५४. **मौन होई बोलके**
रोहिणी लिमये ● २०० रु.
५५. **गांगल ७० ग्रंथाली ३५**
संपादन सुदेश हिंगलासपूरकर ● ३०० रु.
५६. **संकल्प**
संपादन संजीव खांडेकर ● ३०० रु.
५७. **भिडू**
भगवान इंगळे ● २५० रु.
५८. **पंखाविना भरारी**
प्रसादची आई (शरयू घाडी) ● २०० रु.
५९. **स्वास्थ्यवृत्त**
डॉ. शरदिनी डहाणूकर ● १०० रु.
६०. **कानोसा**
डॉ. राणी बंग ● २५० रु.
६१. **आयुर्वेदातील स्त्रीविज्ञान**
शुभदा वेलणकर ● ४०० रु.
६२. **अंगणातले आभाळ**
यशवंत पाठक ● ३०० रु.
६३. **आभाळ माझं**
विमल कुलकर्णी ● १०० रु.
६४. **गोष्ट झऱ्याची**
सुधा वर्दे ● १५० रु.
६५. **कोल्हाट्याचं पोर**
किशोर शांताबाई काळे ● १०० रु.
६६. **आमचा बाप आन् आम्ही**
(१६१ आवृत्ती)
नरेंद्र जाधव ● १२० रु.
६७. **बलुतं**
दया पवार ● १०० रु.
६८. **उपरा**
लक्ष्मण माने ● १०० रु.
६९. **आयदान**
उर्मिला पवार ● २२० रु.

७०. **हृदयस्थ**
डॉ. अलका मांडके ● २५० रु.
७१. **ताठ कणा**
डॉ. पी.एस. रामाणी ● २५० रु.
७२. **मैत्र जीवाचे**
विदुर महाजन ● २०० रु.
७३. **पाचट**
योगीराज बागूल ● २५० रु.
७४. **जगायचंय प्रत्येक सेकंद**
मंगला केवळे ● ८० रु.
७५. **वन फॉर सॉरो**
अनुराधा कुलकर्णी ● १२५ रु.
७६. **उदई**
प्रकाश चव्हाण ● १६० रु.
७७. **जय हो**
कमल देसाई ● ३०० रु.
७८. **क्लोरोफॉर्म**
डॉ. अरुण लिमये ● २०० रु.
७९. **असुरेंद्र**
ना.बा. रणसिंग ● ४०० रु.
८०. **फोडणी**
रामदास फुटाणे ● १०० रु.
८१. **एका शहराच्या खुंटीवर**
चंद्रशेखर सानेकर ● ७५ रु.
८२. **पाऊस**
अरुण शेवते ● ६० रु.
८३. **शोधवर्तन**
नरेंद्र बोडके ● ८० रु.
८४. **बावनकशी**
हॅमेलिआ ● ६० रु.
८५. **सफिया बेगम**
अरुण शेवते ● १०० रु.
८६. **सत्ता**
चंद्रशेखर भुयार ● ७५ रु.
८७. **एका ऊन्हाची कैफियत**
चंद्रशेखर सानेकर ● ६० रु.
८८. **कॉमन मॅन**
हेरंब कुलकर्णी ● ८० रु.
८९. **स्वत:तील अवकाश**
ज्ञानेशर मुळे ● १२५ रु.
९०. **निरंतर**
उषा मेहता ● २०० रु.
९१. **संशयास्पद टिपणे आणि इतर कविता**
संजीव खांडेकर ● ६० रु.
९२. **चॅनेल : डी–स्ट्रॉयरी**
श्रीधर तिळवे ● १२५ रु.
९३. **काही अनुभव काही आठवणी...**
रणजीत शहा ● ५० रु.

९४. **शांती अवेदना...**
पुष्पाग्रज ● ८० रु.
९५. **बदलत गेलेली सही...**
अंजली कुलकर्णी ● १२० रु.
९६. **उरल्यासुरल्या जगण्याचं रिमिक्स**
गोविंद काजरेकर ● ७५ रु.
९७. **या दशकाचा सातबारा कोराच राहील**
शंकरराव दिघे ● ८० रु.
९८. **आईच्या कविता**
अरुण शेवते ● ७० रु.
९९. **...माझ्या काळाचा अनुवाद**
चंद्रशेखर सानेकर ● ८० रु.
१००. **कवितेच्या कविता**
अरुण शेवते ● ७० रु.
१०१. **वाटेवरच्या कविता**
अशोक नायगावकर ● ५० रु.
१०२. **सैतानाची खुशी**
राकेश भडंग ● ८० रु.
१०३. **बाईच्या कविता**
किरण येले ● ८० रु.
१०४. **प्रत्ययपर्व**
मनोहर जाधव ● ७० रु.
१०५. **सुगंध उरले, सुगंध उरले**
अरुणा ढेरे ● १६० रु.
१०६. **गारुड गझलचे**
सदानंद डबीर ● १२० रु.
१०७. **अन्वय**
उषा मेहता ● १०० रु.
१०८. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने–२००५**
सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते ● ८० रु.
१०९. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने–२००८**
सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते ● ८० रु.
११०. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने–२००९**
सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते ● ८० रु.
१११. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने–२०१०**
सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते ● ८० रु.
११२. **उर्मिला**
डॉ. वसंत वऱ्हाडपांडे ● १०० रु.
११३. **धमधोकार**
प्रकाश पेठे ● १२० रु.
११४. **हाक/प्रतिसाद**
निदा फाजली,
अनुवाद–इब्राहीम अफगाण ● २०० रु.
११५. **काचेपाठचा समुद्र**
स्मिता भागवत ● १६० रु.
११६. **निशाणी – डावा अंगठा**
रमेश इंगळे–उत्रादकर ● ३०० रु.

११७. **रानभूल**
प्रल्हाद जाधव ● १२५ रु.
११८. **विवेकीजनीं ह्या मज जागविलें**
प्र.ब. कुळकर्णी ● २०० रु.
११९. **सिंहासन**
अरुण साधू ● २५० रु.
१२०. **मोरपिस**
अनुराधा गानू ● १६० रु.
१२१. **प्रकाशवाट**
वंदना करंबेळकर ● १२५ रु.
१२२. **संचिताची कोजागिरी**
यशवंत पाठक ● ३०० रु.
१२३. **लोकोत्तर गाडगेबाबा : जीवन आणि कार्य**
प्रा. द.ता. भोसले ● ३०० रु.
१२४. **विज्ञान विशारदा**
वसुमती धुरू ● १२५ रु.
१२५. **भारतातील स्टेनलेस स्टील संस्कृतीचे जनक**
संकलन-संपादन
शरयू ठाकूर, दिनकर गांगल ● २५० रु.
१२६. **महारूद्र** (आंतरराष्ट्रीय फूटबॉलमधला मराठमोळा झंझावात!)
जी.बी. देशमुख ● १२० रु.
१२७. **गांधी**
नलिनी पंडित ● २०० रु.
१२८. **लालबाग**
आदिनाथ हरवंदे ● ४०० रु.
१२९. **विज्ञानशिक्षण – नव्या वाटा**
डॉ. हेमचंद्र प्रधान ● १६० रु.
१३०. **का कराचं शिकून?**
लक्ष्मण माने ● ५० रु.
१३१. **शिक्षण : आनंदक्षण**
रमेश पानसे ● २०० रु.
१३२. **शिक्षणातील लावण्य**
लीला पाटील ● १०० रु.
१३३. **बालकहक्क**
लीला पाटील ● २२५ रु.
१३४. **शाळा आहे शिक्षण नाही**
हेरंब कुलकर्णी ● १०० रु.
१३५. **सुरवंटाचे फुलपाखरू**
डॉ. लक्ष्मण नारायण गोडबोले ● १२० रु.
१३६. **कळी उमलताना**
अनुराधा गोरे ● २०० रु.
१३७. **आजीच्या गोष्टी (भाग १)**
कै. सीताबाई दातार ● ६० रु.
१३८. **आजीच्या गोष्टी (भाग २)**
कै. सीताबाई दातार ● ६० रु.
१३९. **टेलिफोन ते मोबाईल**
चिन्मय थत्ते ● ६० रु.
१४०. **गोईण**
राणी बंग ● १६० रु.
१४१. **शील**
सरोज जोशी ● १५० रु.
१४२. **वाहतूक ठप्प**
अशोक दातार ● १२० रु.
१४३. **हत्या**
राकेश भडंग ● ३५० रु.
१४४. **संत तुकोबाची रोजनिशी**
रवींद्र पाटील ● ४०० रु.
१४५. **आभरान**
पार्थ पोळके ● २०० रु.
१४६. **असाही एक महाराष्ट्र**
संदेश भांडारे ● ३५० रु.
१४७. **आरोग्याचा अर्थ**
डॉ. आनंद नाडकर्णी ● २०० रु.
१४८. **धुंद-स्वच्छंद**
वसंत वसंत लिमये ● ६० रु.
१४९. **ध्येयनिष्ठ कर्मयोगी**
अरविंद पोतनीस ● २५० रु.
१५०. **जगप्रसिद्ध पुलांच्या कहाण्या**
सुधीर शं. कुलकर्णी ● १५० रु.
१५१. **मनोहारी**
विठ्ठल देशपांडे ● १२५ रु.
१५२. **आठवणीतले बाबासाहेब**
योगीराज बागूल ● ३०० रु.
१५३. **चंदनाची पाखर**
यशवंत पाठक ● २०० रु.
१५४. **आभाळाचे अनुष्ठान**
यशवंत पाठक ● २०० रु.
१५५. **येणे बोधे आम्हा**
यशवंत पाठक ● २०० रु.
१५६. **खेळ मांडला**
विभावरी दांडेकर ● १५० रु.
१५७. **देवांसि जीवे मारिले**
लक्ष्मण लोंढे
चिंतामणी देशमुख ● २०० रु.

## ग्रंथाली-ज्ञानयज्ञ पुस्तके

१५८. **पहिला भारतीय वैमानिक**
रत्नाकर वाशीकर,
आ.रा. मराठे ● ४५ रु.
१५९. **सदानंद!**
डॉ. सुरेश नाडकर्णी ● ५० रु.
१६०. **आजची समाजरचना, तिचे स्वरूप व पुनर्बांधणी**
भवरलाल जैन ● ४५ रु.
१६१. **परराष्ट्रधोरण : भारत व जागतिक संबंध**
ना.य. डोळे ● ४५ रु.
१६२. **परराष्ट्रधोरण : आपले शेजारी**
ना.य. डोळे ● ४५ रु.
१६३. **सागर-महासागर**
शैलजा सांगळे ● ४५ रु.
१६४. **लहरी हवामान**
डॉ. कुमार कुलकर्णी ● ४५ रु.
१६५. **वेळंब**
डॉ. कमलाकर देवधर ● ४५ रु.
१६६. **पिंपरी-चिंचवड : जुनं-नवं**
मीरा जोशी ● ४५ रु.
१६७. **संख्यादर्शन**
स. पां. देशपांडे ● ४५ रु.
१६८. **कांगारूंचे मराठी आप्त**
कमलिनी काटदरे
निरंजन उजगरे ● ४५ रु.
१६९. **फळांचा राजा**
स्मिता देवधर ● ५० रु.
१७०. **एक आटपाट लोकमान्य नगर**
दिलीप काटदरे ● ५० रु.
१७१. **सहनैसर्गिक जीवनशैली**
डॉ. श्याम जोशी ● ५० रु.
१७२. **क्षुधाशांती ते मॅकडोनाल्ड**
सु.गो. तपस्वी ● ५० रु.
१७३. **प्रगती पुलांची**
सुधीर शं. कुलकर्णी ● ५० रु.
१७४. **प्रार्थनाविचार**
माधवी कवी/घनश्याम कवी ● ५० रु.
१७५. **सुशेगाद् गोवा**
नंदिनी महाडेश्वर ● ५० रु.
१७६. **पुस मॉथ ते डॅश-४००**
रत्नाकर महाजन ● ५० रु.
१७७. **एड्स-कथा आणि व्यथा**
डॉ. दीप्ती डोणगावकर ● ५० रु.
१७८. **इस्रायलची मराठी लेकरे**
संध्या जोशी ● ५० रु.
१७९. **आकाशगामी**
रत्नाकर महाजन ● ५० रु.
१८०. **देव जाणिला कुणी?**
प्रेमला काळे ● ५० रु.
१८१. **आधुनिक एकलव्य**
डॉ. सुरेश नाडकर्णी ● ५० रु.
१८२. **स्वीय शेती**
गो. ह. दंडवते ● ५० रु.
१८३. **नेवासे**
संजय बोरुडे ● ५० रु.
१८४. **नाटळ**
मनोहर सावंते ● ५० रु.

१८५. **आधुनिक अर्थशास्त्राचे निर्माते**
यशवंत पंडितराव ● १०० रु.
१८६. **बालकल्याण ते बालहक्क**
माधुरी भिडे ● ५० रु.
१८७. **इराण**
पद्मा कऱ्हाडे/
पुरुषोत्तम कऱ्हाडे ● ५० रु.
१८८. **चांगलं मरण**
डॉ. कमलाकर देवधरे ● ५० रु.
१८९. **वृद्धत्वः देशोदेशी**
पी. के. मुत्तगी/
पद्माकर नागपूरकर ● ५० रु.

१९०. **चित्रसंवाद**
संदीप देवल ● ८० रु.
१९१. **कऱ्हाड**
विजय माळी ● १०० रु.
१९२. **रँग्लरचं ग्लॅमर**
स.पां. देशपांडे ● ४५ रु.
१९३. **मनाचे मनोगत**
साधना कामत ● ५० रु.
१९४. **स्वप्नांची बाग**
डॉ. उषा हरदास ● ८० रु.

## मातृभूमी सेवा ट्रस्ट पुस्तके

१९५. **ओऽ कॅनडा!**
स्मिता भागवत ● १२० रु.
१९६. **स्थानभ्रष्ट**
डॉ. शांतिलाल धनिक,
शब्दांकन : स्मिता भागवत ● ३०० रु.
१९७. **पहिला स्वातंत्र्यसंग्राम आणि तात्या टोपे**
स्मिता भागवत ● ६० रु.

## १६१ पुस्तके संच क्रमांक २ मूळ किंमत ३२,८६५ रु. सवलतीत संचाची किंमत १६००० रु.

१. **शांताराम व्यक्ती आणि वाङ्मय**
सुरेखा सबनीस ● २५० रु.
२. **दिवस असे की...**
प्रवीण बर्दापूरकर ● २२५ रु.
३. **नोंदी डायरीनंतरच्या**
प्रवीण बर्दापूरकर ● २०० रु.
४. **टिळक ते गांधी मार्गेखाडिलकर**
मुकुंद वझे ● १२० रु.
५. **मराठी भाषेतीलअसभ्य म्हणी आणि वाक्प्रचार**
अ.द. मराठे ● २५० रु.
६. **अहिराणी लोकपरंपरा**
डॉ. सुधीर देवरे ● १५० रु.
७. **आठवणींची साठवण**
डॉ. सुरेश नाडकर्णी ● १८० रु.
८. **माझ्या मनाचा मुरांबा**
वसुमती धुरू ● २७५ रु.
९. **संवादने**
विद्या हर्डीकर-सप्रे ● १५० रु.
१०. **परक्या भूमीवर घर**
स्मिता भागवत ● १५० रु.
११. **तेजस्विनी**
स्मिता भागवत ● १५० रु.
१२. **मनातल्या वावटळी**
प्रगती कोळगे ● १०० रु.
१३. **आकार**
सदाशिव साठे ● २५० रु.
१४. **तमाशा : विठाबाईच्या आयुष्याचा**
योगीराज बागूल ● २५० रु.

१५. **आचंद्र-सूर्य नांदो**
अनुराधा गोरे ● १६० रु.
१६. **गाऊ त्यांना आरती**
अनुराधा गोरे ● ३०० रु.
१७. **बाळाची चाहूल**
अनुराधा गांगल ● ६० रु.
१८. **भारतीय सृष्टी**
अनुराधा गांगल ● १२० रु.
१९. **संस्कार**
अनुराधा गांगल ● ६० रु.
२०. **रांगोळी**
अनुराधा गांगल ● १८० रु.
२१. **महाराष्ट्राची सुवर्णगाथा**
वसंत देशपांडे ● १८० रु.
२२. **मी विंदा बोलतेय**
जयमाला देसाई ● १२० रु.
२३. **शांबरिका खरोलिक**
श्रीकांत पेटकर ● ६० रु.
२४. **प्रेरक संघर्षाचा अमृतमयी ठेवा**
बाबासाहेब पाटील ● १८० रु.
२५. **आनंदाकार**
प्रकाश पेठे ● १०० रु.
२६. **हवा, पानी और...**
भारत गजेंद्रगडकर ● ७५ रु.
२७. **एका पत्रकाराची दुनिया**
भारत गजेंद्रगडकर ● १५० रु.
२८. **भयशून्य चित्त जेथ...**
अनुवाद व संपादन
डॉ. नरेंद्र जाधव ● ५०० रु.

२९. **आठवणींच्या जगात : जर्मनीतील तीन तपांचा अनुभव**
निरुपमा सोनाळकर ● ३०० रु.
३०. **ईश्वरविरहित जीवन (खंड १)**
शरद बेडेकर ● १८० रु.
३१. **ईश्वरविरहित जीवन (खंड २)**
शरद बेडेकर ● २०० रु.
३२. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने-२०११**
सुधीर-नंदिनी थत्ते ● ८० रु.
३३. **अस्फुट आवाजांचा प्रदेश**
डॉ. जयश्री गोडसे ● १८० रु.
३४. **अजब सहवास**
गो.आ. भट ● १०० रु.
३५. **सव्वाशे बोधकथा**
दिलीप पांढरपट्टे ● १२० रु.
३६. **यशवंतराव चव्हाण : माणूस आणि लेखक**
डॉ. प्रकाश दुकळे ● २५० रु.
३७. **वेचक व्हिएतनामी लोककथा**
प्रभा पुरोहित ● ७५ रु.
३८. **कथा जगप्रसिद्ध पुलांच्या**
सुधीर कुलकर्णी ● ३५० रु.
३९. **विचारवंतांचा विवेकविशेष**
शरद बेडेकर ● १०० रु.
४०. **उंबरठ्यावरचे दिवस**
भाऊ गावंडे ● ५०० रु.
४१. **आठवा चिरंजीव**
डॉ. प्रतिभा मुडगेरीकर ● १५० रु.

४२. **वडोदरा**
प्रकाश पेठे ● ८० रु.
४३. **दीपस्तंभ**
दीपक घारे/रंजन र. जोशी ● ३५० रु.
४४. **आधुनिक युगातील विचारसरणी**
डॉ. विजय/जयश्री जोशी ● १०० रु.
४५. **साहित्य : आस्वाद आणि अनुभव**
डॉ. द.ता. भोसले ● २०० रु.
४६. **मनस्वी**
बाबूराव चंदावार ● ५०० रु.
४७. **झुंज आणि झेप**
गो.मा. वाघमारे (गुरुजी) ● १०० रु.
४८. **एका कवीचे जीवनगाणे वामन कर्डक यांची चरित्रकथा**
बबन लोंढे ● १६० रु.
४९. **आठवणीतील पाऊले**
डॉ. मो.शि. तथा बापुसाहेब रेगे ● ३०० रु.
५०. **अखेर न्याय मिळाला**
नीलिमा कानेटकर ● ३५० रु.
५१. **नाझी नरसंहार**
कुमार नवाथे ● १५० रु.
५२. **डायरी**
प्रवीण बर्दापूरकर ● १८० रु.
५३. **लॉक ग्रिफिन**
वसंत वसंत लिमये ● ५०० रु.
५४. **दि मॅन इन ऑलिव्ह ग्रीन्स**
कर्नल सुधीर नाफड ● २२५ रु.
५५. **पश्चिम घाट बचाओ मोहीम**
जगदीश गोडबोले ● २०० रु.
५६. **जीवन आणि स्वास्थ्य**
डॉ. प्रेमानंद रामाणी ● ८० रु.
५७. **जेनेटिक्स कशाशी खातात?**
डॉ. उज्ज्वला दळवी ● २५० रु.
५८. **नाही चिरा नाही पणती**
स्मिता भागवत ● २०० रु.
५९. **वानुळा**
साहेबराव चवरे ● १०० रु.
६०. **आत्मा हा भ्रम, परमात्मा हा महाभ्रम, तर मग अध्यात्म ते काय?**
शरद बेडेकर ● १२० रु.
६१. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०१२**
सुधीर-नंदिनी थत्ते ● ८० रु.
६२. **पहाटसरी**
यशवंत पाठक ● ३५० रु.
६३. **अंतरीचे धावे**
यशवंत पाठक ● १५० रु.
६४. **वेगळा विदर्भ**
श्रीपाद जोशी ● २०० रु.
६५. **तिचं अवकाश**
नीलिमा कानेटकर ● ३०० रु.
६६. **हुंदके टाळण्यासाठी**
नीलिमा कानेटकर ● २०० रु.
६७. **शोध**
डॉ. बी.जी. शेखर ● १५० रु.
६८. **कालिदास : एका गुराख्याचे महाकाव्य**
मयूर देवल ● १०० रु.
६९. **देश, परदेश आणि मी**
गजानन सबनीस ● २०० रु.
७०. **समाजरंग**
ज्ञान मयूर
अनिता कुलकर्णी ● २५० रु.
७१. **माझा देहूरोड बॉम्बस्फोट खटला, १९४३**
नारायण आठवले ● २२५ रु.
७२. **रंग दे बसंती चोला**
स्मिता भागवत ● २०० रु.
७३. **कथा इन्सुलिनच्या शोधाची**
विजय आजगांवकर ● १५० रु.
७४. **ॲबसर्ड थिएटर**
माणिक कानेड ● १६० रु.
७५. **नगरमंथन**
प्रकाश पेठे ● २०० रु.
७६. **घडत गेलेली गोष्ट**
विजया राजाध्यक्ष ● २२५ रु.
७७. **माझं साहित्यिक खटलं**
ॲड. यशवंत हडप ● २२५ रु.
७८. **दत्तकवेणा**
प्रगती कोळगे ● १५० रु.
७९. **क्षितिज पश्चिमेचे**
विनता कुलकर्णी ● २५० रु.
८०. **यशवंतराव चव्हाण : आठवणी-आख्यायिका**
लक्ष्मण माने ● २५० रु.
८१. **तांडव हरवताना**
रवी परांजपे ● २५० रु.
८२. **लसावि**
डॉ. नरेंद्र जाधव ● ४०० रु.
८३. **सारांश शून्य**
संजय कळमकर ● ३०० रु.
८४. **मनाचे कवडसे**
विश्वास काकडे ● १०० रु.
८५. **१९७१चा रणसंग्राम**
अनुराधा गोरे ● ३५० रु.
८६. **अंतरंग**
विजया राजाध्यक्ष ● १२५ रु.
८७. **ओंजळ काव्यफुलांची**
सुभाषचंद्र मयेकर ● १२५ रु.
८८. **प्रिय आयुष्यास सप्रेम नमस्कार**
संगीता धायगुडे ● ८० रु.
८९. **कवडसे**
महेश केळुस्कर ● ७० रु.
९०. **वर्तुळ पुसून टाकताना...**
शारदा नवले ● ८० रु.
९१. **ओळखीची वाट**
नीला सत्यनारायण ● १५० रु.
९२. **दु:ख माझे कोवळे**
प्रतिभा सराफ ● ६० रु.
९३. **मनोमनी**
जयश्री भिसे ● ७५ रु.
९४. **अरूपाचे रूप**
माणिक गुट्टे ● १२५ रु.
९५. **एक अजब कोलाहल**
चंद्रशेखर सानेकर ● ८० रु.
९६. **काळिजगुंफा**
सदानंद डबीर ● ७५ रु.
९७. **कवितेची वही**
सलोनी धुरी ● ८० रु.
९८. **फुलवेडी**
अरुण शेवते ● ६० रु.
९९. **शब्द तर कुली आहेत**
राजेंद्र काटदरे ● १०० रु.
१००. **तृष्णाकाठ**
वैभव देशमुख ● १०० रु.
१०१. **रवींद्रनाथ टागोर : युगनिर्माता विश्वमानव**
डॉ. नरेंद्र जाधव ● ४०० रु.
१०२. **रवींद्रनाथ टागोर : समग्र साहित्यदर्शन**
डॉ. नरेंद्र जाधव ● ३०० रु.
१०३. **बोल महामानवाचे भाग १**
डॉ. नरेंद्र जाधव ● २५० रु.
१०४. **बोल महामानवाचे भाग २**
डॉ. नरेंद्र जाधव ● ६०० रु.
१०५. **बोल महामानवाचे भाग ३**
डॉ. नरेंद्र जाधव ● ३५० रु.

१०६. **प्रज्ञा महामानवाचे भाग १**
डॉ. नरेंद्र जाधव ● ३५० रु.
१०७. **प्रज्ञा महामानवाचे भाग २**
डॉ. नरेंद्र जाधव ● २०० रु.
१०८. **प्रज्ञा महामानवाचे भाग ३**
डॉ. नरेंद्र जाधव ● २२५ रु.
१०९. **प्रज्ञा महामानवाचे भाग ४**
डॉ. नरेंद्र जाधव ● ७५ रु.
११०. **आंबेडकरी विचारधारा**
बबन लोंढे ● ६०० रु.
सुधाकर गायकवाड
१११. **काळोखगर्भ**
बबन लोंढे ● २५० रु.
सुधाकर गायकवाड
११२. **निर्णायक युद्धानंतर**
बबन लोंढे ● १२५ रु.
सुधाकर गायकवाड
११३. **संकल्पना कोश भाग १**
सुरेश वाघे ● ६०० रु.
११४. **संकल्पना कोश भाग २**
सुरेश वाघे ● ७५० रु.
११५. **संकल्पना कोश भाग ३**
सुरेश वाघे ● ५५० रु.
११६. **संकल्पना कोश भाग ४**
सुरेश वाघे ● ५५० रु.
११७. **संकल्पना कोश भाग ५**
सुरेश वाघे ● ७५० रु.
११८. **जीवनदान**
राजीव जोशी ● १०० रु.
११९. **मी मवाली तुझ्या हवाली**
सुभाषचंद्र मयेकर ● १२० रु.
१२०. **निरन्वय**
नीरजा ● १०० रु.
१२१. **स्त्रीगणेशा**
नीरजा ● १०० रु.
१२२. **बुद्ध परंपरा आणि बोधीवृक्ष**
हेमा साने ● १५० रु.
१२३. **जॅक ऑफ ऑल**
अनुराधा गोरे ● १३० रु.
१२४. **परिक्षेची भीती कशाला?**
अनुराधा गोरे ● २५० रु.
१२५. **ताबंट**
प्रल्हाद जाधव ● १५० रु.
१२६. **जिद्द**
सरोज जोशी ● ८० रु.
१२७. **फिदा स्वत:वर**
सरोज जोशी ● ८० रु.
१२८. **भारतीय बौद्धिक संपदेचा उद्गाता डॉ. रघुनाथ माशेलकर**
अ.पां. देशपांडे ● २२५ रु.
१२९. **जैतापूरचे अणुमंथन**
राजा पटवर्धन ● ३०० रु.
१३०. **हुमान**
संगीता धायगुडे ● ३५० रु.
१३१. **शापित भूमी**
उमेश कदम ● २५० रु.
१३२. **मला समजलेले पाच हिंदू धर्म**
शरद बेडेकर ● १६० रु.
१३३. **सव्वाशे बोधकथा भाग २**
दिलीप पांढरपट्टे ● १५० रु.
१३४. **नोबेलनगरी नवलस्वप्ने २०१३**
सुधीर/नंदिनी थत्ते ● ८० रु.
१३५. **गुलजारांच्या कविता**
रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ
अनुराधा मोहनी ● १२५ रु.
१३६. **स्पर्श हरवलेले**
डॉ. सुलभा कोरे ● १०० रु.
१३७. **पंजाबराव देशमुख जीवनकालपट**
डॉ. रमेश पानसे ● १२० रु.
१३८. **झोके अमेरिकेतले**
डॉ. अनंत लाभसेटवार ● २५० रु.
१३९. **विकासाचे निष्कर्ष**
सु.गो. तपस्वी ● ३०० रु.
१४०. **संस्कारहीन**
निर्मला डांगे ● १०० रु.
१४१. **ॲबगेल ॲडम्स**
माणिक कानेड ● ८० रु.
१४२. **महाराष्ट्राचा लेखाजोखा**
संकलन : दिलीप चावरे ● १६० रु.
१४३. **संवाद**
डॉ. नीना सावंत ● १०० रु.

**दोन्ही संच एकत्रित घेतल्यास २७००० रुपयांत!**

१४४. **साकुरा**
पूजा मलुष्टे ● २०० रु.
१४५. **बोलावें ते आम्ही**
श्रीकांत देशमुख ● १८० रु.
१४६. **मे आय कम इन**
कु. तन्वी दिनेश डोके ● १२५ रु.
१४७. **बी.एन.**
भारत गजेंद्रगडकर ● १०० रु.
१४८. **ग्रामीण बोलीचा शब्दकोश**
डॉ. द.ता. भोसले ● २०० रु.
१४९. **हाँगकाँग सफारी**
पद्मा कऱ्हाडे ● १२० रु.
१५०. **वैश्विक उपचार**
विपिन मेहता
अनुवाद-विजया बापट
संपादन : अपर्णा वेलणकर ● १८० रु.
१५१. **चॅनेल 4 लाईव्ह**
समीरण वाळवेकर ● ४०० रु.
१५२. **आस्तिकता नास्तिकता दोन्ही अंधश्रद्धा**
दि.म. संत ● १२५ रु.
१५३. **पडघम**
अरुण साधू ● १२५ रु.
१५४. **सोल्जर इन मी**
शिल्पा जितेंद्र खेर ● २५० रु.
१५५. **सत्यकथा**
नीला सत्यनारायण ● १२५ रु.
१५६. **तसा मी.. असा मी**
डॉ. बाळ खरे ● २५० रु.
१५७. **ढोर**
भगवान इंगळे ● ३०० रु.
१५८. **काही तरी सांगायचंय म्हणून**
प्रकाश हरी कार्लेकर ● १२५ रु.
१५९. **नेटक्या कविता**
मिलिंद लांजेवार ● १०० रु.
१६०. **मंदिर-शिल्पे**
डॉ. माया पाटील ● ३०० रु.
१६१. **माझ्या काळजाची गोष्ट**
सुनीता संगवई ● १५० रु.




ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

वार्षिक वर्गणी १०० रुपये
तीन वर्षासाठी २५० रुपये

आजच्या काळातील सामाजिक-सांस्कृतिक प्रश्नांचा मागोवा घेणारे माहितीपर विचारप्रवर्तक व मनोवेधक मासिक.
चाळीस वर्षांची अखंड परंपरा

द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग, माटुंगा (प.), मुंबई-४०००१६
दूरध्वनी : २४३०६६२४/२४२१६०५० granthali01@gmail.com

ग्रंथाली

## भिडू भगवान इंगळे




आयुष्याच्या विविध टप्प्यांवर भेटलेल्या, भयाण आयुष्य जगलेल्या भिडूंची ही जीवनकहाणी.

मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.

## ढोर भगवान इंगळे




ढोर समाजातील एक गट शिकला आणि स्थिर झाला. अशा एका तरुणाची प्रातिनिधिक कहाणी.

मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.

## नेटक्या कविता मिलिंद लांजेवार





इंटरनेट हे माध्यम बहरले आहे. 'नेटक्या कवितांचा एक एल्गारच येऊ घातला आहे आणि त्यातील भरीव शब्द आहे मिलिंद लांजेवार यांचा

मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.

ग्रंथाली

## चॅनल 4 Live

समीरण वाळवेकर





टीव्ही, न्यूज चॅनेल्सचं वेगवान, धावणारं जग या माध्यमांच्या पार्श्वभूमीवर घडणारी, अस्वस्थ करणारी बेधडक कादंबरी...

मूल्य ४०० रु.
सवलतीत २४० रु.

## सोल्जर इन मी

शिल्पा जितेंद्र खेर




ही कादंबरी आजच्या तरुण पिढीमध्ये राष्ट्रप्रेम जागवणारी, जीवनसंघर्षात सफल होण्यासाठी लिहिलेली आधुनिक 'भगवत्‌गीता' आहे.

मूल्य २५० रु.
सवलतीत १५० रु.

## जेनेटिक्स कशाशी खातात?

डॉ. उज्ज्वला दळवी




एकविसाव्या शतकात जनुकशास्त्र अफाट विस्तारलं आहे. या शास्त्राची सोपी तत्त्वं उमजून घेऊन शास्त्रीय जाणीव वाढवणारं सुबोध कथन

मूल्य २५० रु.
सवलतीत १५० रु.

RNI No. MAHMAR/2013/50137 Postal Registration No. MCW/310/2013-2015
Published on 10th of Every Month. Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th of Every Month.




डॉ. माया पाटील लिखित 'मंदिर–शिल्पे' या पुस्तक प्रकाशनासमयी धनंजय गांगल, डॉ. अभय शहापूरकर, संजय कृष्णाजी पाटील, सुहास बहुलकर, लेखिका डॉ. माया पाटील, डॉ. गो.बं. देगलूरकर, डॉ. अ.प्र. जामखेडकर, डॉ. स्मिता शहापूरकर आणि सुविद्या प्रकाशनचे बाबूराव मैंदर्गीकर




मिलिंद लांजेवार लिखित 'नेटक्या कविता' या कवितासंग्रहाचे प्रकाशन करताना संपदा जोगळेकर, कौशल इनामदार, अरुण म्हात्रे, कवी मिलिंद लांजेवार, मनोज जोशी आणि लतिका भानुशाली



सुनीता संगवई लिखित 'माझ्या काळजाची गोष्ट' निसर्गोपचाराची किमया – एक सत्यकथा या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी प्रभाकर भिडे, डॉ. कुमुद बेदरकर, डॉ. उल्हास कोल्हटकर विष्णुपंत ढवळे लेखिका सुनीता संगवई आणि मधुमती

मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.